मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या महाराष्ट्र साहित्य पत्रिका ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून महाराष्ट्र साहित्य परिषदेद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.


१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका


महाराष्ट्र साहित्य परिषद
~ ग्रंथालय ~
ग्रंथकार महाराष्ट्र साहित्य पत्रिका
ग्रंथनाम जानेवारी ते डिसेंबर २००९
दाखल अंक अंक ३२८ ते ३३९

महाराष्ट्र साहित्य पत्रिका

अंक क्र. ३३१/ऑक्टोबर ते डिसेंबर २००९



अद्ययावत पुरवणीसह दुसरी आवृत्ती लवकरच प्रकाशित होत आहे.

अनुक्रमणिका


बचत में बचत बढ़े
आपको पता भी न चले
विशेषताएं
• न्यूनतम मासिक जमा राशि रु 100/-
• कोई टीडीएस नहीं
• अधिक ब्याज दर
• ऋण सुविधा
शर्तें लागू
पीएनबी की आवर्ती जमा योजना
अधिक जानकारी के लिए 0124-2340000 अथवा ऑल इण्डिया
हैल्पलाइन 1800 180 2222 (टॉल फ्री) डायल करें वेबसाइट www.pnbindia.in or www.pnbindia.com
पंजाब नैशनल बैंक
...भरोसे का प्रतीक !
punjab national bank
...the name you can BANK upon !

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे त्रैमासिक मुखपत्र

महाराष्ट्र साहित्य पत्रिका

□ अंक क्र. ३३१ : ऑक्टोबर ते डिसेंबर २००९

प्रकाशक :
डॉ. माधवी वैद्य
प्रमुख कार्यवाह

महाराष्ट्र साहित्य परिषद
टिळक रस्ता, पुणे ४११ ०३०
दूरभाष - ०२०-२४४७५९६३

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

मुद्रक-प्रकाशक
डॉ. माधवी वैद्य, प्रमुख कार्यवाह
महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ता, पुणे ४११ ०३०.

अक्षरजुळणी
मेघा ग्राफिक सर्व्हिसेस,
स.नं. १४/२३/४, घर नं. १५९८,
मोती बेकरीमागे, धायरी, पुणे - ४११ ०४१

मुद्रणस्थळ
जंगम ऑफसेट प्रा. लि., २५/१० नांदेड फाटा,
सिंहगड रस्ता, पुणे - ४११ ०४१

किंमत १५/- रुपये

प्रकाशन : डिसेंबर, २००९

(संपादकीय)

विलापिका !

डॉ. सु. प्र. कुलकर्णी

आपल्या **'स्वरार्थरमणी'** ग्रंथाची 'भूमिका' विशद करताना गानसरस्वती किशोरी आमोणकर म्हणतात, '... स्वरभाषा ही भावसौंदर्याची अभिव्यक्ती असते. कला हा शब्द, तसेच स्वरभाषा हा शब्दही स्त्रीलिंगीच आहे. मनाच्या अनेकविध अवस्थांचे अनेकविध रंग ही स्वरभाषा अभिव्यक्त करीत असते. ही कार्यप्रणाली हे स्त्रीच्या कार्यशक्तीचे स्वरूप आहे. कार्यशक्तीचे मूळ स्वरूप हे देवीस्वरूप आहे. हे देवीस्वरूप मूर्त अशा सौंदर्यशाली रमणीचे स्वरूप असते. भावघटनेला विभूषित करून जगासमोर मांडणारी कला आणि स्वतः कलाकार आणि श्रोत्यांना रममाण करणारी ती 'रमणी'. स्वरकलेचे मूर्त व अमूर्त स्वरूप हे 'स्वरार्थ-सौंदर्या'ने नटलेले असल्याने या पुस्तकाचे शीर्षक 'स्वरार्थ रमणी' ! 'अर्थ म्हणजे भाव आणि रमणी म्हणजे सुंदर स्त्री.' गानस्वरस्वतीचे हे गद्यकाव्यात्मक कलाचिंतन केवळ संगीतकलेपुरते मर्यादित नाही.

शब्दाला सांगीतिक रूप म्हणजे स्वररूप देऊन त्यातून प्रवाही होणाऱ्या अर्थाला श्रवणरम्यता येत असते. यातूनच भावगीत, गझल, अभंग, भजन याची निर्मिती होत असते. ही अभिव्यक्ती आहे. अभिव्यक्तीला अर्थाशिवाय महत्त्व नसते. शब्दाला स्वरात बांधून ही अभिव्यक्ती होते. सर्व कलांचा हाच मर्मबंध आहे.

गानसरस्वतीने विश्वव्यापी कलेचे (स्वरभाषेचे) रहस्य उकलून दाखविताना भारतीय काव्यचर्चेचा आधार घेतला आहे. स्वरभाषा ही स्त्रीलिंगी म्हणून ती 'रमणी' ! हीच कवीची 'कविता-रति'...!

'स्वर' हा मूळचा अशरीरी ! मुखरयंत्रणेचा स्पर्श न होता हृदयाकाशातून प्रकट होणारा तो अडथळाशून्य ध्वनी. भाषाविज्ञानातील 'स्वन'. मूळचा उदासीन, निराकार परंतु जगात प्रकटताना अंतःकरणातील कोणतीतरी ऊर्मी घेऊन सार्थ होण्याची धडपड करतो. स्वन-पद-वाक्य ह्या मार्गाने तो स्वन अर्थाने प्रकट होण्यासाठी..., 'वैखरी' स्वरूपात येण्यासाठी अखंड कासावीस होतो. एका अनामिक अशरीरी सौंदर्यानुभूतीला प्रकट करण्यासाठी शुद्ध सांगीतिक मार्गाने प्रवाही होतो. एका लयीचा शोध घेतो. तालाचा आधार घेतो. यातूनच एका 'स्वरनाट्या'चा आकार घेऊन 'स्वर-सत्य'... अशरीरी आनंदाची अनुभूती देण्याचा- अमृतानुभवाचा क्षण साधू पाहतो. एक क्षणभरच त्या अमृतानुभूतीचे सौंदर्य लाभते; आणि अवघे जीवन वेडेपिसे होते. कधी ओवी, तर कधी अभंग, कधी गझल, तर कधी लावणी, कधी भावगीत, तर कधी प्रदीर्घ विलापिका... अशा बहुविध रुपाने त्या अनामिक अरूपाला, अनंगाला- सौंदर्यांगात बांधू पाहतो. मानवी जीवन त्यासाठी अपुरे पडते म्हणून की काय; अमर्याद पसरलेल्या स्वयंभू निसर्गसौंदर्यात तो 'अमृतानुभव' शोधणारा युगायुगांचा प्रवासी होतो.

'... शतजन्म शोधताना, शतआर्ती व्यर्थ झाल्या !
शत सूर्य मालिकांच्या, दीपावली निमाल्या !!...'

असा युगायुगांचा सौंदर्यानुभूतीचा अतृप्त प्रवास करताना 'अमृतानुभवाचे बोट' केव्हातरी निसटते; आणि हाती राहते ते केवळ मूक शब्दशिल्प ! कधीकाळी अनुभवलेल्या 'त्या' सौंदर्यानुभूतीचे निर्जीव शिल्प ! अजिंठ्याच्या चित्रातले आणि वेरूळच्या शिल्पातले ! ज्याच्या दर्शनाने माणसाचे मन एक अनामिक हुरहूर, अनामिक ओढ आणि नंतर चिरंतनाची उदासीनता अनुभवू लागते. एखादीच 'गानस्वरस्वती' त्या स्वरनाट्याच्या मोहात न फसता अशरीरी 'स्वरसत्या'ची... त्यातील 'अमृतानुभवाची' वाटचाल करते !

असेच काही प्रकट करणारी कै. ना. घ. देशपांडे यांची विलापिका- **'कंचनीचा महाल'**...

कुण्याएका रूपगर्विता कंचनीची ही कहाणी. प्रेयाच्या मागे लागून श्रेय हरवून बसलेली... शिळा ! ओसाड

झालेला तिचा पैनगंगेकाठचा महाल, आजही पश्चात्तापाने झुरतो आहे. ह्या ओसाड वाटेने जाणाऱ्या-येणाऱ्या वाटसरूला, ही कंचनी, आपली कर्म-कहाणी सांगते आहे.

कंचनीचे सौंदर्य- केवळ देहसौंदर्य ! केवळ स्वर हरवलेले शब्दनाट्य ! त्यात केवळ उन्मादकता ! त्यासाठीच, केवळ 'प्रदोष-पूजेसाठी' सान थोर नगरजन जमत. बेहोष होत. देहसौंदर्याचा सोहळा रोज साजरा होत असे. त्यात प्रेमाचा लवलेशही नसे ! कंचनीलाही ह्याच देहसोहळ्याची धुंदी होती. तिच्यातील 'रमणी' केव्हाच हरवली होती. 'कमलजा' देवीपेक्षाही आपण श्रेष्ठ आहोत; ह्या आंधळ्या अहंकाराने ती पछाडली गेली. देहसौंदर्यावर मिळविलेल्या वैभवाने आपण कुणालाही आणि कशालाही खरेदी करू शकू ह्या भ्रमाने 'कमलजा' च्या दर्शनासाठी सात मजल्यांचा महाल बांधून- तेथून त्या 'पावित्र्याचे' मी दर्शन घेईन- पण पायी चालणार नाही- ह्या ईर्ष्येने ती पेटली होती. त्या देहोत्सवाच्या गर्दीत कुणी एक पोर ती अशरीरी ज्योत घेऊन तिच्याकडे आला. 'कमलजा'चे पवित्र दर्शन घेण्यासाठी तिची संगत मागू लागला. 'सात मजले बांधून- तेथून मी तो 'दिवा' पाहीन ही तिची गर्वोक्ती फोल ठरते. 'त्या' प्रकाशाचे दर्शन घेण्यासाठी भक्त पायपीट करतात, अंगप्रदक्षिणा घालीत-दंडवत घालीत येतात. देहाला तुच्छ समजून 'ते' दर्शन घेतात. महालाच्या सातव्या मजल्यावरून दर्शन घेताना, ती शिळा होऊन पायथ्याशी पडते. ती पश्चात्तापदग्ध शिळा खऱ्या प्रेमाची वाट पहात- श्रेय आणि प्रेय दोन्हीही हरपल्याने आजही विलाप करीत आहे. एकेकाळचा 'कंचनीचा महाल' आपले सारे वैभव हरवून भयाण अवस्थेत कसाबसा उभा आहे. न संपणाऱ्या प्रतीक्षेत!

कै. ग. दि. माडगूळकरांचा 'जोगिया' यानंतर प्रकटला; तो हेच दुःख घेऊन ! आयुष्यभर भोगलेल्या 'मैफिली'तील हरपल्या श्रेयाला साद घालीत.

कै. ना. घ. देशपांडे यांच्या कवितेला जे सौंदर्याचे वेड लागले आहे; त्यातून चिरंतनाचा ध्यास प्रकट होतो. 'ती' काव्यरमणी आजही आपल्या अशरीरी सौंदर्याने श्रेयाची वाट दाखविते आहे. न संपणारी कविता !

कै. ग. त्र्यं. माडखोलकरांच्या 'विलापिका' ह्या १९२७ मध्ये प्रकाशित झालेल्या प्रबंधाने प्रेरित होऊन सत्तर वर्षांनी लिहिलेली ही 'कै. ना. घं.'ची 'कंचनीचा महाल' विलापिका एक मनोहारी काव्यशिल्प आहे. कवितेची समीक्षा म्हणजे एक दुसरे काव्यच असते- गद्यकाव्य ! माडखोलकरांचा विलापिकेवरील प्रबंध एक गद्यकाव्यच आहे. विलापिकेचा विषय मृत्यू हा आहे. माडखोलकर म्हणतात, 'प्रियजनांच्या देहावसानाने अत्यंत सश्रद्ध मनुष्याचे मनही शोकविव्हल होते... शोकाच्या आवर्तात सापडलेल्या विचारी मनाला नश्वरतेमुळे निस्सार वाटणाऱ्या मानवी जीविताच्या गूढाविषयी मनन करण्याची इच्छा आपोआप होते. जगातील प्रायः सर्वच विलापिकात (Eleay) करुण आणि शांत ह्या दोन रसांचा जो रमणीय संगम झालेला दृष्टीस पडतो, तो याच कारणामुळे. संस्कृत-साहित्यशास्त्रज्ञांनी मृत्यू हे करुणरसाचे अधिदैवत मानलेले आहे. आवडत्या माणसाच्या मरणाने प्रापंचिक सुखाच्या क्षणभंगुरतेचा प्रत्यय येऊन, मनुष्याला काही काळ तरी निर्वेद उत्पन्न होतो. निर्वेद हा शांतरसाचा स्थायीभाव आहे. करुणरसाचे पर्यवसान शांतरसात होते...''

ही विलापिका मात्र श्रेयाच्या हरपण्याची आहे; आणि प्रेयाच्या फोलपणाची ! कंचनीला आपल्या देहसौंदर्याचा फोलपणा जाणवला; त्यावेळी फार उशीर झालेला होता. शिळा होऊन पडल्यावर तिचे हृदयपरिवर्तन झालेले ऐकायलाही कोणी नव्हते. देहाची नश्वरता कळाल्याने तो शांत झाला, परंतु कलंकित प्रेय अश्वत्थाम्यासारखे श्रेयाची भीक मागत पिशाच्चरुपाने भटकू लागले: विलापिकेचे हे अस्वस्थ करायला लावणारे रूप 'कंचनीच्या महाला'त अनुभवायास मिळते.

ग्रेस म्हणतात, 'संगीत ही प्रत्यक्ष संवेदनांवर आधारलेली सर्वश्रेष्ठ ललितकला आहे. काव्यकला ही कोणत्याही संवेदनांवर प्रत्यक्ष आधारलेली कला नाही. तर ती संवेदनांच्या शब्दप्रतिमांवर आधारलेली कला आहे... म्हणून

स्वरांच्या संघटनेने निर्माण होणारे संगीत व शब्दांच्या संघटनेने निर्माण होणारे संगीत, यात तत्त्वदृष्ट्या भेद आहे...'

गानसरस्वतीला गवसलेली 'स्वरार्थरमणी' म्हणूनच आनंदमय आहे; आणि शब्दांच्या संघटनेतच अडकून पडलेले काव्यसंगीत अपुरेपणाचा शाप भोगीत आहे...

कंचनीच्या महालाप्रमाणे...!

कै. ना. घ. देशपांडेंच्या जन्मशतीनिमित्त हे एक स्मरण !

... आणि त्यांच्याच 'झंकार' कवितेतील प्रार्थना,

'...गीत माझे वेदनांनी थांबता । आत माझ्या नादवंती तार हो !

हेच विलापिकेचे अंतिम 'स्वरसत्य' !'

दिलीप पुरुषोत्तम चित्रे - संवेदनेचा प्रवासी !

(१४ सप्टेंबर १९३८ ते १० डिसेंबर २००९)

ज्ञानदेवांचा 'अमृतानुभव' आणि तुकोबाची गाथा भाषान्तराने वैश्विक पातळीवर नेण्याचे कार्य करणारे बहुआयामी कवी दिलीप पुरुषोत्तम चित्रे आपली संवेदनेची कविता रसिकांसाठी ठेवून अनन्तात विलीन झाले. मराठी काव्यसृष्टीला शब्दसंवेदनेचे अपूर्व लेणे देऊन ते गेले ! कवितेचा अर्थ आणि कवितेची संवेदना भावणे; ह्या दोन भिन्न गोष्टी आहेत. अर्थ हे कवितेचे ध्येय नसून 'संवेदनांचे भावणे' हे आहे. माणसाच्या 'असण्याचे' मूळ शोधण्यासाठी 'दि. पुं.'ची कविता जेजुरीच्या खंडोबापासून ते आयोवासिटी, शिकागो, लंडन, मास्को अशा जगभरातील प्रतिमासृष्टीच्या आशय- संवेदनेच्या तळाशी गेली.

'...मीच शोधत राहिलो, मुळं आणि पारंव्या जगभर, मला पाहिजे होते स्वतःभोवती दाट अरण्य ।

आणि किडामुग्यांशी, पशुपक्ष्यांशी, माणसाची नाती...'

दृश्य सृष्टीकडून अमूर्त-अदृश्य अशा 'साकारण्याच्या सत्त्वाचा' शोध घेण्यासाठी त्यांच्या काव्यप्रतिभेने ज्ञानोबाचा 'अमृतानुभव' आणि तुकोबाच्या गाथांना पाश्चात्य भाषेच्या नजरेने पाहिले. ते 'सत्त्व' वैश्विक असल्याने त्या ग्रंथांचे स्वागत झाले. अमृतानुभवात 'निवृत्ती' हे तत्त्व आहे. बिंब पहायचे असेल तर आरशात प्रतिबिंब पहावे लागते. बिंबाकडे येण्यासाठी प्रतिबिंबाचा, गंधाकडे येण्यासाठी फुलांचा, स्पर्शसंवेदनेकडे जाण्यास वस्तूंचा आधार घेणे अपरिहार्य आहे. 'दिपुं'च्या कवितेचे तत्त्व 'संवेदन' आहे. शब्द हे संवेदनेचे शरीर ! शब्दातून अर्थाच्याही पलिकडची संवेदना देणारी 'दिपुं'ची कविता त्यांच्या जाण्याने अबोल होणारी आहे. 'मोराचे नर्तन आणि मोराचा टाहो' ह्या प्रतिमांमधून कवितेचा शब्दरूप-देह आणि 'टाहो' मधील संवेदना यांचे नाते- शब्दातीत नाते- भावते !

शब्दांचे सामर्थ्य अपुरे म्हणून की काय; दि. पु. चित्रेंनी चित्रकाराच्या भूमिकेतून रेषांच्या सामर्थ्याला आवाहन केले. कलेच्या सर्व दालनात त्यांच्या प्रतिभेने जीवनाच्या असण्याच्या बहुविध संवेदनांचे आविष्कार घडविले. चित्रकार, चित्रपटकथाकार, संकलक, समीक्षक, प्रतिभावान अनुवादक म्हणून त्यांनी आपल्या जीवनात भूमिका वजावल्या. कविता (१९६०), कवितेनंतरच्या कविता (१९७८), 'दहा बाय दहा' (१९८३), एकूण कविता भाग-१ व भाग - २ (१९९२ व १९९५), अनुभवामृत (१९९५), अॅन-अॅनॉलॉजी ऑफ मराठी पोएट्री, अॅम्ब्युलन्स राईड, 'सेज तुका', 'पोस्ट क्लायमेटिकल लय-पोएम', 'ट्रॅव्हलिंग इन ए केज' यासारख्या ग्रंथांनी त्यांना गौरविले. मर्ढेकरांनंतर मराठी कवितेला शब्दप्रतिमांच्या आधारे संवेदनांची प्रत्ययकारी कविता लिहिणारा कवी. समीक्षक, चित्रकार, पटकथालेखक अनन्ताच्या प्रवासाला निघाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो !

प्राचार्य भगवंतराव देशमुख

(५ ऑगस्ट १९२२ ते २९ नोव्हेंबर २००९)

मराठवाड्यातील वाङ्मयीन आणि शैक्षणिक जगताचे शिल्पकार, 'प्रतिष्ठान'चे संपादक, मराठी आणि संस्कृतचे

अभ्यासक, राजाराम कॉलेज (कोल्हापूर) चे प्राचार्य भगवंतराव देशमुख यांचे वयाच्या ८७व्या वर्षी निधन झाले. निजामाच्या राजवटीत उर्दूचे प्राबल्य होते. या प्रतिकूल परिस्थितीत प्रा. देशमुख यांनी मराठी भाषा आणि संस्कृती टिकवून धरण्याचे ऐतिहासिक कार्य केले. इंग्रजी, हिंदी, उर्दू, मराठी, संस्कृत भाषेचे ते अभ्यासक होते. त्यामुळेच त्यांनी केलेले अनुवादाचे कार्य मोठे आहे. मराठी पोवाड्याचे संकलन करणारे डेनिस किंकेड यांनी लिहिलेल्या शिवचरित्राचा त्यांनी अनुवाद केला. सय्यद अमीर खुश्रो यांचे चरित्र आणि हिंदीतील 'अमोल विरासत' ह्या गांधी चरित्राचा त्यांनी अनुवाद केला. डॉ. ना. गो. नांदापूरकर यांच्या मार्गदर्शनाने लोकसाहित्याचे मौलिक संकलन दासोपंतकृत 'गीतार्थ बोध चंद्रिका', 'पंतांची सात आख्याने', एकनाथांच्या स्फुट काव्याचे संपादन केले. 'आलोक' आणि 'मांजराच्या मिशा' हे त्यांचे लघुनिबंध लोकप्रिय झाले. त्यांना महाराष्ट्र साहित्य परिषदेची श्रद्धांजली !

सु. कुलकर्णी

(संपादक)
(महाराष्ट्र साहित्य पत्रिका, पुणे ३०)

संपर्क : ७ गायकवाड वसाहत, सावेडी मार्ग,
अहमदनगर. संपर्क : ०२४१-२४२९७५५

साहित्यात समाजमन घडविण्याचे सामर्थ्य !

- नामदार अजितदादा पवार (ऊर्जामंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री)

[८३व्या अखिल भारतीय साहित्यसंमेलनाच्या कार्यालयाचे उद्घाटक मान. ऊर्जामंत्री नामदार अजितदादा पवार यांनी आपल्या सहजप्रवाही भाषणात, मराठी भाषा आणि साहित्य याविषयी व्यक्त केलेले विचार मननीय आहेत. त्यातील निवडक भाग वाचनसुखार्थ पुनर्मुद्रित करीत आहोत. – संपादक]

मार्च २०१० मध्ये होणाऱ्या ८३वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरविण्याचा मान आपल्या पुणे शहराला मिळालेला आहे.

पुणे शहराच्या आणि संपूर्ण राज्याच्या भूषण असलेल्या संस्था म्हणजे पुण्यभूषण फौंडेशन आणि महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे संयुक्तरित्या ह्या साहित्य संमलेनाच्या आयोजनाची जबाबदारी पार पाडणार आहेत. पुण्यभूषण फाउंडेशनचे कार्य मी अनेक वर्षापासून पहात आहे. ही संस्था देत असलेला पुण्यभूषण पुरस्कार हा देशातील एक अतिशय मानाचा पुरस्कार आज मानला जातो. याशिवाय 'दिवाळी पहाट' सारखे सांस्कृतिक उपक्रम, अनेक सामाजिक उपक्रम राबविणारी पुण्यभूषण फाऊंडेशन ही संस्था आणि महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे त्यांच्यावर असलेली जबाबदारी उत्तमरीतीने पार पाडणार यात माझ्या मनामध्ये तीळमात्र शंका नाही. त्यांना या शहरातील सर्वच संस्थांचा मग ती पुणे महानगरपालिका असो किंवा अन्य संस्था असोत, त्या संस्था आपले संपूर्ण सहकार्य निश्चितपणे देणार आहेत, याबाबत मला खात्री आहे. आपण सर्वजण एकत्रितपणे, परस्पर सहकार्याने हे साहित्य संमेलन यशस्वीपणे पार पाडणार आहोत.



मित्रहो, आपल्या पुण्याची ओळख विद्येचे माहेरघर,सांस्कृतिक नगरी, चांगल्या हवामानाचे शांत शहर अशी यापूर्वी होती. त्याच्यामध्ये आता खेळनगरी, आय्.टी. शहर, उद्योगनगरी अशी बिरुदावली आपल्या शहराला मिळालेली आहे. म्हणूनच आपण आयोजित करणार असलेले ८३वे साहित्य संमेलन हे आधुनिक काळाला साजेसे असे 'हायटेक' साहित्य संमेलन व्हावे, त्याचबरोबर सर्व स्तरातील जनतेचा त्यामध्ये सहभाग व्हावा; असे मला मनापासून वाटते.

गेल्या १३०० वर्षापासून प्रचलित असलेली, इंडो-युरोपीयन भाषाकुळातील एक महत्त्वाची भाषा म्हणजे आपली मराठी भाषा आहे. आजच्या घडीला महाराष्ट्र आणि गोवा या दोन राज्यांची अधिकृत राजभाषा असलेली आपली मराठी ही प्रथम भाषा म्हणजे मातृभाषा असणाऱ्यांच्या लोकसंख्येनुसार जगातील पंधरावी व भारतातील चौथी भाषा आहे. सुमारे नऊ कोटी लोक मराठी भाषा बोलतात. अशी ही आपली मातृभाषा जोपासायची, त्याचे संवर्धन करण्याची जबाबदारी आपणांसर्वांची आहे. त्यातही साहित्यिकांची जबाबदारी विशेष आहे; कारण समाजमन बदलविण्याचे मोलाचे कार्य साहित्यिक करीत असतात. ज्या प्रदेशामध्ये, देशामध्ये, साहित्याची प्रगती होते. साहित्याचा विकास होतो; त्या प्रदेशाचा, त्या देशाचा निश्चितपणे विकास होत असतो. मात्र साहित्याची अधोगती ही त्या देशाच्या ऱ्हासाची चाहूल असते. 'कलेचा उपयोग काय?' ह्या प्रश्नाचे थेट उत्तर 'शून्य' असेच आहे. परंतु मनाचे परिवर्तन घडविण्याची क्षमता कलेमध्ये आहे. भाकरी मिळविण्यापासून क्रांती करण्यापर्यंत कुठलीही कृती करण्यास उद्युक्त करण्याचे सामर्थ्य कलेमध्ये आहे. साहित्य हे अवघ्या विश्वातील घडामोडींचे लहान-मोठे, सुकृत-विकृत प्रतिबिंब असते, असे मानले जाते. साहित्य-कला ही मध्यमवर्गाची मक्तेदारी नाही, परंतु जगभरच मुख्यतः याच वर्गाचा प्रभाव वा ठसा सांस्कृतिकतेवर राहिला आहे.

१९६०च्या काळातील मध्यमवर्गसुद्धा जेमतेम

अनुक्रमणिका

परिस्थितीत होता. रेशनवरील धान्य, पाण्यासाठी रांग, अशा असंख्य अडथळ्यातून वाट हुडकत होता. आपल्यापेक्षा भीषण अवस्थेमध्ये झोपडपट्टीमधील माणसे आयुष्य कंठतात. त्यांची भाषा, स्वभाव संघर्ष यांना भिडविण्याचे कार्य विंदा करंदीकर, भाऊ पाध्ये, नारायण सुर्वे, दलित पँथरशी संबंधित कवी आदि साहित्यप्रेमींनी केले. लोक पेटून उठतील; आणि बदल घडवतील, ही आशा त्यातून व्यक्त होत होती. विज्ञानातील भरारीमुळे माणूस आणि समाज बदलेल; अशी शक्यता वाटत होती. ह्या प्रवाहात बंडाचे स्फुल्लिंग होते. त्याचप्रमाणे भविष्यावद्दल आशावाद होता. ह्या काळातील दुसरा प्रवाह विजय तेंडुलकर, जी.ए., चिं.त्र्यं. खानोलकर यांचा होता. त्यांना मानवी प्रवृत्तीचा तळ दाखवायचा होता. मनोरुग्ण, हिंसकतेला सामोरे जायचे होते. त्यामागील कारणांचा अन्वय न लावता केवळ दर्शन घडविण्याची भूमिका होती. नियती हीच व्यक्तीच्या दुःखास कारणीभूत आहे. या निष्कर्षाला जी.ए.च्या कथा येत होत्या. खरोखरीच दुसरे कारण तरी काय ? नियतीपुढे काही नाही ! महाभारतापासून माझ्या अवस्थेपर्यंत सर्व घटनांचे निदान एकच 'नियती' असा महान् विचार करून मराठी वाचक स्वस्थ झाला. अर्थातच तेंडुलकर, खानोलकर व जी.ए. हे एकाच विचारप्रवाहातले नव्हते; पण त्यांच्यावर नववास्तववाद-अस्तित्ववाद आणि आधुनिक नियतीवादाचा प्रभाव होता. कुटुंब व शासनसत्ता निरर्थक आहेत. याची जाणीव भालचंद्र नेमाडे करून देत होते, तर विलास सारंग, दि. पु. चित्रे यांना मानवी अस्तित्वाचा अदमास लावायचा होता. पु. ल. देशपांडे, प्र. के. अत्रे, द. मा. मिरासदार इत्यादि अनेक साहित्यिकांनी आपापल्या लेखन शैलीचा प्रभाव निर्माण केला.

त्या काळात जगभर अस्तित्ववादी विचारांची लाट होती. माणसाच्या असण्याला, इच्छेला काही अर्थ आहे काय, सभोवतालच्या सत्तेपुढे व्यक्ती क्षुद्र आहे. माणूस ही एक व्यर्थ यातना आहे. आपल्या इच्छेविना आपण जन्माला येतो; आणि मरतो. मृत्यू ही एकमेव निवड आपण करू शकतो. जगण्यातील अर्थ शोधणे ही व्यर्थ धडपड आहे. असे 'निरर्थकाचे' तत्त्वज्ञान आकर्षक व आक्रमकरित्या मांडले जात होते. त्याचवेळी आधुनिक विचारांना आधुनिकवादाची जोड मिळाली. धर्म, वर्ग, लिंग, वर्ण यावर आधारित भेदाभेद नष्ट करून नवा समाज घडविण्याची उमेद आधुनिक विचारांनी निर्माण केली. त्यातूनच आजचा आधुनिक नवसमाज निर्माण झाला आहे, विकसित होत आहे.

मोबाईल, इंटरनेटच्या या जमान्यामध्येदेखील साहित्याची आणि साहित्यिकांची समाजाला तेवढीच गरज आहे; जेवढी मागील शतकामध्ये होती. किंबहुना जगण्याच्या वेगापुढे हतबल झालेल्या, गोंधळलेल्या आपल्या समाजाला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करण्याची जबाबदारी आजच्या साहित्यिकांची आहे म्हणूनच साहित्याचे संवर्धन झाले पाहिजे. त्याचाच एक भाग म्हणजे साहित्य-संमेलने आयोजित होणे; ती यशस्वी होणे होय ! ही आजच्या काळाचीच गरज आहे. म्हणून आजच्या या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर आपण प्रतिज्ञा करूया की, आपल्या भाषेच्या संवर्धनासाठी आपण यापुढेही प्रामाणिकपणे कार्यरत राहू. ज्या-ज्या माध्यमातून भाषा संवर्धन शक्य आहे; त्या-त्या सर्व आयुधांचा वापर करून आपल्या भाषेची पताका जगभर फडकत ठेवू !

शेवटी ८३व्या साहित्य संमेलनाच्या यशस्वी आयोजनाकरिता सर्वांनाच शुभेच्छा देतो; आणि माझे दोन शब्द संपवितो.

धन्यवाद !

❖❖❖

अनुक्रमणिका

भारतातील नव आधुनिकतावाद

प्रा. कीर्ती मुळीक

[भौतिक सुधारणांबरोबर समाजाच्या सर्व जीवनांगांवर भले-बुरे परिणाम होतात. संगणकयुगामुळे सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात झालेल्या आणि होऊ घातलेल्या बदलाचे हे चित्रण- नव-आधुनिकतावादाचे स्वरूप. - संपादक]

देश-काल-परिस्थितीच्या संदर्भाशिवाय कुठल्याही साहित्य प्रकाराची समीक्षा करता येत नाही; किंवा त्याचा आस्वादही घेता येत नाही. या कारणाने त्या-त्या काळातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक अशा विविध पातळ्यांवरील परिस्थितीचा आढावा नोंदवून ठेवणे गरजेचे ठरते. वाङ्मयाच्या इतिहासात असा आढावा महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे भविष्यातील वाचकाला त्या भूतकाळातील परिस्थितीचा अंदाज येतो. हा परिस्थिततीचा संदर्भ वाचकाच्या लक्षात आला तर त्याला त्या साहित्यातील पार्श्वभूमी माहीत होऊन साहित्याचे आकलन सहजपणे होते.

मराठी वाङ्मयाचा इतिहास लिहिताना आदियुग, मध्ययुग आणि आधुनिकयुग असे तीन कालखंड स्पष्टपणे केलेले दिसतात. याशिवाय आधुनिकयुगातील साहित्याची समीक्षा करताना वास्तववाद, अतिवास्तववाद, अस्तित्ववाद, आधुनिकतावाद या रीतीने पुन्हा कालखंडाची विभागणी केली आहे. पुन्हा या प्रत्येक विभागाचे विविध पातळ्यांवरील वेगळेपण व वैशिष्ट्ये स्पष्ट केली आहेत. त्यामुळे 'बळी', 'रणांगण', 'पाचोळा', 'गोतावळा', 'झाडाझडती' यांसारख्या कादंबऱ्या किंवा 'बलुतं', 'अक्करमाशी', 'आयदान' यांसारखी दलित आत्मकथने यांतील सामाजिक संदर्भ सहजपणे लक्षात येत जातात.

भारतात इ.स. १८५० पासून आधुनिक साहित्याला सुरुवात झाली. हा आधुनिक कालखंड व त्याचे विविध विभाग यांची राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक इत्यादी वैशिष्ट्ये अर्वाचीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासात सविस्तरपणे नोंदविलेली दिसतात. संगणकाची निर्मिती व औद्योगिक क्षेत्रातील त्याचा वापर यांबरोबर आधुनिक कालखंड संपून नवआधुनिक कालखंडास सुरुवात झाली. ह्या वीस वर्षात नवआधुनिक कालखंडाची वैशिष्ट्ये व आधुनिक कालखंडापेक्षा त्याचे असलेले वेगळेपण ठळकपणे लक्षांत येऊ लागले आहे. ही वैशिष्ट्ये एकत्रितपणे नोंदविल्यास त्याचा ह्या काळातील साहित्याच्या आकलनास मदत होईल. नवआधुनिक साहित्यातील विचारधारा वाचकांना समजणे सोपे होईल या हेतूने येथे भारतात दिसून येणारा नवआधुनिकतावाद स्पष्ट करीत आहे.

युरोपमध्ये १८व्या शतकातील औद्योगिक क्रांतीबरोबर आधुनिकतेची संकल्पना पुढे आली. औद्योगिक क्रांतीमुळे मानवाच्या जीवनशैलीवर विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा प्रभाव वाढला. त्यामुळे तो नवीन मूल्यांचा स्वीकार करू लागला. प्रत्येक मूल्य वास्तवाच्या पातळीवर तपासून घेऊ लागला; नि मगच ते अंगिकारू लागला. त्याने परंपरागत आचार, विचार, रूढी, कर्मकांड यांना विरोध केला. यातून धर्मसुधारणा, धर्मप्रबोधन होऊ लागले. या सर्वांचा समाजजीवनावरील एकत्रित परिणाम म्हणजे आधुनिकता होय.

कोणतीही संकल्पना ही तिच्या समाजाशी होणाऱ्या प्रक्रियांमधून तपासली जाते. तिचे समाजातील आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, वाङ्मयीन, शैक्षणिक, धार्मिक क्षेत्रांवर होणारे परिणाम, प्रभाव यांमधून तिची मूल्ये निश्चित केली जातात. ह्या सर्वांमधून संकल्पनेचे वस्तुनिष्ठ रूप स्पष्ट होत जाते. तिची निश्चित व्याख्या करता येऊ लागते. नवआधुनिकतावाद ह्या संकल्पनेचाही याच पद्धतीने विचार करावा लागतो.

नवआधुनिकतावाद हे आधुनिकतावादाचे पुढचे पाऊल म्हणता येईल. तंत्रज्ञानातील अत्युच्च सुधारणा, विज्ञानाचे मानवी जीवनावरील पूर्ण वर्चस्व, जागतिकीकरणातून निर्माण झालेल्या विज्ञाननिष्ठ नव्या जाणिवा, जुनी मूल्ये, संस्कृती यांच्याशी निष्ठ-अनिष्ठाचा विचार न करता घेतली गेलेली संपूर्ण संघर्षाची भूमिका, यातून निर्माण होऊ लागलेली नवी मूल्ये; ह्याप्रमाणे नवआधुनिकतेची लक्षणे स्पष्ट करता येतात.

अनुक्रमणिका

आधुनिकतेच्या उत्तरकाळात 'कॉम्प्युटर' अर्थात् संगणकाची निर्मिती झाली; - आणि मानवाचे नवआधुनिकतेमुळे पहिले पाऊऊल पडले. संगणक आणि त्याचे अंतर्जाल (इंटरनेट) ह्यामुळे जागतिक पातळीवर अनेक खळबळजनक घडामोडी घडल्या. संगणकाच्या अंतर्जालामुळे जग जवळ आले, जगातील कोणत्याही कानाकोपऱ्याशी संपर्क साधणे शक्य झाले. इतकेच नव्हे; तर ग्रह, परग्रहावरील फोटो काढणे शक्य झाले. त्यामुळे आज चंद्रावर पाणी असल्याचे पुरावे मिळू लागले आहेत. मानव पृथ्वी सोडून चंद्रावर वस्तीला जाण्याची स्वप्ने पाहू लागला आहे. संगणकामुळे आज नवी औद्योगिक क्रांती झालेली दिसून येते. भारतात १९८५ मध्ये तेव्हांचे पंतप्रधान राजीव गांधी यांच्या प्रेरणेतून संगणकाचा वापर सुरू झाला. यंत्रयुगातील अवजड यंत्रांची जागा आता मायक्रोचिप्स, लॅपटॉप यांसारख्या सहज हाताळता, येतील अशा वस्तूंनी घेतली आहे. नदीवर पूल बांधणे, धरण बांधणे, समुद्रामधून टनेलमार्ग बांधणे, फ्लायओव्हर यांसारखी बांधकामे अत्युच्च पातळीवरील तंत्रज्ञानामुळे सोपी झाली आहेत. आज मोबाईल, इंटरनेट, फॅक्स यंत्र ही दूरपर्यंत संपर्क साधणारी महत्त्वाची माध्यमे झालेली आहेत. वातावरणातील ध्वनिलहरींवर ही माध्यमे कामे करतात. यामुळे पूर्वीचे तारायंत्र हे एक अवजड यंत्र आता कालबाह्य झाले आहे. माणसाद्वारे पोहोचती केली जाणारी टपालसेवा आता बंद पडू लागली आहे,

अमेरिकेसारखा प्रगतदेश आज भारतासारख्या मनुष्यबळ जास्त असणाऱ्या देशाकडून संगणकाद्वारे आपली कामे करून घेऊ लागला आहे. त्यासाठी भारतीय माणसाने उठून अमेरिकेला जाण्याची आवश्यकता भासत नाही. भारतातील आपल्या घरात बसलेल्या त्याला त्याच्या कामाचे स्वरूप इंटरनेटद्वारा समजावून दिले जाते. त्यानुसार तो आपले काम करून ते इंटरनेटद्वारा अमेरिकास्थित आपल्या अधिकाऱ्यांकडे पाठवतो. त्याला या कामाचा मोबदलाही ई-बँकिंगद्वारा आपल्या घरी मिळतो. आज भारतात मोठ्या संख्येने निर्माण झालेल्या बी.पी.ओ. सारख्या कंपन्या, मेडिकल ट्रान्सक्रिपशन ही याचीच उदाहरणे आहेत. याचेच पुढचे पाऊल जागतिकीकरण म्हणता येईल. भारतासारख्या देशात भरपूर मनुष्यबळाची उपलब्धता, कमी आर्थिक उलाढालीमध्ये काम होण्याची खात्री, अनुकूल हवामान, जागेची उपलब्धता, कायदेनियमातील ढिलाई ह्या कारणांनी अनेक परदेशी कंपन्या भारतात कारखाने उभारून उत्पादन-निर्मिती व उत्पादनाचे मार्केटिंगही करताना दिसतात. भारताच्या पुणे, मुंबई, ठाणे, बंगलोर, चेन्नई, कलकत्ता, दिल्ली यांसारख्या महानगरांतील सुशिक्षित, उच्चविद्याविभूषित माणूसही या गोष्टींना सरावलेला असल्याने त्याला जागतिकीकरणाचे फायदे मिळू लागले आहेत. त्यातून तो ऐषोरामी जीवन जगू लागला आहे. आजच्या आय्.टी. कंपन्या नि तिथे काम करीत असलेला भारतीय माणूस ही याची उदाहरणे आहेत. भारतातील नवआधुनिकतेचे पहिले पाऊल अशा रीतीने स्पष्ट करता येईल.

जागतिकीकरणामुळे महानगरातील पूर्वीचा मध्यमवर्गीय आता उच्चमध्यमवर्गीय झाला आहे. त्याचा समाजातील आर्थिक स्तर उंचावला आहे. आय्.टी., बी.पी.ओ. किंवा कुणा परदेशी कंपनीचे सहकार्य घेऊन काम करणाऱ्या कंपनीत तो दिवसाचे दहा ते बारा तास नोकरी करतो. त्यावदल्यात त्याला महिन्याला अर्धा लाख रुपये वेतन प्राप्त होते. पैशांची कोणतीही कमतरता नसल्याने व नोकरीपलिकडे कोणतेही मोठे ध्येय ठेवलेले नसल्याने तो अत्याधुनिक सुखसोयींचा उपभोग घेऊ लागतो. अत्याधुनिक इ-हौसिंग सोयी असणारा प्लॅट, स्वीमिंग पूल, क्लब, हॉटेल अशा ठिकाणी जाऊन तो आठवडाभराच्या दगदगीचा निचरा करून पुन्हा कामासाठी सज्ज होतो. जमलंच तर सहा महिन्यातून एखादी थंड हवेच्या ठिकाणी किंवा परदेश सहल करून येतो. अत्याधुनिक राहणीमान स्वीकारलेले असल्याने बहुभाषिक कॉस्मोपॉलिटन वस्तीत राहणे त्याला आवडू लागले आहे. जागतिकीकरणाचे हे 'लोणी' किंवा आजच्या सांकेतिक भाषेत बोलायचे तर 'क्रीम' भारतासारख्या शेतीप्रधान देशात किती टक्के लोकसंख्येला मिळते आहे ? महानगरे वगळता इतरत्र काय परिस्थिती आहे ?

बहुतेकवेळा असे घडते की, नव्या योजनांचा लाभ हा समाजातील आर्थिकदृष्ट्या उच्चस्तरीय वर्गांना मिळतो नि निम्नस्तरीय, तळागाळातला वर्ग, खेड्यातील सामान्य

माणूस या योजनांच्या नावाने पुन्हा भरडलाच जातो. जागतिकीकरणात देखील हेच घडलेले दिसून येते आहे. 'एस.इ.झेड.'च्या नावाखाली शेतकऱ्यांच्या जमिनी सरकारने ताब्यात घेणे; हे याचे महत्त्वाचे उदाहरण आहे. संगणक आला असला तरी खेड्यातील तरुणपिढी आजही इंग्रजी भाषेला विचकते. ह्या तरुणाला इंग्रजीभाषा पूर्णपणे अवगत नाही, तिच्यावर त्याची 'कमांड' नाही. ह्या कारणाने संगणकाच्या वापराबाबतची किमान कौशल्येही तो आत्मसात करू शकलेला नाही. तो अशा कौशल्यांचे शिक्षण महागड्या शिक्षणसंस्थांमुळे, वारेमाप शुल्क आकारणीमुळे घेऊ शकत नाही. संगणकाच्याबाबतीत सतत घडून येणाऱ्या नवनव्या बदलांमुळे नि त्या बदलांशी जुळवून घेता येत नसल्यामुळे हा खेड्यातील तरुण जागतिकीकरणाच्या व नवआधुनिकतेच्या प्रवाहात पूर्णांशाने सामील होऊ शकलेला नाही.

संगणकाचा व्यावसायिकदृष्ट्या वापर हे महानगरातील निम्न मध्यमवर्गालादेखील जमलेले नाही. योग्य व्यावसायिक कौशल्ये नसल्याने, याचाच अर्थ संगणक नीटपणे हाताळू शकत नसल्याने हा वर्ग औद्योगिक कंपन्यांमधील नोकरीतून बाहेर फेकला गेला आहे. ह्या वर्गातील बहुसंख्य लोक छोटेमोठे उद्योग करून उदरनिर्वाह करीत असतात. रस्त्याच्या कडेला त्यांच्या उद्योगाच्या छोट्या टपऱ्या असतात. पण महामार्ग, रस्तारुंदी, अतिक्रमण, आधुनिक सुधारणा यांच्या नावाखाली टपऱ्या हटविल्या जातात. चारचाकी, दुचाकी गाड्यांना पार्कींगसाठी रस्त्यावर जागा दिली जाते पण जिवंत माणसाने दोन वेळचे पोट भरण्यासाठी उभ्या केलेल्या टपरीला मात्र जागा दिली जात नाही. पर्यायाने हा वर्ग बेकारीला सामोरा जाऊ लागला आहे. जागतिकीकरण आणि उद्योग व्यवसायांचे संगणकीकरण ह्यामुळे निर्माण झालेली ही वस्तुस्थिती आहे.

जागतिकीकरणाचे शेतीला किती फायदे झाले; याचा विचार करता भारतातून शेतमालाची निर्यात वाढलेली दिसते. आंबा, द्राक्षे आदि फळे व फुले यांची वाढती निर्यात होत आहे. देशात साखर कारखाने, वाईनरी मोठ्या संख्येने वाढू लागल्या आहेत. त्यासाठी ऊस, द्राक्षे, कापडीगिरण्यांसाठी कापूस यांचे उत्पादन शेतकरी करू लागला आहे. पण आजही वाढत्या विज्ञान व तंत्रज्ञानाच्या काळात भारतातील शेती निसर्गावरच अवलंबून आहे. शेतीतील उत्पादन हे देखील शेतकऱ्याला विविध दबावांखाली निश्चित करावे लागते. साखर कारखाने, कापडगिरण्या, वाईनरी यांच्या वाढत्या संख्येनुसार, आदल्या वर्षी त्यांनी दिलेल्या बाजारभावानुसार शेतकरी नगदी पिके घेतो. आयातनिर्यातीच्या दलालांशी त्याचा संबंध आल्यास संकरित बी-बियाणे निश्चित करून तो त्या पिकांच्या उत्पादनांचा विचार करू लागतो. आजच्या जागतिकीकरणातील ग्रीन हाऊस इफेक्ट, ओझोन वायूच्या आवरणाला पडलेली छिद्रे, आत्यंतिक औद्योगिकीकरण, वाढत्या यंत्रांच्या वापरामुळे होणारे प्रदूषण या सर्वांचा परिणाम पाऊस पाण्यावर, हवामानावर होतो व त्याचे तोटे या निसर्गचक्रावर शेतीसाठी अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्याला भोगावे लागत आहेत.

नवआधुनिकतेच्या काळातही शेतकऱ्यांचे शोषण वाढतच चालले आहे. उलट त्याच्या शोषणाची नवी व्यवस्था उभी राहताना दिसत आहे. त्याच्यासाठी सरकारने काही योजना राबविल्या असल्या तरी प्रत्येक योजनेच्या दारावर या शेतकऱ्याला लुबाडणाऱ्या दलालांची रांग लागलेली आहे. योजनेतून मिळणारा पैसा दलालांना, भ्रष्टाचारी सरकारी अधिकाऱ्यांना, गावपाटलाला, राजकीय पुढाऱ्याला, पक्ष कार्यकर्त्यांना, पोलिसाला देतादेताच शेतकऱ्याच्या हातात काहीही उरत नाही. पुन्हा नवे अर्ज करणेच त्याच्या नशिबी येते आहे. बाजारपेठेत आजही शेतीमालाव्यतिरिक्त इतर सर्व उत्पादनांचा भाव निश्चित असतो. शेतकरी पीक काढतो पण आजही त्याचे भाव महानगरात बसणारे दलाल-आडतिया ठरवतात; याबाबतीत शेतकऱ्यांशी सल्ला-समलत करण्याची त्यांना गरजही भासत नाही. 'केळी पिकते खानदेशच्या मळ्यात; पण तिचा बाजार मात्र भरतो दिल्लीच्या आसादपूर मंडीत', अशी स्थिती आजही असल्याने दलालांचे फावते तर नाशवंत पीक असल्याने शेतकऱ्याची मात्र फरफट होते. एकाधिकाराचे फायदेतोटे आणि माल परराज्यात नेण्याला बंदी अशा दुहेरी दुष्टचक्रात सापडलेला शेतकरी आज आत्महत्या करून मरणाला कवटाळत आहे. नवआधुनिकतेच्या काळातही

शेतकऱ्याला न्याय मिळालेला नाही, खेडी उदास भग्न होत कोलमडून पडत आहेत, ग्रामीण अर्थव्यवस्था कोलमडत आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेचे चिंतन व त्या चिंतनाचा वास्तव मार्ग आजही अवलंबिला जात नाही; असेच चित्र आहे. बोथट संवेदना, मूल्यहीनता हे नवआधुनिकतेचे प्रमुख लक्षण झाले आहे, हेच यावरून लक्षात येते.

आज राजकारणात मूल्यहीनता जास्त जाणवते. हिंदुस्थानात सर्व प्रथम काँग्रेस पक्षाची स्थापना स्वातंत्र्याच्या ओढीतून झाली. देशाचे स्वातंत्र्य, हिंदुस्थानी सरकार हे ध्येय समोर ठेवून या पक्षाची वाटचाल होत राहिली स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सत्ताप्राप्ती हे या पक्षाचे ध्येय राहिले. स्वतंत्र भारतात पुढे सत्तालालसेतून अनेक पक्ष निर्माण झालेले दिसतात. असे असले तरी १९६० ते ७५ पर्यंत कोणत्यातरी एका विचारसरणीला चिकटून राहून हे पक्ष वाटचाल करीत होते. ह्या काळात हिंदुत्ववादी, समाजवादी, आंबेडकरवादी, मार्क्सवादी अशा विविध विचारसरणी पक्षांना प्रभावित करताना दिसतात. या विचारधारांना विविध पक्षांनी आपले मूल्य मानले होते. त्यामुळे या पक्षांतील व्यक्तीदेखील मूल्यनिष्ठ, ध्येयनिष्ठ, चारित्र्यवान व नेक होत्या. त्यामुळे जनतेला जरी एखाद्या नेत्याचा विचार पटत नसला; तरी वरील गुणांमुळे तो नेतादेखील जनतेत आदरास पात्र असे. आज पक्षांचीदेखील वैचारिक बैठक खंबीर दिसत नाही. सत्ताप्राप्तीसाठी इतर पक्षांशी युती, आघाडी करण्यास पक्ष तयार असतात. पूर्वीची पक्षाची मूल्यनिष्ठा, ध्येयनिष्ठा आज दिसून येत नाही. 'आडातच नाही, तर पोहऱ्यात कुठून ?' ह्या उक्तीप्रमाणे पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्येदेखील पक्षनिष्ठा दिसत नाही. निवडणुका जवळ आल्या, पक्षांचे उमेदवार निश्चित होऊ लागले की; मोठ्या प्रमाणात बंडखोरी दिसून येते. तिकीट मिळविण्यासाठी बंडखोरी करून दुसऱ्या पक्षात प्रवेश करणे, अपक्ष म्हणून उभे राहणे हे प्रकार आज सर्रास घडत आहेत. प्रसंगी त्याग केलेल्या पक्षावर, त्या पक्षातील अधिकारी व्यक्तींवर विषारी टीका करण्यासही ह्या व्यक्ती मागेपुढे पाहत नाहीत. जनतेचे प्रतिनिधी म्हणून निवडून आलेले बहुतांशी उमेदवार वैयक्तिक लाभ प्राप्त करण्यात मग्न असताना दिसतात. त्यांचे; मिळालेल्या सत्तेचा दुरूपयोग करून स्वतःच श्रीमंत होण्याचे उद्योग सुरू होतात. त्यामुळे स्वीस बँक व तेथील विविध व्यक्तींची खाती याबद्दल सामान्यजनांची उत्सुकता वाढलेली दिसते. अनेक प्रतिनिधींनी सरकारकडून विकासकामासाठी मिळणाऱ्या अनुदानांचा विकासासाठी उपयोग करण्यात निष्क्रियता दाखवली आहे.

व्यावसायिक दृष्टीकोन बाळगून व्यक्ती राजकारणाशिवाय इतरही क्षेत्रांत शिरकाव करताना दिसतात. आपले वर्चस्व शाबूत ठेवणे; ही यामागील महत्त्वाची भूमिका दिसते. शिक्षणसंस्था स्थापन करणे, प्रसारमाध्यम, एखादा वर्तमानपत्र समूह ताब्यात ठेवणे, साखर कारखान्याचे संचालकपद स्वीकारणे, विविधक्षेत्रातील प्रतिष्ठित पदे ताब्यात घेणे, विविध निवडसमित्यांत सामील होणे आदी गोष्टी या व्यक्ती करीत आहेत. ह्याशिवाय आपल्या प्रदेशात स्थानिक पातळीवर पक्षाऐवजी अशा व्यक्तीशी निष्ठा राखणारे कार्यकर्ते निर्माण करून स्वतःचा प्रभाव ठेवणे, अशा कार्यकर्त्यांनी स्थानिक पातळीवर गुंडाराज निर्माण करणे, मनमानी करणे; हे सर्रास घडत आहे. हे कार्यकर्ते समाजसेवेपेक्षाही पैशाच्या आमिषापोटी राजकीय पुढाऱ्याच्या छत्राखाली आलेले दिसतात. त्यांची पार्श्वभूमी अनेकदा गुन्हेगारीची दिसते. आपापल्या भागात ते दहशत माजविताना, स्थानिक लोकांना त्रास देतानाच दिसतात. काहीही केले तरी त्यांना आपल्या पुढाऱ्याकडून अभय मिळत असते. विविध स्थानिक पातळ्यांवरील एकगठ्ठा मते मिळविण्यासाठी पुढारीही या कार्यकर्त्यांच्या गुंडगिरीकडे दुर्लक्ष करतात. खेड्यातही यापेक्षा वेगळी परिस्थिती दिसत नाही.

राजकीय नेत्यांच्या मालकीची किंवा प्रभाव असणारी वर्तमानपत्रे त्या नेत्याला अनुकूल अशाच बातम्या प्रसारित करतात. पत्रकारिता हा आज कुणाही सोम्यागोम्याचा उद्योग झालेला असल्याने तसेच ह्या क्षेत्रात स्पर्धा वाढलेली असल्याने समाजस्थितीचे अभ्यासपूर्ण, पूर्ण जाणकारीने, नैतिकता-अनैतिकतेचे भान ठेवून वार्तांकन केले जात नाही. पूर्वी प्रसारमाध्यमे हे समाजप्रबोधनाचे एक महत्त्वाचे साधन होते. पण आज मात्र जनक्षोभ माजविणे हेच बहुतेक प्रसारमाध्यमांचे

लक्ष्य असलेले दिसते. पत्रकारितेत उथळपणा आलेला आहे. पूर्वी वर्तमानपत्रातून ललित साहित्य प्रकाशित केले जाई. पण आज मात्र व्यावसायिकतेच्या मागे लागल्याने वर्तमानपत्रेही ललित साहित्याऐवजी व्यावसायिक जाहिराती प्रसिद्ध करण्यास उत्सुक असतात.

आपल्या घटनेने 'धर्मातीत राज्य' या कल्पनेचा स्वीकार केलेला आहे. राज्याचा कोणताही विशिष्ट धर्म असणार नाही, सर्व धर्मांना समान वागणूक मिळेल; असा 'धर्मातीत राज्य' या कल्पनेचा घटनाकारांना अर्थ अभिप्रेत आहे. आज ही स्थिती राहिलेली नाही. गुजरातमध्ये राजकारणात व त्यामुळे तेथील समाजकारणातही हिंदुधर्मियांचे प्रावल्य दिसून येऊ लागले आहे. राज्यांची भाषिक अस्मिता तीव्र होऊ लागली आहे. त्यामुळेच महाराष्ट्रात परप्रांतीयांना हाकलून लावण्याचे आदेश दिले जाऊ लागले आहेत. महाराष्ट्रातील नवीन स्थापन झालेल्या 'महाराष्ट्र नवनिर्माण सेना' अर्थात 'मनसे' ह्या पक्षाने भाषिक अस्मितेच्या जोरावर २००४ व २००९ च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीतून स्वतःचे अस्तित्व सिद्ध केले आहे. हा पक्ष महाराष्ट्रात लोकप्रिय होऊ लागलेला आहे.

लोकांची किंवा राज्यांची भाषिक अस्मिता तीव्र होण्यामागील कारणही जागतिकीकरण आहे. जागतिकीकरणामुळे विविध राज्यांत नगर, महानगरांचा औद्योगिक विकास होऊ लागलेला आहे. त्यामुळे ह्या ठिकाणी योग्य कौशल्यप्राप्त अशा मनुष्यबळाची गरज वाढू लागलेली आहे. त्यामुळे दक्षिण व उत्तर भारतातून अनेक गुणवत्ताधारक व्यक्ती महाराष्ट्रात नोकरीसाठी आलेल्या दिसतात. सतत पूरस्थितीला सामोरे जावे लागत असल्याने उत्तरप्रदेश, उष्ण हवामानामुळे मर्यादित विकास झालेले राजस्थान आदि प्रदेशांतून सामान्यजन नोकरीधंदा मिळविण्यासाठी महाराष्ट्रात स्थलांतर करताना दिसतात. यामुळे महाराष्ट्र राज्यात परप्रांतीयांची संख्या वाढत असून त्यांतून सार्वजनिक सोयीसुविधांचा अभाव, जागेची टंचाई, स्थानिकांना विनारोजगार रहावे लागणे, वाढती गुन्हेगारी आदि समस्यांना सामोरे जावे लागत आहे. परप्रांतीयांनी महाराष्ट्रातही आपली भाषिक, धार्मिक अस्मिता जपू पाहिली आहे. त्यातून तीव्र स्वरुपाच्या संघर्षाला सामोरे जावे लागत आहे. इतर देशांतही असे संघर्ष परदेशस्थ व्यक्तींच्या बाबतीत घडताना दिसतात. नवआधुनिकतेच्या या काळात हे संघर्ष प्रकर्षाने सामोरे येताना दिसतात.

शिक्षणक्षेत्राचा विचार करता; विनाअनुदानित इंग्रजी माध्यमाच्या शाळांची वाढती संख्या, बारावीनंतरच्या उच्च अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी वाढत्या स्पर्धा परीक्षा, केंद्रीय पातळीवरील प्रवेश प्रक्रिया, मराठी माध्यमांच्या शाळांत पहिलीपासून इंग्रजी विषयाचा अभ्यास, त्याच धर्तीवर मराठी विषयाचा इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून अभ्यास, वाढते शैक्षणिक शुल्क, नव्या शाळा व महाविद्यालये सुरू करण्यामध्ये राजकीय पुढाऱ्यांचा वाढू लागलेला रस, खाजगी कोचिंग क्लासेसचे वाढते प्रस्थ आणि ह्या सर्वांमुळे घाण्याच्या बैलासारखी झालेली विद्यार्थ्यांची अवस्था, ह्यामुळे मुलाच्या विविध शैक्षणिक समस्यांना तोंड देता देता पालकांची होऊ लागलेली दमछाक अशी नवआधुनिकतावादात भारतातील शिक्षणाची व्यवस्था व अवस्था दिसून येते.

जागतिकीकरणाच्या प्रभावातून शिक्षणाची ही दुरावस्था निर्माण झाली आहे. वाढती लोकसंख्या, स्पर्धेचे युग, राजकीय व्यक्तींची शिक्षणसंस्था मालकीची असण्याची अभिलाषा ह्या सर्वांमुळे आज खाजगी शिक्षणसंस्थांचे पीक फोफावले आहे. बहुतेक शिक्षणसंस्था विनाअनुदानित असल्याने तिथे अध्यापन करणाऱ्या शिक्षक व प्राध्यापकांची गुणवत्ता शंकास्पद ठरते. अनेकवेळा त्या पदाला आवश्यक असणारी शैक्षणिक गुणवत्ताही त्याच्यापाशी नसते. कमी वेतनावर काम करण्याची तयारी असणे; हीच त्या अध्यापकाची गुणवत्ता मानली जाते. पूर्वी समाजात शिक्षकी पेशाला प्रतिष्ठा होती; ती आज नाही. 'दुसरीकडे कायमस्वरूपी नोकरी मिळपर्यंत शिक्षकी पेशात शिरा.' अशी आज अनेक शिक्षकांची मानसिकता दिसते. त्यामुळे शिक्षक म्हणून असणाऱ्या नैतिक जबाबदाऱ्यांचे त्यांना भान दिसत नाही. याचा परिणाम, अशा शिक्षणसंस्थांत शिकत असणाऱ्या मुलांच्या उगवत्या पिढीवर होतो. 'आडातच नाही तर पोहऱ्यात कुठून ?' न्यायाने मुलांवर नैतिक मूल्यांचे संस्कार होत नाहीत. पर्यायाने अशा शिक्षणसंस्थांमुळे भावी पिढ्यांचे नुकसान होत आहे. ह्या शिक्षणसंस्था विद्यार्थ्यांकडून वारेमाप शुल्क आकारताना

दिसतात. त्यावर सरकारचे पूर्ण नियंत्रण नाही. या कारणाने गुणवंत पण आर्थिकदृष्ट्या गरीब विद्यार्थ्यांना आवडीच्या क्षेत्रांत शिक्षण घेता'येत नाही. जे विद्यार्थी असे शुल्क देऊन शिकतात; त्यांच्यातही पदवी प्राप्त करून उद्योग-नोकरी पेशात शिरल्यानंतर आपले शुल्क प्रथम या पेशातून 'वसूल' करण्याची प्रवृत्ती होते. आज समाजात वाढत चाललेला भ्रष्टाचार, लाचखोरी ह्याचे मूळ येथे दिसते.

जागतिकीकरणाचा शिक्षणक्षेत्राला झालेला फायदा म्हणजे एकाच विषयाच्या विविध अंगांच्या ज्ञानशाखांमध्ये झालेली वाढ होय. याशिवाय अनेक परदेशस्थ शिक्षणसंस्था भारतात आपल्या शाखा सुरू करीत आहेत. ह्या दोन्हीमुळे पूर्वी परदेशात जाऊन जे विशिष्ट शाखेतील शिक्षण घ्यावे लागत होते ते आता भारतातही उपलब्ध होऊ लागले आहे. यारीतीने उच्चशिक्षणाच्या सोयीसुविधा भारतातही निर्माण झालेल्या आहेत. संगणक अभियांत्रिकी, वैमानिक व विमान स्वागतिका प्रशिक्षण, विविध परदेशी भाषांचे शिक्षण, विविध क्षेत्रांतील व्यवस्थापन शिक्षण ही याची उदाहरणे आहेत. संगणकावरून 'ऑनलाईन' शिक्षण, 'ऑनलाईन' परीक्षा, 'ऑनलाईन' प्रवेशप्रक्रिया अशा नव्या सुविधा निर्माण झाल्या आहेत. शिक्षणक्षेत्रातील नवआधुनिकतावाद या रीतीने स्पष्ट करता येतो.

आज व्यावसायिक शिक्षणाला जास्त महत्त्व आले आहे. त्यामुळे जीवनमूल्य, नैतिक मूल्य रुजविणाऱ्या अभ्यासाकडे पालक, शिक्षक व विद्यार्थी या सर्वांचे दुर्लक्ष होऊ लागले आहे. साहित्यविषयक कलाशाखेकडील विद्यार्थी व पालकांचा 'ओढा दिवसेंदिवस कमी होत चालला आहे. पण याचे समाजाच्या विविधस्तरांवर दुष्परिणामही जाणवू लागलेले दिसतात. वृद्ध आई-वडिलांकडे निरूपयोगी, टाकाऊ वस्तू या नजरेने तरुण पिढी पाहत आहे; आणि त्यांची खाजगी वृद्धाश्रमात रवानगी केली जात आहे. ते शक्य नसेल तर त्यांच्याकडे, त्यांच्या आरोग्य, मानसिक समस्यांकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यांना एकाकी जगणे भाग पाडले जात आहे. उच्चशिक्षणासाठी पालकांनीच हौसेने परदेशी पाठविलेली तरुण मुलं परदेशातच रमत आहेत. तेथील भौतिकवादी, चंगळवादी संस्कृती त्यांना भुरळ घालते नि आईवडिलांचा काळजी पोटीदेखील ही मुले पुन्हा स्वदेशात परतू इच्छित नसतात. परदेशातच जीवन जगणे, आयुष्य घालविणे; ते पसंत करतात. टी.व्ही., कॉम्प्युटरमधून मिळणारी हिंसक करमणूक आणि शिक्षणातून नैतिक मूल्यांचा अभाव यांमुळे लहान मुलेही गुन्हेगारी प्रवृत्तींकडे वळताना दिसतात. शिक्षणखाते हे एक अतिशय संवेदनशील खाते आहे. येथे घेतल्या जाणाऱ्या प्रत्येक निर्णयाचे दूरगामी परिणाम होत असतात. आज शिकणारी लहान मुलं ही भावी जबाबदार नागरिक होणार असतात. या सर्वांचे भांन ठेवून शिक्षणमंत्र्यांनी निर्णय घेणे आवश्यक ठरते. त्यासाठी शिक्षणमंत्री हा अभ्यासू व जबाबदारी ओळखून निर्णय घेणारा असावा लागतो. पहिलीपासून इंग्रजी, दहावीच्या पातळीवर सामान्य गणित व विज्ञान अभ्यासक्रम राबविणे, बोर्डाची गुणवत्ता यादी रद्द करणे, कमी वेतनावर काम करणारे शिक्षणसेवक पद निर्माण करणे, महापालिका शाळांची गुणवत्तेत होत असलेली घसरण, त्याच तुलनेत अमर्यादपणे वाढत चाललेली इंग्रजी माध्यम शाळांची संख्या व त्यांना मान्यता हे सर्व घिसाडघाईने घेतलेले निर्णय आहेत. शाळांमधील विद्यार्थ्यांची गळती, कमी गुण मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या आत्महत्येत झालेली वाढ, विद्यार्थ्यांच्या इतर शैक्षणिक समस्या यांवर असे वरीलप्रमाणे उपाय योजणे म्हणजे तात्पुरत्या मलमपट्ट्या आहेत. नवआधुनिकतेच्या कालखंडांत शिक्षणखात्यात हा दिसून येणारा खेळखंडोबा लक्षणीय आहे.

नवआधुनिकतेमध्ये भारतात धार्मिक परिस्थिती काय आहे; याची आता पाहणी करू. आज इस्लामी मूलतत्त्ववाद रुजविण्यासाठी जगभरात हिंसक कृत्ये सुरू आहेत. भारतात अशा दहशतवादी हल्ल्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे. शासनयंत्रणेला धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या परिस्थितीस सतत सामोरे जावे लागताना दिसते. मुंबईमधील बॉम्बस्फोटांची सत्रे, गुजरातमधील धार्मिक दंगली, मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरण, गोवा बॉम्बस्फोट, खैरलांजी प्रकरण, सांगलीतील धार्मिक दंगल या सर्वांवरून लक्षात येते की, समाजामध्ये धर्मांधता वाढत चालली आहे. या धर्मांधतेला माणुसकीची, मानवतेची किनार अजिबात नाही. धर्मांधतेचा पायावर राजकारणाची गणिते खेळली जाताना दिसतात. या धर्मांधतेला जागतिकीकरणदेखील जबाबदार आहे. विविध

राज्यांतील लोक नोकरी-उद्योगाच्या निमित्ताने इतर राज्यांत, तेथील महानगरात जातात. ही एकाच धर्मांची माणसे महानगरात विखुरल्या अवस्थेत राहत असतात. नोकरी-उद्योग करताना त्यांना एकाकीपण खात असते. दुसऱ्या राज्यांतील स्थानिक लोकांत ते फारसे रमू शकत नाहीत. तेथील स्थानिक लोकही त्यांना आपल्यात सामावून घेऊ इच्छित नसतात. त्यामुळे परराज्यातील ही माणसे आपले उत्सव उदा. दुर्गापूजा, छटपूजा, पोणम् इ. सार्वजनिक व जाहीररित्या करतात व त्यातून एकत्रित होण्याचा आनंद मिळवितात. परदेशात स्थायिक झालेली माणसेही याच प्रकारे आपली संस्कृती, धर्म टिकवू पाहतात. परदेशातील महाराष्ट्र मंडळांची वाढती संख्या हे याचेच द्योतक आहे. या धर्मांधतेमुळे धार्मिक क्षेत्रांचा विकासही शक्य होत नाही. भारतात दक्षिणेकडील देवस्थानांचा विकास झालेला दिसतो. मात्र महाराष्ट्र व उत्तरेकडील राज्यांत तो दिसत नाही. सरकारी अनुदाने मंजूर झाली तरी देवस्थानच्या येथील स्थानिक पातळीवरील राजकारणामुळे हा विकास होत नाही; असे दिसते.

महानगरांतील माणसांच्या जीवनावर मात्र विज्ञानाचे पूर्ण वर्चस्व दिसते. जागतिकीकरणामुळे झालेला पाश्चात्य राहणीमानाचा परिचय, त्याच आचारविचारांचे आकर्षण यातून भौतिकवाद व चंगळवाद बळावलेला आहे. श्रद्धा व अंधश्रद्धा यांतील फरक लक्षात येईनासा झाल्यामुळे आपला धर्म, संस्कृती यांविषयी आपुलकी वाटेनाशी झाली आहे. आपले सण, उत्सव साजरे करण्यापेक्षा पाश्चात्यांचे सण, उत्सव उदा. फादर्स डे, मदर्स डे, व्हॅलेंटाईन डे, ख्रिसमस आदी साजरे करण्याकडे उच्चमध्यमवर्गीयांचा कल दिसतो. हे साजरे करण्यामागेही चंगळवादाची भूमिका आहे. भारतीय सण साजरे करणारे 'गावंढळ' आहेत; अशी त्यांच्यामध्ये भावना निर्माण झालेली आहे. एकूणच सण, उत्सव, धर्म, संस्कृती यांच्यावरील त्यांचा विश्वास उडालेला दिसतो. ते धार्मिक गोष्टींपासून पूर्णपणे दूर राहताना दिसतात. निम्न मध्यमवर्गीय व खेड्यातील लोक मात्र आपला धर्म व संस्कृती धरून ठेवताना दिसतात. आजच्या भेदरलेल्या वातावरणात त्यांना या गोष्टींचा जास्त आधार वाटतो आहे; असे लक्षात येते. धर्म व जातीविषयीच्या त्यांच्या भावना तीव्र आहेत; हे लक्षात येते. महात्मा गांधी जयंती/पुण्यतिथी साजरी केली जात नाही पण शिवजयंती, अण्णाभाऊ साठे पुण्यतिथी/जयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती/महानिर्वाण दिन थाटामाटाने साजरे होताना दिसतात. जैनधर्मियांची महावीर जयंती गेल्या दोन वर्षांपासून जाहीरपणे साजरी केली जात आहे. इस्कॉनवाले कृष्णविषयक कार्यक्रम जाहीरपणे घेऊ लागले आहेत. या सर्वांतून जातीय व धार्मिक तेढ वाढतानाच दिसत आहे. नवआधुनिकतेत मानवाची ही अधोगतीकडे होणारी वाटचाल स्पष्ट जाणवते.

या रीतीने जागतिकीकरण, उद्योगांचे संगणकीकरण, वाढती महानगरे, वाढती महागाई, पाणी, वीज, रस्ते आदी पायाभूत सोयीसुविधांचा अभाव, शेतकऱ्यांचे वाढते शोषण, ढासळत चाललेली ग्रामीण अर्थव्यवस्था, कणाहीन राजकीय पक्ष, वाढता इस्लामी मूलतत्त्ववाद, वाढते दहशतवादी हल्ले, मूल्यहीन शिक्षणव्यवस्था ही भारतातील नवआधुनिकतावादाची मुख्य लक्षणे सांगता येतात.

❖❖❖

प्रा. कीर्ती मुळीक
फ्लॅट नं. २०२, 'प्रथमेश' अपा., ११९४/६,
घोले रोड, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५.
मोबा. : ९८८१४७७४६५

स्त्रीवादी दृष्टीतून मराठी साहित्याचे सिंहावलोकंन !

डॉ. स्वाती कर्वे

[आजचा 'स्त्री-वाद' आणि स्त्री-मुक्ती चळवळीच्या पाऊलखुणा गेल्या शतकातील कथा, कादंबरी, नाट्य आणि काव्यातही दिसतात. त्यांचे पुनर्वाचन आणि मांडणी आजच्या दृष्टीने पाहण्यासाठी लेखिकेने केलेल्या ह्या सिंहावलोकनातून स्त्रीमुक्ती चळवळीचा सुसंगत इतिहास शोधता येतो. -संपादक]

आज एकविसाव्या शतकाच्या प्रारंभकाळात आपण आहोत. भारतीय स्त्रीच्या कर्तृत्वाच्या विविध पताका देश-विदेशात फडकताना आपण पहात आहोत. भारतीय स्त्रीच्या कर्तृत्वाच्या या विवक्षित टप्प्यावर 'स्त्रीवादी दृष्टीतून मराठी साहित्याचे पुनर्वाचन' ही आज काळाची गरजच आहे.

गेल्या पंचवीस-तीस वर्षांमध्ये स्त्रीमुक्ती, स्त्री मुक्ती आंदोलन- केवळ सामाजिक चळवळीपुरते मर्यादित न राहता त्यातून स्त्रीवादी विचारसरणी, स्त्री-केंद्री समीक्षा विचार- हा स्वतंत्र वैचारिक परिप्रेक्ष विकसित झाला. तात्त्विक विचारांची बैठक प्राप्त होऊन स्वतंत्र विचारसरणी म्हणून स्त्रीवादी विचार विकसित होत आहेत.

काळाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर कालसंगत संवेदनेतून, जाणिवेतून साहित्याचे केलेले पुनर्वाचन वाङ्मयीन, सामाजिक, सांस्कृतिक जाणिवांच्या कक्षा विस्तृत करते. ज्ञान व्यवहाराची कक्षा त्यातून विकसित होते. त्या बरोबर आकलनही सूक्ष्म, सखोल पैलूदार बनते.

गेली दोन शतके आपल्या देशात 'स्त्री' सांस्कृतिक जीवनाच्या केंद्रवर्ती ठिकाणी आहे. ह्या दीर्घकाळात घडलेल्या वैचारिक, सामाजिक परिवर्तनाचे 'भारतीय स्त्री' हे एक उदाहरण आहे. नवीन वैचारिक परिप्रेक्ष्यातून केलेली वाङ्मयीन चिकित्सा, एका परिवर्तनशीं घटकाची वाटचाल, उत्कर्षाचा मार्ग स्पष्ट करते. त्यावरोबर समाजाची, व्यक्तीमनाची बदलती कारणेही स्पष्ट करते.

स्त्रीवादी दृष्टीतून मराठी साहित्याचा विचार करण्यापूर्वी 'स्त्रीवादी वैचारिक परिप्रेक्ष' आणि त्याची पार्श्वभूमी समजून घेतली पाहिजे.

स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्य घटनेनेच स्त्रियांना समानता दिली. हिंदू कोड बीलाने महत्त्वाचे कायदेशीर हक्क दिले. संघर्ष न करता मतदानाचा हक्क मिळाला. वरवर पाहता पाणी संथ झाले. स्त्रीविषयक प्रश्नांना काहीसे गौणत्व प्राप्त झाले. स्वातंत्र्यतोत्तर काळात स्वतंत्र भारताच्या सर्वांगीण उभारणीला महत्त्व मिळाले. स्त्री-शिक्षणाने वेग घेतला होताच. स्त्रियांनी मर्यादित प्रमाणात का होईना नोकरी करण्यास सुरुवात केली.

परंतु १९५१ च्या पहिल्या पंचवार्षिक योजनेत स्त्रियांविषयी कोणताच विशेष विचार नसल्याने स्त्रिया निराश झाल्या. लढावू संघटनेची गरज जाणवल्यानेच १९५४ मध्ये कलकत्ता येथे महिला फेडरेशनची स्थापना झाली. १९६० नंतर विविध आंदोलनांमध्ये स्त्रिया मोठ्या प्रमाणावर सहभागी होऊ लागल्या. ९ मार्च १९६४ रोजी विधानभवनावर १५ हजार स्त्रियांनी श्रमिक मोर्चा नेला. स्त्री-मनाला नव्याने जाग येत होती. स्वतःविषयी आत्मभानाच्या, आत्मप्रतिष्ठेच्या संवेदनेतून स्त्रिया विचार करू लागल्या होत्या.

कायदेशीर हक्क मिळूनही सामाजिक, सांस्कृतिक जीवनाची परंपरागत चौकट बदलत नव्हती. १९६१ मध्ये हुंडा विरोधी कायदा होऊनही हुंड्यामुळे विवाह ठरत होते. मोडत होते. वेळेला स्त्रीची हत्याही होत होती. स्त्रियांचे दैनंदिन जीवनात होणारे शोषण, अन्याय स्त्रियांना विचार करायला प्रवृत्त करीत होते. १९७४ मध्ये 'समतेच्या दिशेने' या डॉ. फुलरेणु गुहा यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या महिला आयोगाच्या पाहणीचे धक्का देणारे निष्कर्ष पुढे आले. विशेषतः १००० पुरुषांमागे स्त्रियांचे ९०० पेक्षाही कमी असणारे प्रमाण डोळ्यात अंजन घालणारे होते. जागतिक पातळीवरही युरोपियन देश दुसऱ्या युद्धानंतर आपापल्या देशांच्या पुनर्बांधणीत मग्न होते. १९६० नंतर स्त्रियांविषयी नव्याने विचार करण्याची जाणीव होण्यास सुरुवात झाली. व्हिटएनामी युद्धात स्त्रियांनी केलेल्या

अनुक्रमणिका

कामगिरीने प्रभावित होऊन स्त्रियांसाठी काही तरी केले पाहिजे. याविषयी विचारांना चालना मिळाली. फ्रेंच विचारवंत सिमोन द बोव्हा यांचे महत्त्वाचे पुस्तक 'सेकंड सेक्स' १९४९ मध्ये प्रसिद्ध झाले तरी त्या पुस्तकाचा प्रभाव १९६० नंतर पडण्यास सुरुवात होऊन स्त्रियांच्या संघटना सक्रिय होऊ लागल्या; आणि संयुक्त राष्ट्र संघाने १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून जाहीर केले. पाठोपाठ १९७५ ते १९८५ हे महिला दशक म्हणून साजरे झाले.

एलन शॉवाल्टर, सॅण्ड्रा गिलबर्ट, हेलन सकसन, या पाश्चात्य स्त्रीवादी विचारवंतांनी स्त्रीवादी समीक्षा विचारांची प्रथम मांडणी केली. स्त्रीच्या दृष्टीने वाङ्मयाच्या यथायोग्य आकलनासाठी काही मुद्दे स्त्रीकेंद्री विचारांतून समोर ठेवले.

स्त्रीचे वास्तव जीवन आणि लोकसाहित्यातून उभी केलेली स्त्री-प्रतिमा इथपासून शोधाची सुरुवात करावी लागणार आहे. कारण आपले मानस या संकल्पनांतून घडले आहे. पतिनिष्ठा, मातृत्व, पतिव्रता, त्यागमूर्ती अशी स्त्रीची प्रतिमा उभी करताना 'स्त्री' कशी राबवली गेली. पुरुषसत्ताक रचनेची चौकट त्यातून कशी उभी राहिली याविपर्यांचा शोध लोकवाङ्मय, कहाण्या, पुराणकथांतून घेता येईल. डॉ. तारा भवाळकर, डॉ. पद्मजा मोरजे यांनी लोकवाङ्मयातील स्त्रीप्रतिमांचा वेध उत्तम रीतीने घेतला आहे.

पतीचे प्राण वाचविणाऱ्या सावित्रीची प्रतिमा समाजाने दीर्घकाळ जपली; ते स्त्रियांचे मानस घडविण्यासाठी, परंतु सोयीस्करपणे सावित्रीला पित्याने नवरा निवडण्याचे स्वातंत्र्य दिले होते; याकडे दुर्लक्ष केले. पार्वतीची शंकराबरोबर विवाह करण्याची इच्छा हिमालयाने मान्य केली. यापेक्षा पार्वतीने शंकरासाठी कठोरव्रत केले; यावर भर दिला. असा योग्य निष्कर्षच डॉ. तारा भवाळकर काढतात.

मध्ययुगीन काळातील स्त्रिया अशिक्षित होत्या परंतु भक्तीची कास पकडत स्त्रियांनी आत्ममुक्ती कशी साधली. हा 'स्त्री मुक्तीचा आत्मस्वरही' डॉ. तारा भवाळकर यांनी उलगडून दाखवला आहे. पंढरीच्या वाटेवर पाळे मी ठोकळे 'म्हणणारी जनाबाई, 'भ्रतार मजसी ओढतो एकांती । भोगावे मजसी म्हणोनिया' म्हणून आक्रोश करणारी, तुकारामांची शिष्या संत बहिणाबाई, पुढे ठामपणे म्हणते, 'देहावरी- तुझी सत्ता आहे जाण, मजवरी तुझी किंचित नाही !' यातून तिला आलेले प्रखर आत्मभानच व्यक्त होते.

टाटा समाजविज्ञान संस्थेने १९७५ च्या महिलावर्षाचे औचित्य साधून एक वृहद प्रकल्प सिद्ध केला. 'स्त्री मुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा' पाच स्वतंत्र भागातून सिद्ध झालेल्या या संशोधन प्रकल्पात मध्ययुगीनकाळातील संतकवयित्री, इतिहासातील स्त्रिया, एकोणिसाव्या शतकातील स्त्रियांचे प्रश्न, त्यानंतर काही लेखिकांच्या रुपाने-स्त्री अस्मितेचा होणारा आविष्कार, असा शोध घेऊन इतिहासाचा पटच उभा केला आहे.

मध्ययुगीन काळातील इतर कवयित्रीबरोबर महानुभाव पंथातील स्त्रियांचा शोध घेता येईल. महानुभावपंथात स्त्रियांना मानाचे स्थान होते. लीळाचरित्र, रिद्धीपूर-महात्म्य, स्मृतिस्थळ इ. ग्रंथांतून महानुभाव पंथातील स्त्रियांचे अस्तित्व व कार्य याविषयी शोध घेता येईल. बाराव्या शतकातील धार्मिक वातावरणात महदाईसा, बाईसा, उमाइसा, एल्वे, इ. स्त्रियांनी महानुभावपंथाची दीक्षा घेण्याचे क्रांतिकारी कार्यच केले होते. 'म्हातारी चर्चक म्हातारी धर्मरक्षक' अशा शब्दांत श्री चक्रधरस्वामी ज्या स्त्रियांचा गौरव करतात; त्या स्त्रियाचे व्यक्तिमत्त्व उजेडात येण्याची गरज आहे.

काळाच्या पडद्यातून डोकावणाऱ्या अनेक कर्तृत्ववान् स्त्रिया मध्ययुगीन काळात होऊ गेल्या. अहिल्याबाई होळकर, झाशीची राणी, उमाताई दाभाडे या सारख्या स्त्रियांव्यतिरिक्त अन्य स्त्रियांकडे अद्याप म्हणावे तितके लक्ष गेलेले नाही.

बावा पदमनजी यांची यमुना, ह. ना. आपटे यांची यमू, वा. म. जोशी यांची रागिणी, सुशीला, इंदु काळे, सरला भोळे, काशी ढवळे, वरेकरांची गोदु गोखले आणि ना. ह. आपटे यांची बंडखोर नीरा यांच्या नव्याने केलेल्या तपासातून स्त्रीच्या वास्तव जीवनाची स्पंदने त्यातून कितीतरी ऐकू येतात. या लेखकांनी प्रत्येक टप्प्यावरची स्त्री कशी व किती समजावून घेतली होती; याविषयी नव्याने शोध घेता येईल.

एकाच काळातील, दोन वाङ्मयप्रकारांतील स्त्री चित्रणाचा तुलनात्मक विचारही करता येईल.

सामाजिक कादंबरी आणि मराठी रंगभूमी एकाच काळात जोरात होती. स्त्री-समस्यांविषयक अनेक नाटकेही या काळात लिहिली गेली. तरी नाट्यप्रयोगांच्या माध्यमातून 'शारदे'सारख्या कितीतरी व्यक्तिरेखा समाजासमोर येत होत्या. पौराणिक नाटके त्याकाळात लोकप्रिय होती. 'भूमिकन्या सीता' या नाटकात मामा वरेरकर यांनी सीतेच्या व्यथेचा नवीन अन्वयार्थ लावला. तसा प्रयत्न इतर नाटकांतून दिसतो का ? या अंगाने घेतलेला शोध उद्‌बोधक ठरेल. 'खऱ्या स्त्रीला पडद्याआड ठेवणारी रंगभूमी.' असा प्रा. पुष्पा भावे यांनी मराठी रंगभूमीवरील स्त्रीचित्रणाचा वेध घेताना निष्कर्ष काढला आहे. त्याचा शोध घेता येईल.

१८८० च्या आसपास स्त्रियांचे लेखन सुरू झाले असे सर्वसाधारणपणे म्हणता येते. १९०० पाशी स्त्रियांच्या लेखनात जाणीवपूर्वकता आली. सामाजिक प्रश्नांविषयी, स्त्रीजीवनाविषयी स्त्रिया लिहू लागल्या. या टप्प्यापासून स्त्रियांचे लेखन आणि पुरुषांचे लेखन यांचा तौलनिक विचार करता येईल. स्त्रीने स्त्रीला समजून घेऊन केलेले लेखन आणि लेखकांनी स्त्री मानसाचा घेतलेला वेध यांचा शोध घेता येईल. १८८४ मध्ये श्री. देवधर यांनी 'विचार सोडून अविचाराते, निशदिन जन हो का रमता' ही कविता 'केसरी'त लिहिली होती. विधवा स्त्रियांना समाजाने उदार मनाने पुनर्विवाहाची परवानगी द्यावी; असा विचार व्यक्त केला होता. १९०० पाशी एका 'स्त्री'ने 'विधवेचा विलाप' ही कविता लिहिली. ह्या टप्प्यापासून तौलनिक शोध घेता येईल. आजचे आघाडीचे कथाकार मिलिंद बोकील 'उदकाचिये आरती', 'अधिष्ठान', 'साथिन' या कथांतून स्त्रीमानस कसे सोलून दाखवतात. आजची स्त्री, पुरुष कोणत्या संवेदनेतून समजावून घेत आहे. याची चिकित्सा करता येईल.

स्त्रीवादी दृष्टीतून स्त्रियांच्या प्रश्नांची थेटपणे होणारी मांडणी, स्त्रीची स्वाभाविक भाषा, अनुभवांचे वैविध्य, नातेसंबंधाकडे बघण्याचा दृष्टिकोन, आणि स्त्रीजीवनाचे वास्तव याचा खरा आविष्कार विभावरीबाईंपासून (मालतीबाई बेडेकर) तपासता येणार आहे. स्त्रीच्या आंतरिक ऊर्मी, स्त्रीचे जागे होणारे स्त्रीत्व, आत्मभान, स्त्रीवर 'पती' या अधिकारातून येणारी बंधने आणि त्यामुळेच येणारे नैराश्य याचे मूर्तिमंत चित्रण मालतीबाई बेडेकर यांनी 'शबरी' या आपल्या कादंबरीत केले. 'शबरी' ही कादंबरी आज एखाद्या 'पिरियड पीस' सारखी वाटते. अशा 'पिरियड पीस'च्या शोधातून स्त्रीच्या जाणिवांच्या आणि चित्रणाच्या उत्क्रांतीचा शोध आपल्याला घेता येणार आहे.

मालतीबाई बेडेकर यांची 'शबरी', गौरी देशपांडे यांची 'यमू' (दुस्तर हा घाट'ची नायिका) सानिया यांच्या 'आवर्तन' मधील 'सुरुची' आणि 'अवकाश' मधील जानकी राघवन, तर मेघना पेठे यांच्या नायिका 'स्त्री'चा मनोविकास कशा अधोरेखित करतात हे बघणे खरोखरच उद्‌बोधक ठरेल. 'लिव्हिंग टुगेदर' या संकल्पनेला स्वीकारणारी आजची आधुनिक स्त्री तर वडिलांच्यामुळे आईची झालेली वंचना आणि घुसमट समजल्याने आईच्या भावनिक नात्याला समजावून घेणारा मुलगा सानिया 'अवकाश'मध्ये रंगवतात; तेव्हा नातेसंबंध, मूल्यकल्पना यांना ओलांडून स्त्रीचा शोध घेतात. कांहीसे अपवाद स्वरुपी असणारे चित्रण पुढील दिशाच सूचित करते. परंतु हा शोध शहरी सुशिक्षित स्त्रीपुरता मर्यादित न ठेवता ग्रामीण, निमग्रामीण, दलित, स्त्रीच्या आजच्या आत्मभानापर्यंत नेऊन स्त्रीवादी विचारांचे झरे किती खोलवर झिरपत गेले आहेत. याचा उभा छेद घेणे आवश्यक आहे.

स्त्रियांची चरित्रे आणि आत्मचरित्रे या शोधात दीपस्तंभासारखी मार्गदर्शक व वास्तवदर्शक म्हणून उपयोगी पडणार आहेत.

काळाच्या मुशीतून विकसित होणाऱ्या स्त्रिया, स्त्रियांचे संघर्ष, धडपड, जागृत होणारे आत्मभान, याचा प्रत्यय स्त्रियांची आत्मचरित्रे देतीलच परंतु या विकासक्रमात स्त्रियांच्या जाणिवांचा स्फोट कसा होत होता. स्त्रीला प्रसंगी बंड करायला, वेगळे निर्णय घ्यायला, त्यांचे आत्मभान स्त्रीला बळ कसे देत होते. या विषयीचे विलक्षण चित्र त्यातून स्पष्ट होईल.

ताराबाई शिंदे, सावित्रीबाई फुले, यांची प्रगल्भता नव्याने तपासता येईल. मनाला खरोखरच न भावणाऱ्या विवाहबंधनात, सामाजिक चौकटीत ताराबाई शिंदे यांच्यासारखी स्त्री बंदिस्त होती. सत्यशोधक समाजाच्या कार्यात त्या उतरतात; तेव्हा त्यांचे जागृत आत्मभान आतमध्ये उसळू लागते. तेच आत्मभान 'स्त्रीपुरुष

तुलना'मधून ताराबाईंच्या भाषेतून फुटून ओसंडून बाहेर पडताना दिसते. ताराबाई शिंदे यांची भाषा, वाक्प्रचार, त्यांनी वापरलेली विशेषणे ताराबाईंच्या मनाचाच आविष्कार होता. असे लक्षात येईल. सावित्रीबाई फुले यांच्या पत्रांतून त्यांची प्रगल्भता व्यक्त होते. तर काशीबाई कानिटकर अल्पकाळ का होईना धाडसी निर्णय त्यांच्या जीवनात घेताना दिसतात. 'पत्नी शिकली तरच तिच्याबरोबर संसार करणे शक्य आहे.' असे काशीबाई कानिटकरांचे पती वासुदेवराव कानिटकर म्हणाले होते. काशीबाईंना शिकण्यास त्यांनी प्रोत्साहन दिले. परंतु पुढे काशीबाई वेगाने विकसित झाल्या. लेखिका म्हणून प्रसिद्ध झाल्या. सार्वजनिक कार्यात हिरीरीने भाग घेऊ लागल्या. वासुदेवरावांना काशीबाईंचा विकास, प्रसिद्धी काहीशी अस्वस्थ करीत असावी. काशीबाईंची थियॉसॉफीवरील निष्ठा, वासुदेवरावांचे रागावणे; हे दोघांमध्ये निर्माण झालेल्या ताणाचे निमित्त होते. एक दिवस या ताणाचा स्फोट घरात सर्वांसमोर झाला आणि दुसऱ्या दिवशी काशीबाई वासुदेवरावांना न सांगता बनारसला आपल्या मुलाकडे निघून गेल्या. सहा महिन्यांनी परत आल्या. काशीबाई कानिटकर यांच्या चरित्रातील ही घटना आज स्त्रीवादी नजरेतून वेगळी आणि अधिक बोलकी वाटू लागते. १९२० पूर्वीचा काळ आणि काशीबाईंची कृती, यांचा विचार करता, धाडसाची वाटते. आत्मभान आलेल्या स्त्रीची स्त्रीत्वाच्या जपणुकीची धडपड वाटू लागते. 'आमच्या आयुष्यातील काही आठवणीं'पासून उर्मिला पवार यांच्या 'आयदान'पर्यंत स्त्रियांच्या आत्मभानाचा विकास काळानुक्रमे बघता येईल.

१९७५ नंतर मराठी साहित्याचा व्यूह अधिक विस्तृत झालेला दिसतो. या टप्प्यावर स्त्रियांचे साहित्य वेगाने पुढे येते. कविता, कथा, कादंबरी, आत्मकथने, वैचारिक लेखन, स्त्री मानस आणि युगसंवेदना विविधरुपाने आविष्कृत होताना दिसते. परंतु पूर्वकाळातील आकलनाच्या आधारेच अलीकडचे काहीसे परिचित चित्र तपासावे लागणार आहे.

शहरी, ग्रामीण, निमग्रामीण, उच्चशिक्षित मध्यमवर्गीय, दलित, मुस्लिम, कष्टकरी, सर्व स्तरांवरील स्त्रियांचे भान एकाच वेळी व्यक्त होताना दिसते. स्त्री जाणिवांचे वैविध्य आणि त्याच वेळेला असणारे समानत्व, विविधतेतील एकतेचा प्रत्यय देईल. स्त्रियांच्या सहवेदनेचे सखोल भान त्यातून येईल. समाज वास्तवाचा व्यापक पट आणि नव अस्तित्वाच्या जाणिवेने विकसित होणाऱ्या स्त्रिया वाङ्मयीन चित्रणातून स्त्रीत्वाचे विराट रूप दाखवतील. स्त्रीवादाचे व्यापक कोलाज साकार होईल. हे निश्चित !

एक गोष्ट आवर्जून नमूद करावीशी वाटते. स्त्रीवादी दृष्टीतून गतकाळाचा ऐतिहासिक दृष्टीने शोध घेताना साहित्याच्या पुनर्वाचनाला नियतकालिकांच्या माध्यमातून घेतलेल्या शोधाची जोड देणे आवश्यक आहे. गेल्या दोन शतकांतील स्त्री जीवनाला, स्त्रियांच्या सर्वांगीण विकासाला नियतकालिकांनी आपल्यामध्ये साठवून ठेवले आहे. १९व्या शतकातील, 'सुमित्र'; आर्यभगिनी, 'गृहिणी' ही नियतकालिके. २०व्या शतकातील 'स्त्री', 'गृहलक्ष्मी', 'महिला', 'वनिताविश्व' इ. नियतकालिके; आणि १९७५ नंतरची 'बायजा', 'स्त्री उवाच', 'मिळून साऱ्याजणी' इत्यादी नियतकालिकांतून स्त्री-जीवनाचा विकास, सामाजिक परिवर्तने, स्त्रीवादी विचारांची अभिवृद्धी काळाच्या मुशीतून कशी घडत आली; याविषयी शोध घेता येईल. वाङ्मयीन अभ्यासाला त्यातून पूरक मदत होईल.

त्याचबरोबर स्त्रियांच्या परिषदा, मेळावे, त्यातून मांडले जाणारे ठराव, इ. चा काळानुक्रमे शोध घेता येईल. १९०४ मध्ये मुंबईला पहिली अखिल भारतीय महिला परिषद भरली. त्यानंतर स्त्रियांच्या परिषदा, मेळावे, अधिवेशने, यांचे जाळेच (नेटवर्क) निर्माण झाले. १९७५ नंतर स्त्रीमुक्ती चळवळीत, विद्रोही भूमिका घेऊन पुढे येणाऱ्या स्त्रियांची मनोवृत्ती, स्वातंत्र्यपूर्व काळापासून कशी विकसित होत आली होती; ते समजावून घेता येईल. स्त्री जागृतीचा, सामाजिक परिवर्तनाचा इतिहास त्यातून साकार होईल. स्त्रीवादी दृष्टीतून करावयाच्या वाङ्मयीन परिशीलनास आवश्यक असणारी पार्श्वभूमी त्यातून समजावून घेता येईल.

❖❖❖

डॉ. स्वाती सुहास कर्वे


५, अॅव्हेन्यू, ब्लॉक नं. २०३, शेठ उत्तमचंद गांधी मार्ग, कोथरूड, पुणे ३८. फोन : २४३०८१३५ मो. :९९७०१७४६३०

'आत्मघाताचे दशक'च्या निमित्ताने
शेतकऱ्याची कैफियत

डॉ. प्रतिमा इंगोले

[जानेवारी १९८८ ते डिसेंबर २००८ हे असहाय शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे दशक होय. ह्या समस्येचा साद्यंत आढावा घेणारे हे संशोधन वस्तुनिष्ठ आहे; आणि चिंतन मार्गदर्शक आहे. – संपादक]

या विषयाला कुठून·सुरुवात करावी कळेना. त्यावर विचार करता पहिली आत्महत्या 'रंगराव इसनाजी भटकर' ह्याची ९ जानेवारी १९९८ ला झाली होती हे लक्षात आले. त्यावरून आता २००९ ला आत्महत्या सत्र सुरू होऊन एक दशक होऊन गेल्याचे लक्षात आले. हा महत्त्वाचा धागा पकडून लिहायला सुरुवात केली.



भारतासारख्या कृषिप्रधान देशात अन्नदात्या शेतकऱ्यावर ही वेळ यावी ? यातील गांभीर्य सर्वांच्या लक्षात यावे. विशेष चिंतनीय बाब म्हणजे सतत दहा वर्षे हे आत्महत्या सत्र सुरू राहावे. तरी त्यावर तोडगा निघू नये. या गोष्टींभर भर देत लेखन सुरू केले. जसे सुचले तसे लिहीत गेले. पण लिहिताना सर्वांना जर अन्नाची गरज आहे तर ते उपलब्ध करून देणाऱ्याकडे उपेक्षावृत्ती का असावी ? हा प्रश्न भेडसावू लागला. मानवाचं जगण्याचं मुख्य स्रोत जर अन्नच आहे तर अन्नदात्याप्रती कृतज्ञता का वाटू नये ? शेतकरी मरतो आहे; तर त्याच्याविरूद्ध एकत्रित लोकचळवळ का उभारली जाऊ नये ? असेही वाटून गेले. आणि त्या पार्श्वभूमीवर हे लेखन घडत गेले. त्यातून कष्टकऱ्यांप्रती असणारी पूर्वापारची समाजभावना जरी प्रभावी वाटत असली तरी अन्न पिकविणारा महत्त्वाचा आहे; हे समाजाला कळायला हवे असे वाटले. पण असे घडत नाही.

तेव्हा आपण शेतकरीकुळात जन्म घेतला तर कर्तव्य म्हणून तरी सर्वांचे या प्रश्नाकडे लक्ष वेधावे; असे मला वाटले. एकदा ही भूमिका पक्की झाल्यानंतर त्या अनुषंगाने हे लेखन होत गेले.

गत दहा वर्षांपासून सतत आत्महत्या सुरू आहेत. एक दशक पूर्ण होऊन अकरावे वर्ष लागले आहे. पण त्यावर काही तोडगा निघालेला नाही. या पहिल्या 'रंगराव इसनाजी भटकर'च्या आत्महत्येपासून मी या आत्महत्यांच्या बातम्या अगदी बारकाईने वाचत होते. प्रत्येकवेळी मन विव्हल होत होते. अन्न पूर्णब्रह्म मानले तर शेतकऱ्याला 'पूर्णब्रह्म' मानायला हवे. पण तो सन्मान त्याला कधीच दिला गेला नाही. तसं तर नवनिर्मितीचं आणि सृजनाचं महत्त्वाचं व मौलिक काम शेतकरीच करतो.

त्यामुळेच शेतकऱ्यांबद्दल आत्मीयता वाटत होती. त्यातच साहित्याचे नायक आणि नायिका म्हणूनही शेतकऱ्यांबद्दल आत्मीयता होती. त्यामुळेच त्यांची बाजू मांडण्याचा प्रयत्न करावा या भूमिकेतून 'आत्मघाताचे दशक'चे लेखन माझ्याकडून झालेले आहे. आपल्या हाडामासांच्या नायक नायिकांबद्दल वाटलेली आत्मीयता या लेखनाला प्रेरक ठरली आहे. याच प्रांजलपणे मी शेतकरी जीवन बघत होते, अनुभवत होते आणि जाणून घेण्याचा प्रयत्न करीत होते. जिज्ञासूवृत्तीने त्यांचे प्रश्न, समस्या, परिस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न करीत होते. त्यातून शेतकऱ्यांबद्दलची उदासीनताच तिलाही सर्वत्र दिसत होती. काही प्रमाणात ती दूर करण्याचे प्रयत्नही

तिने करून पाहिलेत. वास्तविक शिक्षणाने माणूस बहुश्रुत होतो. त्यामुळे आपणास प्राणोपयोगी कष्टकरी माणसांप्रती त्याला आदर व आपुलकी वाटायला हवी. पण असे घडत नाही. उलट शिकलेलाच स्वतःला शहाणा समजतो. तो म्हणतो,

''पांढऱ्या वावरात काळं बी
पेरणारा म्हणतो चतुर मी''

पण पांढऱ्या वावरात म्हणजे कागदावर काळं बी म्हणजेच अक्षरे पेरणारा हा शहाणा माणूस मात्र काळ्या वावरात पांढरं बी पेरणाऱ्या शेतकऱ्यास अडाणी, गरीब आणि तुच्छ समजतो. त्याच्याबद्दल जराही मानवतावादी भूमिका बाळगत नाही वा तसा दृष्टिकोन ठेवत नाही.

त्यामुळेच सहानुभूतीपूर्वक आणि मुद्दामच हे लेखन केले आहे. आतापर्यंत शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवर फार कमी लिहिले गेले. त्यातही ह्या प्रश्नाचा अभ्यास करून तर लिहिलंच गेलं नाही. या ऐरणीवरच्या प्रश्नावर तेही जाणीवपूर्ण आणि मुळापर्यंत जाणारे लेखन करण्याचा प्रयत्न करण्याचे ठरविले. त्यातही जसं पाहिलं, जे पाहिलं, जे अनुभवलं, समजून घेतलं, जाणून घेतलं, जसं समजावून घेता आलं आणि महत्त्वाचं म्हणजे जे वाटलं, तसं लिहिण्याचा प्रयत्न करायचं ठरविलं. थेट मुळाशी जात, निर्भिडपणे लिहिण्याचं निश्चित झाल्यावर खूप समाधान वाटलं. मन वेगळ्याच महिवरात न्हाऊन निघालं. मनाच्या निर्धारामुळे लेखन सोपं झालं. तरीही हे स्पष्ट केले पाहिजे की, इथे कोणावर आरोप करायचे नव्हते. वा कोणाला दोष देण्याचेही कारण नव्हते. कोणावर खापर फोडण्याचीही इच्छा नव्हती. फोडायचेही नव्हते. तर कर्तव्य म्हणून आणि दुर्दम्य इच्छाशक्ती होती; म्हणून हे लेखन करण्याचे धाडस केले. त्याच्या परिणामाकडे दुर्लक्ष केले. एका बेफिकीर धुंदीत सर्व लिहून झाले, मग पुढे काहीही होवो. पण कर्तव्यपूर्तीचा आभाळभर आनंद सर्व धाडसांपलिकडचा वाटला. अर्थात् वाचकांना त्याचे महत्त्व पटायला हवे. शेतकऱ्यांबद्दलचे त्यांचे गैरसमज दूर व्हायला हवेत. शिवाय त्यांना शेतकऱ्यांबद्दल त्याच्या प्रश्नांबद्दल जवळिक वाटायला हवी तरच हे श्रम सार्थकी लागतील. पण हळूहळू हेही होईलच.

कारण माझी 'बुढाई' कादंबरी भूमीचा, त्यातही पिकाऊ भूमीचा अतिरिक्त वापर आणि त्यामुळे भविष्यात पडणाऱ्या अन्नधान्याच्या तुटवड्याचे भीषण संकट या विषयावर होती. त्यातील गांभीर्य आता आता लोकांना कळायला लागले आहे. आत्मघाताचे दशक पुस्तकाचा विषय वरील विषयाला संलग्नच आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, शेतकरी पुत्रांची शेतीव्यवसायाबद्दलची अनास्था भविष्यात काय संकट उभे करील हे सांगता येत नाही. त्यामुळे समाजाने आपली उदासीनता सोडून या प्रश्नाकडे, शेतकऱ्याकडे, शेतीव्यवसायाकडे ममत्वाने लक्ष पुरवायला हवे. सरकारचे जाऊ द्या. ते तर उदासीन आहेच. पण नाकर्ते व पक्षावलंबी आहेत. आणि पक्षाचे धोरण आपमतलबी आहे. त्यामुळे त्याबाबत काहीच आशा नाही. पण समाजाचे तसे नाही. समाजाने मनावर घेतले तर काहीही होऊ शकते. म्हणूनच समाजाचा मुर्दाडपणा कमी व्हावा आणि त्यांचा गैरसमज दूर व्हावा; हेही या लेखनाचे प्रयोजन आहे.

मुळात शेतकऱ्याला भरपूर सवलती मिळतात, हा एक अपसमज समाजात पसरलेला आहे. ह्या लेखनाने तो दूर व्हावा. शिवाय आत्महत्या केल्यावर शेतकऱ्याला सरकारी मदत मिळतेच हाही एक अपसमज आहे. त्या मदत मिळण्यात किती अडचणी आहेत शिवाय सरकारचे, सरकारी अधिकाऱ्यांचे आणि पोलिसांचेही धोरण कसे शेतकरीविरोधी आहे; हेही ह्यातून स्पष्ट व्हावे. पुन्हा एक मुद्दाम पसरवलेला गैरसमज म्हणजे शेतकरी सरकारी मदत मिळावी म्हणून मुद्दाम आत्महत्या करतात. हा तर हास्यास्पद ठोकताळा आहे. कारण प्रत्येकच आपल्या जिवावर निरतिशय प्रेम करीत असतो. अगदी किडामुंगीही ! तेव्हा तशी जीवघेणी परिस्थिती असल्याशिवाय कोणीच जीवावर उदार होणार नाही. शिवाय पैसे मिळावेत म्हणून कोणीही जीव देणार नाही. तुम्हाला एक लाख शेतकऱ्याला मिळतात ती रक्कम सोडून द्या पण एक कोटी जर कोणी दिलेत तर तुम्ही कराल का आत्महत्या ? हा माझा शेतकऱ्याच्या वतीने सर्वांना प्रश्न आहे.

आता विदर्भ सोडून, मराठवाडा, खानदेशमध्येही आत्महत्या व्हायला लागल्या आहेत. आंध्रप्रदेशामध्ये

होताहेत. आता त्या सर्वत्र व्हायला लागल्या आहेत. हाच याचा अर्थ आहे. तेव्हा ह्याही विषयातील गांभीर्य काही कालावधीनंतर लोकांना कळेल. पण तोपर्यंत शेतकरी वर्गच नामशेष होऊ नये म्हणजे मिळवली. कारण नवे शेतकरी तयार करणे तसे अशक्यच.

आणखी एक अधोरेखित करावा असा महत्त्वाचा गैरसमज म्हणजे शेतकरी आळशी असतो हा ! हा तर धादांत गैरसमज आहे. कारण शेतकरी आळशी राहूच शकत नाही. उलट त्याला चोवीस तास आणि बाराही महिने काम असते म्हणूनच तो भर उन्हाळ्यात जेव्हा थोडे कमी काम असते; तेव्हा मुलाबाळांची लग्ने उरकतो. शेती पेरल्यावर भर पावसाळ्यात आषाढीची वारी करतो. तेवढीच त्याची तीर्थयात्रा आणि लग्नकार्याची फक्त तेवढीच त्याची उसंत असताना तो आळशी कसा ? बहिणाबाई कृषिकन्या !. आपल्या कवितेत म्हणतात.

'काया काया शेतामधी । घाम जिरव जिरव
तवा उगलं कायामधून हिरवं'

काळ्या मातीतून हिरवी जीवनदायी निर्मिती आपोआप होत नाही. तरी शेतकऱ्याला फुकटचा सल्ला दिला जातो. जोडधंदे करा. हे म्हणजे त्या सुनवायरीसारखेच झाले. घरचे सर्व काम करून वर शेतावर काम करा आणि रात्री नवऱ्याच्या तावडीत तळमळा. असले फुकटचे सल्ले दिल्याप्रमाणे तोंडाची वाफ गमावण्यापेक्षा शेतमालाला भाव दिला की झाले. वरे तुम्हाला धान्याचे वा शेतीतून निर्माण होणाऱ्या पदार्थांचे भाव वाढवून द्यायचे नसले तर एक करावे. शेतकऱ्याला शेतमालाला सबसिडी द्यावी. म्हणजे दुप्पट भावाने खरेदी करून सरकारने ते निम्म्याकिमतीत जनतेला पुरवावे. रेशनच्या धान्याप्रमाणे सार्वत्रिकीकरण करून पहावे. पण अन्नधान्यासारख्या आवश्यक आणि उपयोगी गोष्टींकडे दुर्लक्ष होते.

सरकारच म्हणते आम्ही शेतकऱ्याला हे देतो, ते देतो, पॅकेज देतो. पण सरकारी अधिकारी एवढे भयानक चटावलेले लांडगे असतात की, ते शेतकऱ्यांपर्यंत काही जाऊ देतील तर ना ? हे अधिकारी चटावलेले तर असतातच पण सरकारचे लाडावलेले पण असतात. कारण त्यांच्या भरवशावर सरकार राज्य करते म्हणून दरवेळी फशो पडते. 'लेकरू उपासी मरते आणि कुत्रे भरपेट ताव मारते.' तेव्हा असे घडू नये.

ह्याचा अर्थ शेतकऱ्याला खूप काही हवे असते; असेही नाही. त्याच्या गरजा मर्यादित असतात. त्यांची घरे साधी असतात. आपण माणसांचे प्रतिबिंब त्याच्या देवात दिसते म्हणतो. पुन्हा बहिणाबाईंची कविताच हे सिद्ध करते.

'सोन्यारूप्यानं मढवला मारवाड्याचा बालाजी ।
शेतकऱ्याचा विठू, पानाफुलामधी राजी ॥'

फक्त तुळशीचं पान विठ्ठलाला चालतं. तसेच शेतकऱ्याला फक्त शेती पेरण्यासाठी साह्य आणि शेतमालाला भाव एवढेच पुरते. कारण जवळ पैसा नसला तरी त्याला शेती पेरावीच लागते. कारण तो काही कारखाना नाही की टाळा लावला की झाले. मग कामगार भलेही उपाशी मरोत अथवा व्यापार नाही दिवाळे काढले की झाले. म्हणूनच शेतीकडे वेगळ्या दृष्टिकोनातून बघायला हवे. आणि त्यासाठीच हे लेखन करण्याचा खटाटोप केला आहे. तो कितपत साधला हे सर्वांनी ठरवायचं आहे. मुळात पुस्तक वाचायचे आहे. म्हणजे त्यातील त्रुटीही कळतील व दुसरे त्यावर लिहू शकतील.

खरे तर हे वाङ्मय प्रकारापलिकडचे जीवनसन्मुख लेखन आहे. जसे सुचले तसे लिहिण्याचा इथे प्रयत्न केला आहे. कारण तो आवेगच जबरदस्त होता. त्यामुळे आपले असे वाटलेच नाही. तर त्या पलिकडे जावेसे वाटले. एखादा उत्तम कांबळे 'वाङ्मयप्रकारांना ओलांडून पलिकडे जाते; ते खरे लेखन असे म्हणतो' आणि 'लोकांच्या मनात कायम उरते तेही खरे लेखन असे मी म्हणते.' म्हणूनच हे आत्मघाताचे दशक' पुस्तकातील लेखन वाङ्मय प्रकारापलिकडे तर गेलेच आहे पण लोकांनी ते वाचावे म्हणून आवाहन करते आहे. कारण ते वाचले तर लोकांच्या मनात कायम उरू शकेल.

❖❖❖

डॉ. प्रतिमा इंगोले
००४/ अ विंग, वृंदावन गार्डन सोसायटी,
लोकमान्य कॉलनी, वनाज समोर, पौड रस्ता,
कोथरूड, पुणे ४११ ०३८.
मोबा. : ९८५०११७९६९

अनुक्रमणिका

तावडी बोली

अशोक कौतिक कोळी

[महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या अंकात 'बोली'साठी जागा राखून ठेवली आहे. 'बोली'च्या अफाट विस्ताराचा परिचय करून देणाऱ्या अभ्यासकांपैकी श्री. अशोक कोळी यांनी 'तावडी बोली'चा परिचय ह्या अंकासाठी अभ्यासार्थ पाठविला आहे.

–संपादक]

प्रत्येक बारा कोसावर भाषा बदलते, अशी एक उक्ती आहे. येथे भाषा या संज्ञेचा अर्थ 'बोली' असा अभिप्रेत आहे. विशिष्ट प्रदेशात, विशिष्ट समूहात वापरली जाणारी भाषा म्हणजे बोली ! महाराष्ट्रात अशा असंख्य बोली बोलल्या जातात. त्यातल्या काही बोलींचा आपल्याला विविध माध्यमांतून परिचय झालेला असतो. महाराष्ट्रातले काही भूप्रदेश आणि तेथे बोलल्या जाणाऱ्या बोली यांच्याविषयी आपल्याला थोडीबहुत माहिती असते. जसे की, मराठवाड्यातली 'मराठवाडी', विदर्भातली 'वैदर्भी', कोकणातली 'कोकणी', खानदेशातील 'खानदेशी'. मात्र हा परिचय वरवरचा असू शकतो. महाराष्ट्रात केवळ अशा चार-पाच बोली बोलल्या जात नाहीत, तर यांसारख्या असंख्य बोली बोलल्या जातात. खोलात जाऊन अभ्यास केला असता आपल्याला या विधानाची सत्यता पडताळून पाहता येते.

'बोली' ही विशिष्ट भूप्रदेशातील किमान समान वैशिष्ट्यांनी नटलेली मौखिक परंपरांची लोकभाषा असते. ती लोकांची लोकांनी जोपासलेली असते.

प्रत्येक बारा कोसावर भाषा बदलते. हे तत्त्व मान्य केल्यानंतर महाराष्ट्राच्या विस्तृत भूप्रदेशात असंख्य बोली बोलल्या जातात; हे मान्य करावे लागते. मराठवाड्यात मराठवाडी बोली बोलली जाते, असे विधान आपण सरसकट करतो. मात्र यापुढे जाऊन सूक्ष्मतम चिकित्सा केली असता आपल्या असे लक्षात येते की; मराठवाड्यात अजून काही बोली बोलल्या जातात. वेगवेगळ्या भूभागात या बोली आपला स्वतंत्र संसार मांडून असतात. आपली प्रदेशनिहाय सामाजिक, सांस्कृतिक वैशिष्ट्ये बोली जपून असतात. त्यांची स्वतःची अशी शब्दकळा, अर्थशक्ती आणि रसवत्ता असते. जीवन व्यवहारांशी त्या अधिक निकट असल्यामुळे त्यांच्यामध्ये संप्रेषणाचे सामर्थ्य अधिक असते. त्यांचा वापर प्रामुख्याने बोलण्यासाठी केला जातो. मराठवाडा असेल किंवा विदर्भ, कोकण अथवा खानदेश येथे एकापेक्षा जास्त बोली आपला संसार थाटून आहेत. खानदेशातील अशाच एका बोलीचा परिचय व्हावा यासाठी हा लेख. या बोलीचे नाव आहे **'तावडी बोली'** !

पूर्व खानदेशात ही बोली बोलली जाते. जळगाव जिल्ह्यातील पूर्वेकडील जामनेर, बोदवड, मुक्ताईनगर, भुसावळ आणि रावेर तालुक्यात ही बोली बोलली जाते. पश्चिमेकडील जळगाव, पाचोरा, एरंडोल या तालुक्यातील अर्धा भाग, दक्षिणेकडील मराठवाड्यातील सोयगाव-सावळतवारा-जाईचा देव, पूर्वेकडील विदर्भातील देऊळगाव-मोताळा-पिंपळगावदेवी-धामणगाव बढे, उत्तरेकडील मध्यप्रदेशातील थेट बऱ्हाणपूर-शहापूर-अंतुर्लीपर्यंतचा विस्तृत भूभाग या तावडी बोलीच्या परिप्रेक्ष्यात येतो. असे असले तरी जामनेर तालुका आणि त्याच्या भोवतीचा परिसर हा तावडी बोलीचा प्रदेश मानला जातो. या प्रदेशात तावडी बोली आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून आहे.

रामायण-महाभारतकालीन दंडकारण्याचा हा प्रदेश एकेकाळी घनदाट अरण्याचा व नापिक जमिनीचा प्रदेश होता. सध्याच्या पूर्व खानदेशातील जामनेर तालुका व वर निर्देशित केलेला भूभाग हा कायम दुष्काळी प्रदेश राहिलेला आहे. येथील जमीन तपाड आहे. या जमिनीच्या भूपृष्ठावर काळ्या, भुरकट खडकाचे आवरण राहिलेले आहे. 'ताव' हा शब्द तापवणे या अर्थाने आलेला आहे. या प्रदेशात एखाद्या व्यक्तीला 'ताप' आला असला तर 'ताव' आला आहे, असे म्हटले जाते, म्हणजेच तापलेली, तपाड जमीन असलेला हा भूप्रदेश या अन्वयार्थाने 'तावडी' प्रदेश होतो. या प्रदेशातून 'तापी' ही नदी वाहते. ती 'पाप' आणि 'ताप' हरणारी नदी असून 'सूर्यकन्या' आहे. येथली शेतजमीन काळी कसदार नसून बरड, लाल, तांबडी आहे. या शेतजमिनीत पाहिजे तसे बागायती पीक घेता येत नाही. सिंचन आणि पिण्याच्या पाण्याचो या

अनुक्रमणिका

भागात कायम टंचाई राहिलेली आहे. मोसमी पाऊस येथे मोठ्या प्रमाणात होत नाही. पावसाचे पाणी साचून राहू शकत नाही. त्यामुळे कायम येथे पाणी टंचाई, दुष्काळ सदृश्य परिस्थिती राहिलेली आहे. रणरणत्या उन्मात तापणारी, येथील तपाड-भूमी 'तावडी पट्टी' म्हणून ओळखली जाते. या भूप्रदेशाची अशी ओळखच निर्माण झाली आहे. या 'तावडी पट्टीत' बोलली जाणारी 'तावडी बोली' येथील प्रादेशिक, भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक वैशिष्ट्ये जपत आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून आहे.

उच्चारप्रक्रिया, वैशिष्ट्यपूर्ण शब्दसंग्रह, म्हणी, वाक्प्रचार, लोकोक्ती, लोकवाङ्मय व लिखित वाङ्मय यांच्या आधारे 'तावडी बोली'ची ओळख आपल्याला करून घेता येईल.

उच्चार प्रक्रिया :

स्वरबदल, व्यंजन बदल, उच्चार सुलभीकरण, काटकसर, क्रियापद बदल इत्यादी वैशिष्ट्यांमधून तावडी बोलीची उच्चारण प्रक्रिया समजावून घेता येईल.

स्वर बदल :

शब्दारंभी येणाऱ्या 'अ' स्वराच्या जागी 'आ'चा उच्चार तावडी बोलीत आढळतो. जसे-

प्रमाण मराठी	तावडी बोली	प्रमाण मराठी	तावडी बोली
अरे !	आरे !	अशोक	आशोक
असं	आसं	अशी	आशी
अमृत	आमरुत	अर्धा	आरधा

'ऊ' स्वराच्या ऐवजी 'वू' -

प्रमाण मराठी	तावडी बोली	प्रमाण मराठी	तावडी बोली
पाऊस	पावूस	जाऊ	जावू
पाऊल	पावूल	भाऊ	भावू
खाऊ	खावू	घेऊ	घेवू

'ए'च्याऐवजी 'य' चे उच्चारण-

प्रमाण मराठी	तावडी बोली	प्रमाण मराठी	तावडी बोली
एक	यक	एकाएकी	यकायकी
एखादी	यखादी	एकंदरी	यकंदरी
एकटा	यखटा	एकूण	यकून

'ऐ' ऐवजी 'आइ''/'आय'-

प्रमाण मराठी	तावडी बोली	प्रमाण मराठी	तावडी बोली
ऐकीव	आयकीव	ऐन	आइन
ऐच्छिक	आयच्छिक	कैक	कइक
ऐतखाऊ	आयतखावू	ऐंशी	आइशी

'ओ'च्या जागी 'व' -

प्रमाण मराठी	तावडी बोली	प्रमाण मराठी	तावडी बोली
ओळख	वयक	ओटी	वटी
ओ !	वऽ !	ओढ	वढ
ओकारी	वक्कारी	ओखाटी	वखाटी

'औ' च्याजागी 'आवू'/'आव' -

प्रमाण मराठी	तावडी बोली	प्रमाण मराठी	तावडी बोली
औषध	आवशद	औत	आवूत
औलाद	आवलाद	हौस	हावूस
औकात	आवकात	औपचारिक	आवूपचारिक

व्यंजन बदल :

'क' व्यंजनाच्या जागी 'ख' व्यंजनाचा उच्चार तावडी बोलीत मोठ्या प्रमाणावर आढळतो. जसे की - डोखं (डोकं), बोख्या (बोक्या), खोखा (खोका), मोखा (मोका), यखला (एकला), इखडे (इकडे), कुखडे (कुणीकडे) इत्यादी.

'ज' च्या ऐवजी 'झ' : पायझे (पाहिजे), झन (जन), झालं (जाहलं).

'झ' च्याऐवजी 'ह' / 'ह्य' : तुहे (तुझं), महे (माझं), तुह्यासाटी (तुझ्यासाठी), मह्यासाटी (माझ्यासाठी), मह्या (माझा), तुह्या (तुझा).

'ट' च्याऐवजी 'त' : टरबूज (तरबूज), तिकीट (टिकीट), माती (माटी).

'ठ'च्या ऐवजी 'ट' : साटी (साठी), मीट (मीठ), गोट (गोष्ठ), रोट (रोठ), म्होटा (मोठा), सुट (सुंठ), शेट (शेठ) इ.

'ण' च्या ऐवजी 'न' : पानी (पाणी), रानी (राणी), गानं (गाणं), जेवन (जेवण), यकून (एकूण), गनपती (गणपती), खान (खाण) इ.

'न' च्याऐवजी 'न्ह' : कोन्ह (कोण), मयन्हा (महिना).

'त्या' च्याऐवजी 'त्ये' : त्येच्या (त्याच्या), त्येची (त्याची), त्येल्हे (त्याला) , त्येंच्ही (त्यांची), त्येंल्हे (त्यांना), त्येंच्ह्या (त्यांच्या) याप्रमाणे.

'थ' च्याऐवजी 'ठ' : तठी (तेथे), आठी (येथे).

'द'च्याऐवजी 'ध' : नधी (नदी), गाधी (गादी), वाधी (वादी), बाधली (बादली), साधं (सादं), आधी (अगोदर), कुंधा (कुंदा).

अनुक्रमणिका

'प'च्या ऐवजी 'फ' : दुफार (दुपार), आफार (अपार), फुकारा (पुकारा), फायी (पाळी).

'म' च्याऐवजी 'म्ह' : लाम्हन (लामण), म्हालन (मालण), म्होटा (मोठा), वाह्मन (ब्राह्मण).

'ल' च्या जागी 'ल्ह' : पयल्हा (पहिला), मल्हे (मला), तुल्हे (तुला), त्येल्हे (त्याला), तिल्हे (तिला), मेल्हा (मेला), गेल्हा (गेला), पेल्हा (तिला).

'वि'च्या जागी 'इ' : इज्या (विजय), इजय (विजय), इलास (विलास), इठ्ठल (विठ्ठल), इकास (विकास), इच्यार (विचार), इहीर (विहीर).

'श', 'ष' च्या जागी 'स' : वर्स (वर्ष), पूस (पौष), गोस्ट (गोष्ट), सपस्ट (स्पष्ट), आकास (आकाश), आकूस (अंकुश), संतोस (संतोष), सवासीन (सवाशीण), केसर (केशर), साळा (शाळा).

'ळ'च्या जागी 'य' : कमय (कमळ), काया (काळा), निया (निळा), डोया (डोळा), भोया (भोळा), मोयी (मोळी), इय्या (विळा), जयगाव (जळगाव), गोया (गोळ्या), नारय (नारळ), पायना (पाळणा).

'क्ष' च्या जागी 'कश' : राकशस (राक्षस), शिकशक (शिक्षक), शिकशा (रिक्षा), शिकशा (शिक्षा), भिकशा (भिक्षा), परीकशा (परीक्षा), समीकशा (समीक्षा), आकशदा (अक्षदा), दकशता (दक्षता).

उच्चारण सुलभीकरण :

सुंयक्त/जोड अक्षरांचे उच्चारण सुलभ करण्याकडे तावडी बोलीचा कल दिसून येतो. ही प्रक्रिया पुढील प्रमाणे घडते-

मारगं (मार्ग), मारकं (मार्क), मिरुग (मृग), पयसा (पैसा), जवारी (ज्वारी), किरतन (कीर्तन), कारतीक (कार्तीक), किरती (कीर्ती), कवतिक (कौतिक), भवतिक (भौतिक), निरनय (निर्णय).

काटकसर :

कमीत कमी शब्दात जास्तीत जास्त आशय व्यक्त करण्याकडे तावडी बोलीचा कल दिसून येतो. त्यासाठी पुढीलप्रमाणे शब्दांची काटकसर केली जाते-

आल्था (आला होता), गेल्था (गेला होता), कधलोंक (कधीपर्यंत), कुठलोंग (कुठपर्यंत), काव्हाचा (केव्हापासूनचा), तधलोंग (तिथपर्यंत), आठलोंग (इथपर्यंत), पाहाल्ता (पाहिला होता), राहल्ता (राहिला होता), झाल्ता (झाला होता).

क्रियापद बदल :

काटकसरीचे तत्त्व तावडी बोलीतील क्रियापदांच्या बाबतीतही अवलंबिले जाते. तसेच बहुतेक वेळा क्रियापदांत बदलही संभवतो. तो पुढीलप्रमाणे-

हाये (आहे), गेल्हा (गेला), मेल्हा (मेला), व्हतं (होतं), निव्हतं (नव्हतं), देल्हं (दिलं), गेल्हं (गेलं), गेल्थो (गेलो), राहाल्तो (राहिलो होतो), पाहाल्तं (पाहिलं होतं), जाझो (जाऊन ये).

काही वैशिष्ट्यपूर्ण नामे :

नाम्या (नामदेव), इल्या (विलास), इज्या (विजय), आज्या (अजय), संज्या (संजय), धोंड्या (धोंडू), कवत्या (कवतीक), बाब्या (बाबुराव), इठ्या (विठ्ठल), पारवती (पार्वती), शांती (शांता), कांती (कांता), तुक्या (तुकाराम), सक्या (सखाराम), संगी (संगीता), रंजी (रंजना), काशी (कासाबाई), राज्या (राजाराम), सुऱ्या (सुरेश), गिरशा (गिरीष), आन्या (अनिल), सुन्या (सुनील), गोइंद्या (गोविंदा), दूरगी (दुर्गा), सुपडी (सुपडाबाई), शेनफड्या (शेनफडू), उखल्ड्या (ऊखर्डू), शित्या (सिताराम), रामधन्या (रामधन), सम्या (समाधान).

काही वैशिष्ट्यपूर्ण सर्वनामे :

भो (भाऊ), बीन (बहीण), बयन्हा (बहीण), बायजा (आत्या), बोय (आजी), म्हतारा (बाप), म्हतारी (आई), जेठानी (मोठी जाऊ), देरानी (लहान जाऊ), चांबल्डी (आजी), डोबल्डा (आजोबा), बी (सुद्धा), जो (जवळ), न् (आणि), तूं (तर), मोन्हं (मी), तुन्हं (तू), महे (माझं), तुहे (तुझं).

तावडी बोलीतील वैशिष्ट्यपूर्ण शब्दसंग्रह :

कोणत्याही बोलीचा शब्दसंग्रह हीच त्या बोलीची खरी ओळख व खरी संपत्ती असते. बोलीच्या शब्दसंग्रहावरून त्या बोलीचे वैशिष्ट्य व स्वरूप समजून येते. 'तावडी' बोलीतील शब्दसंग्रह हा इतर खानदेशी बोलींपेक्षा व प्रमाण मराठी भाषेपेक्षा निश्चितच वेगळा असल्याचे दिसून येते. तावडी बोलीतील शब्द, त्यांचा उच्चार यांचा अर्थ स्पष्टपणे समजल्याशिवाय आपल्याला तावडी बोलीचे स्वरूप समजून घेता येणार नाही.

तावडी बोलीत अशा वैशिष्ट्यपूर्ण शब्दांचा संग्रह आहे. हे शब्द म्हणजे तावडी बोलीचा अस्सल, सशक्त आविष्कार आहे. या शब्दांना समाजभाषा वैज्ञानिकदृष्ट्या

लक्ष्यार्थ व व्यंगार्थाने घ्यावे लागते. प्रत्येक शब्दाला ध्वनीचे एक अंग आणि अर्थाचे दुसरे अंग असते. 'निपत्तर' या शब्दाचा अर्थ 'नित्कृष्ट' असा वाच्यार्थाने घेता येतो. परंतु बोलीच्या लक्ष्यार्थानं हा शब्द 'कवडीमोल जीवन' याचा निदर्शक आहे. 'फोतर' या शब्दाचा अर्थही तसाच आहे. तावडी बोलीमध्ये रुढ झाले हे शब्द व्यावहारिक मूल्ये, जीवनातील विसंगती, शोषण, हळहळ, दुःख अशा विविध भावनांचे प्रकटीकरण करताना स्थिर झालेले आहेत. "या शब्दांचा अर्थ शब्दकोशाच्या परिवेशात बांधता येत नाही,"१ डॉ. किसन पाटील यांच्या मतानुसार तो प्रत्यक्ष जीनात रूढ झालेल्या परंपरा, व्यवहार मूल्यांतून सिद्ध होत असतो. पुढील उदाहरणांवरून आपणास तावडी बोलीतील भाषिक व्यवहार समजून येईल.

वैशिष्ट्यपूर्ण शब्द -

तावडी बोली	प्रमाण मराठी	तावडी बोली	प्रमाण मराठी
आयपत	ऐपत	बोखारा	जांघ
लाम्हन	लांबलचक	आन्खी	आणखी
गवांदी	भागीदार	तोम्हात	संकट
उपेग	उपयोग	जवाइ	जावई
उखल्डा	उकिरडा	कुठी	कुठे
आभाय	आभाळ	नल्डा	नरडा
तितंवा	त्रांगडं	भरोसा	विश्वास
हाजाम	न्हावी		

वैशिष्ट्यपूर्ण शब्दकळा -

तावडी बोलीमध्ये असे काही शब्द आहेत की जे अर्थाच्या दृष्टीने वेगळे आहेत. त्यांच्यामागे विशिष्ट अर्थ लपलेला असतो. अशा शब्दांचा अर्थ आपण लक्षात घेतला पाहिजे.

तावडी बोली	प्रमाण मराठी	तावडी बोली	प्रमाण मराठी
डांगरा	म्हातारा माणूस	गोऱ्याबैल	बांयकोच ऐकणारा
हेला	रिकाम माणूस	डोबड	म्हातारी स्त्री
नितातेल	हावरट	रांड	शील नसलेली स्त्री
चूढेल	स्त्री राक्षस	बुरायेल	गलीतगात्र
शिदोड	गांडूळ	सांड	मोकाट तरुण
वगारु	म्हशीच पिलू	पन्हेर	पाणी

वैशिष्ट्यपूर्ण विशेषणे -

तावडी बोली	प्रमाण मराठी	तावडी बोली	प्रमाण मराठी
खारवाज	मत्सरी	टेंभूजी	टेंभा मिरवणारे
वाख्खर	खराब	कन्हय	तुसट
टकूरे	विनडोक	चलवादी	चवचाल स्त्री
गेलचोदा	वेंधळा	डेबरा	ढेरपोट्या
उखारी	वाईट सवय	चुमुन	दबून
झमेला	झंजट	तिताल	वनवावनवी करणारा

अपशब्द -

अपशब्दात विशिष्ट असा अर्थ असतो. तो परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमीत केला जातो. या शब्दांना आपण वाईट शब्द, वाईटासाठी वापरलेले शब्द किंवा शिवी असेही म्हणू शकतो. तावडी बोलीत अशा अपशब्दांचा वापर विपुल प्रमाणावर केला जातो. तो पुढील प्रमाणे -

तावडी बोली	प्रमाण मराठी	तावडी बोली	प्रमाण मराठी
तोंडाय	बडबड करणारा	हाडवाय	मूलवाळ
जायेल	नालायक	साला	बहिणीचा भाऊ
लव्हंडा	सांगकाम्या	ठोक्या	लंपट
हिजडा	नपूसक	खुडूक	अनुत्तरित
ढोसलेल	पिलेला	गांडू	नामर्द
गधडा	गाढव	फयकार	माजावर आलेली

नादानुकारी व अर्थवाही शब्दांच्या जोड्या -

तावडी बोली	प्रमाण मराठी	तावडी बोली	प्रमाण मराठी
आवरसावर	आवराआवर	घाबरघुवर	भीतभीत
घानीमानी	अवतीभोवती	जावयव	जाणयेणं
झांबलझुंबल	शोधाशोध	ढोरंढाकर	गुरढोरं
ढोसलढासल	खाणेपिणे	वयकपायक	ओळखपाळख
वजेवजे	हळूहळू	चाफलचुफल	शोधाशोध
सोयपानी	खानपान व्यवस्था	न्यारन्यारं	वेगवेगळं

लोकोक्ती -

लोकोक्ती ही बोलीची मौखिक शब्द परंपरा असते. लोकसमूहाच्या जीवन व्यवहारात ती पिढ्यान्‌पिढ्या प्रचलित असते. लोकसमूहाच्या दैनंदिन जीवनव्यवहारात काही वाक्य मौखिक परंपरेतून रूढ झालेली असतात. अशा विचारप्रवण, व्यवहारचतुर आणि जीवन धारणा व्यक्त करणाऱ्या वाक्यांना म्हणी, वाक्प्रचाराचे स्वरूप प्राप्त होते. त्या लोकोक्ती म्हणून रूढ होतात. या वाक्यांना असलेले लक्ष्यार्थ, व्यंगार्थ ह्या समाजात रूढ असलेल्या काही रीती-रिवाजांच्या संकल्पनेतून प्रकट होतात. तावडी बोलीतील काही लोकोक्ती लक्षणीय आहेत. त्यांच्या वापरामुळे तावडी बोलीला भारदस्तपणा, प्राप्त झालेला

आहे. तावडी बोलीतील स्वतंत्र स्थान असलेल्या काही म्हणी व वाक्प्रचार पुढीलप्रमाणे -

वाक्प्रचार -

आकायनी येने (जेरीस येणे), आट्या सरकने (वेड लावणे), उखयात मुंडकं खुपसने (नको असलेले काम स्विकारणे), उट लागणे (अडथळा येणे), केईचा वाग कापने (नुकसान करणे), काडी मोडणे (विषय संपविणे), कानोडपन लागने (मान खाली घालणे), कयवार घेणे (वाजू घेणे), कोल्डी वट हेपलने (ऐपत नसतांना रुबाबात राहणे), खाली पडून वरच्ह्याचा जीव घेने (पडीचं मत घेणे), गायवर गधडं चढवने (खोटा आरोप करणे), गुव्हातली कवडी काढने (कंजुसपणा करणे), घाटावून उतरेल समजने (अडाणी समजणे), गांडीत पानी वतने (घाबरवणे), ठिकऱ्यात मीठ नसने (ऐपत नसणे), वांग्यात घोडं घालणे (नुकसान करणे), ढुक ठिवने (अपेक्षा ठेवणे), डुक ठिवने (बदल्याची भावना ठेवणे), तंगड्या देणे (व्यभिचार करणे), डंगरा फसविणे (फसवणूक करणे), वैलं हरवणे (भानावर नसणे) इ.

म्हणी -

आयजीच्या जीवावर बायजी उदार (दुसऱ्याच्या जीवावर वट मारणे), आपल्या मोरीत आपल्याले मुत्याची चोरी (स्वतःच्या वस्तूचा उपभोग न घेता येणे), आली आंगावर घेतली शिंगावर (संधी आल्यावर सोडायची नाही), कावरेल गाय काटे खाय (अविचाराने वागणे), कुठी बी जा पयसाले पानं तीनस (सर्वदूर सारखी परिस्थिती असते), कऱ्याले गेल्हा काय आन् उल्टे झाले पाय (अपेक्षेपेक्षा विपरीत घडणे), खऱ्याचा खरावा खोट्याले दरावा (खऱ्यापेक्षा खोट्याचा उदो उदो करणे), गांड ना फोदा झव रे दादा (क्षमता नसांना पोकळ वल्गना करणे), गांड मारून बापाच नाव चालवने (नुकसान सोसून हाती घेतलेलं काम तडीस नेणे), पोटात नि काही हाग्याचा तरफडा (कुवत नसताना हाव धरणे), हेल्या मांघी डंगरा उपाशी (निरर्थक गोष्टीत अडकून पडणे), येरे वैला मल्हे मार (स्वतःहून भांडण ओढवून घेणे.)

लोकवाङ्मय -

लोकवाङ्मयात लोकगीते, लोककथा, लोककथागीते आणि मौखिक शब्द वाङ्मयाची परंपरा ही पिढ्यान्‌पिढ्या जोपासलेली असते. लोकवाङ्मय हेही भाषेचाच आधार घेऊन अवतरले. समुहमनाच्या भावना व विचार यांची ती अभिव्यक्ती असते. मात्र लोकसाहित्यातील शब्दपरंपरा ही मौखिक परंपरा असते. यात म्हणी, वाक्प्रचारांसोबतच लोकगीते, लोककथा, उखाणे, ओव्या यांचा समावेश होतो. यातील बरेच वाङ्मय कोणत्या ना कोणत्या कृतीशी, रूढी, परंपरा, विधींशी, सण, उत्सवाशी संबंधित असते. हे वाङ्मय त्या समाजाच्या जगण्याशी बांधले गेलेले असते. स्वाभाविकच त्या समाजातील भाषा, तिच्या लकबी यांचा सहज आविष्कार या लोकसाहित्यातून होतो. त्याद्वारे संस्कृती, परंपरा, रीतीरिवाज यांचे संक्रमण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे होते. असे लोकवाङ्मय तावडी बोलीत आजही विपुल प्रमाणात उपलब्ध आहे.

उखाणे -

१) उभी व्हती माडीवर, उन पडे साडीवर
माणिकरावांल्हे पानी देते कापसाच्या गाडीवर

२) बुंदीचा लाडू, हातावर फोडू
चाला चाला नारायण, आपू सोम्मार सोडू

३) चांदीच्या ताटलीत, दही आन् काजू
आशोकरावाचं नाव घ्याले, मी कशाले लाजू

४) सोन्याच मंगयसुतरं, त्येच्यात काये मनी
इलासराव हायती, मह्या जीवाचे धनी

५) आडघर पडघर, पडघरात पुऱ्हानं
तिरमकच्या वयन्ही नेल्ह्या चोरानं, त्येंच्हं मह्यालोंग आलं गऱ्हानं

ओव्या -

१) मायच्या मयात नको जावू मुसलमाना ।
केई वायातीन घात केल्हा दुसमना ॥

२) वहिन भावंडं यका येलाचे वायकं ।
आली परायाची लेक केल्हे सग्गे भावू लोकं ॥

३) जाईन शेताले उभी राहिन बांदाले ।
भावू गव्हाले हाका मारीन चांदाले ॥

४) चाला बयन्हा जावू भावूच्या मया जावू ।
भावू पेन्हे गहू आपू नधीची धार पाहू ॥

५) माय म्हनल्यानं व्हटाशी व्हट भिडे ।
मावशी म्हनल्यानं आंतर किती पडे ॥

लोकगीत -

१) आडकीत जावू बाई खिडकीत जावू ।
खिडकीत व्हता सावू, भुलाबाईले लेक झाला. नाव ठिवा बाबू ॥

आडकीत जावू बाई खिडकीत जावू ।
खिडकीत व्हती आस्तेरी भुलाबाईले लेक झाली, नाव ठिवा कस्तुरी ॥
आडकीत जावू बाई खिडकीत जावू ।
खिडकीत व्हता गिल्लास, भुलाबाईले लेक झाला, नाव ठिवा इल्लास ॥

२) नवरदेव नवरी माय कशी न्हाते ।
तेल पान गं बनी जाते ॥
तेल पानी गं मोर पेतो ।
तठुन मोर उडियेला-
आंब्याच्या डंगीवर बशियेला ॥
आंब्या चाफ्याची हिरवी काडी ।
नवरी मांघते हिरवी साडी ॥
नवरा नवरीले बोल्हावतो ।
शिडी चंदनाची तिल्हे लावतो ॥
बंगई मोत्याची तिल्हे टांगतो ।
आंग धुतलं नवरीचं ।
आंग धुतलं नवऱ्याचं ।
नवरदेव नवरी माय कशी न्हाते ॥

लिखित साहित्य -

लोकजीवन व लोकभावनांचा आविष्कार प्रथम लोकसाहित्यातून होतो. त्यातून पुढे लिखित साहित्याच्या निर्मितीची शक्यता तयार होते. लोकवाङ्मय आणि आधुनिक ललित वाङ्मय यांचा परस्पर अनुबंध सर्वश्रुत आहे. आधुनिक नव्या पिढीला आपल्या पूर्वपरंपरा आणि लोकवाङ्मयाच्या भांडारातून तसेच मौखिक बोलीच्या जीवनव्यवहारातून लेखनासाठी काही सर्जनशील बीजे सापडतात. यातून प्रेरणा घेऊन नवी कथा-कविता साकारते. लिखित साहित्याचा निर्माता एकटा व्यक्ती असला तरी तो त्या समाजाचा प्रतिनिधी म्हणून आपल्या लेखनातून मानवी जीवनाचे दर्शन घडवीत असतोच. ललित लेखक जेव्हा जीवनचित्रण करतो; तेव्हा लोकसंस्कृतीतील अनेक घटकांचाही आविष्कार त्याच्या लेखनातून घडत असतो. तावडी बोलीतून आपल्या परिप्रेक्ष्यात काही लेखकांनी येथील ग्रामीणता, शेती, शेतकरी, शेतीसंबंधीत बाबी सिंचन, पाणी, पशु, देव, देवता, सण-उत्सव, परंपरा, रीतीरिवाज, स्त्रीजीवन, समाज, संस्कृतीचे दर्शन घडविले आहे. यात पद्मश्री ना. धों. महानोर, एकनाथ देशमुख, रवींद्र पांढरे व प्रस्तुत लेखकाचा विशेषत्वाने उल्लेख करावा लागतो. यातील महानोर, देशमुख व पांढरे त्यांच्या साहित्यातून तावडी बोली व समाज संस्कृतीचे, ओझरते दर्शन घडते. मात्र प्रस्तुत लेखकाच्या लेखनातून तावडी बोली, समाज संस्कृतीचे जाणीवपूर्वक प्रभावी व ओघवते दर्शन घडते. सदर लेखकाने तावडी बोलीतून जाणीवपूर्वक लेखन करून या बोलीला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. वाङ्मयक्षेत्रात मोलाचे स्थान मिळवून दिले आहे. "खानदेशी तावडी बोलीला वाङ्मयीन प्रतिष्ठा आणि ती भाषा बोलणाऱ्या समूहाच्या जगण्याला साहित्याची आशयवस्तू होण्याची संधी देण्याचा प्रयत्न अलिकडच्या काळात अशोक कौतिक कोळी समर्थपणे करताना दिसतात."[२] हे. भा. ल. भोळे यांचे विधान लक्षात घेण्यासारखे आहे. कोळी यांच्या 'कूड', 'आसूड' (कथासंग्रह), 'पाडा' (कादंबरी) यासारख्या कलाकृतींतून विविध घटना, प्रसंग, अनुभव, व्यक्तीचित्रे, सण-उत्सव, परंपरा, समाज, संस्कृती तावडी बोलीतील अनेक अर्थपूर्ण व लयदार शब्द, वाक्प्रचार, म्हणी प्रथमच मराठी साहित्य सृष्टीत हजेरी लावताना दिसतात. नमुनादाखल पुढील उतारे पाहू.

१) "पोया चार दिवसावर यून ठेपला व्हता. हे समजल्यावर आम्हाले कोन्ही आनन झाला. आनंदाच कारन बी तसस व्हतं. आमच्ही यवढ्या दिसाची फटमार थामनार व्हती. आमच्ही उपासमार थामन्हार व्हती. कशी म्हना ! त्येच आसं व्हतं, पोया हा सन आमच्ह्या हाक्काचा ! हाक्काचा येच्यासाटीकी गावावर इडापिडा यू नही, मरीमायचा फेरा यू नही, म्हणून पोयाच्या दिशी तिल्हे निवद दाखवल्या जात व्हता. हे निवदाची कढाई गावातल्या परत्येक घरातून जात व्हती. आन् कढाई दयाचा आधिकार फक्त कोळीन बाईचा ! बलुतं व्हतं त्ये आमच्हं. सालभर पाटलाच्या घरी पानी भऱ्याचं... तलाठ्याची कोतवाली कऱ्याची... त्येच्या बदल्यात हे बलुतं ! मरीमायची कढाई म्हन्जे चांगल्या चुंगल्या जित्रसांची मेजवानीस. मही माय कढाई ग्यून जाये. मरीमायले निवद दाखवला की बाकीचा माल घरी घ्यून ये..."[३]

***

२) "काय नाराजी हे शंकरभू ?"
"नाराजी काय म्हनाऽ पन जीव कीदरवला बॉ ह्या

कपाशीनं ! यव्हार आटकून पडले सम्दे. कोन्थास उमज नि पडू राहाला. यक गोस्ट मनासारकी नि घडू राहाली. ढोराढाकरांपुढी चारा ना घरात दायदाना ! मन मारून जगनं आलं. लाचारीचं जीनं पधरी आलं. जशाकाही शेतकऱ्याले भावना नि. आपलं आसून आपू चोर; माल पिकावून जीवाले घोर !''

''हे आसस चाल्नार हे शंकरभू ऽ ?''

''आसं कसं काय म्हनून राहाले वॉ तुम्ही !''

''खोटं काय हाये तिच्यात ! आपल्या हातात काय हाये बरं ?''

''कोन्हाच्या हातात हाये तं् मंग ?''

''.......''

''सत्ता आपली हाये का परक्याची ?''

''......''

''गोरी राजवट चांगली व्हती येच्या पेकशा.''

''कशावून ?''

''यवढा भस्टाकार नि व्हता त्या टायमाले.''

''भस्टाकार कमी व्हता हे गोठ खरी हाये; पन शेतकऱ्याची हालत खरावस व्हती शंकरभू त्या टायमाले बी.''

''हेस ! हेस ! म्हन्याच हाये मंग मल्हे ! आता आपून गुलामगिरीत हायती का ?''

''........''

''नही नं ! आपले शासन हाये न ? शेतकऱ्याचे पोऱ्हं मंतरी-संतरी झाले. कुरशी मंतरी म्हंना का मुख्यमंतरी म्हना, सरे आपलेस हायती न ? मंग काहून सुदरत नि शेतकऱ्याची हालत, सांग मल्हे ?''[४]

***

३) 'सुरेश इंगळेनं खरी मायथी सांगली. चांगदेव आन् दामूदाचं बोल्न सुरू आस्तांना तठी आला व्हता तो. बाकीचे शेतकरी बी गोया झाले. सांग्याले लागले,

''लोडशेडींगच्या नावाखाली रोज बारा-बारा तास लाईन गायप राहाते. मंग निधान बाकीच्या वक्तावर तं् नेंभन चालू द्या म्हना वटकीच्या हो ! पन् नही ! तसं करीन त्यें इज मंडय कशाचं. बोल्याले गेल्हं तं् बोल बोलू देता नि. उलट सुलट उत्तरं देता. दावून माऱ्याले पाहाता शेतकऱ्याले. हाल्की वडांग पाहून केन्ही बी पाय द्याले पाहातं सालं !''

''आत्ता आन्खी यक नवाडं धुंडूक पाहून काढलं त्यें‍न्हं''

''कोन्थ ?''

''झिरो लोडशेडींगच !''

''हाव न् सालपनी ! खऱ्याचा खरावा खोट्याले दरावा हाये ह्या जातं.''[५]

***

खानदेशी तावडी बोली अशी संपन्न आहे. तिचा आशयघन समृद्ध वारसा जतन करण्याअची आवश्यकता आहे. आज अनेक बोली लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. प्रमाव मराठीला समृद्ध करण्यासाठी तावडी सारख्या असंख्य बोली वाचवायला हव्यात. त्यासाठी तिचा संपन्न वारसा जतन करण्याची गरज आहे. अधिकाधिक अभ्यासक, संशोधकांनी तिच्यावर काम करायला हवे. तावडीतील मौखिक वाङ्मयाला प्रोत्साहन देण्यासोबतच अधिकाधिक लेखकानी तावडीतून लेखन करण्यासाठी जाणिवपूर्वक पुढे येण्याची गरज आहे. शेवटी सुप्रसिद्ध कवी विठ्ठल वाघ यांच्या ओळी उद्धृत कराव्याशा वाटतात,

''कोरडे जे शेत आहे
ओलीत झाले पाहिजे
मुक्या जिवांचे दुःख ह्या
बोलीत आले पाहिजे.''[६]

समारोप -

१) विशिष्ट भूप्रदेशात, विशिष्ट समूहात वापरली जाणारी भाषा म्हणजे बोली. महाराष्ट्रात अशा असंख्य बोली बोलल्या जातात. 'तावडी बोली' त्यापैकीच एक.

२) रामायण - महाभारतकालीन दंडकारण्य व आत्ताच्या पूर्व खानदेशात ही बोली बोलली जाते. 'तावडी पट्टा' म्हणून हा प्रदेश ओळखल्या जातो.

३) तावडी-पट्टीतील तावडी-बोली येथील प्रादेशिक, भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक वैशिष्ट्ये जपत आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून आहे.

४) तावडी बोलीत वैशिष्ट्यपूर्ण शब्दसंग्रह. म्हणी, वाक्प्रचार, लोकगीते, लोककथा, उखाणे, ओव्या आदी मौखिक वाङ्मयीन परंपरा मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात आहे.

५) तावडी बोलीत लेखन करणारे अशोक कौतिक कोळी हे आजच्या घडीचे आघाडीचे लेखक असून त्यांचे 'कूड', 'पाडा', 'आसूड', 'गावाकडच्या कविता' इ.

ग्रंथ प्रकाशित आहेत.

संदर्भ व टीपा -

१) डॉ. किसन पाटील : प्रस्तावना आसूड, 'आसूड', ले. अशोक कौतिक कोळी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे - ३०, नोव्हेंबर २००८ पृष्ठ : सतरा.

२) भा.. ल. भोळे : कुंधा खोदल्यावाचून शेतीला भवितव्य नाही, प्रिय रसिक, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, नोव्हेंबर २००८, पृष्ठ : ९.

३) अशोक कौतिक कोळी, 'कूड', स्वरूप प्रकाशन औरंगावाद, प्रथम आवृत्ती : सप्टेंबर २००३, पृष्ठ : १३.

४) अशोक कौतिक कोळी, 'आसूड', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे - ३०, प्रथमावृत्ती : नोव्हेंबर २००८, पृष्ठ : २०.

५) अशोक कौतिक कोळी, 'पाडा', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथमावृत्ती : मार्च २००६, पृष्ठ : ३३.

६) डॉ. विठ्ठल वाघ, मुक्या जीवांचे दुःख, मराठी बालभारती इयत्ता आठवी, पाठ्यपुस्तक मंडळ - पुणे ४, प्रथमावृत्ती : २००९, पृष्ठ : १५२.

❖❖❖

अशोक कौतिक कोळी

'कूड', गणपती नगर, सेक्टर - ३, जळगाव रोड, जामनेर,
जि. जळगाव (खानदेश) - ४२४ २०६
फोन : ०२५८०-२३२८०८, मो. : ९४२१५६८४२७

तंजावरी नाटके

प्रा. डॉ. मुकुंद कृष्ण पुजारी

[इ.स. १६६४ ते १८५५ हा तंजावरी नाटकाचा कालखंड मराठी रंगभूमीला प्रेरणा देणारा आणि नाट्यकाव्यात्मक आहे. त्याच्या स्वरूप आणि प्रेरणेचा हा एक धावता आढावा. —संपादक]

छत्रपती शिवाजी महाराजांनी पश्चिमेत मराठी राज्याची स्थापना केली आणि महाराजांच्या सावत्र बंधूंनी म्हणजे व्यंकोजीराजांनी दक्षिणेत तंजावरचे राज्य मिळविले. तंजावर किंवा तंजाऊर हे दक्षिण भारतातील एक इतिहासप्रसिद्ध राज्य होते. तंजावरनगर हे मद्रास पासून २१८ मैल अंतरावर कावेरी नदीच्या काठी वसलेले आहे. हे एक सांस्कृतिक केंद्र आहे. 'तंजण' नावाच्या राक्षसाला विष्णूने युद्धात ठार मारले, त्यावेळी मरताना तंजणाने विष्णूजवळ प्रार्थना केली की, मी राहत असलेला भूभाग माझ्या नावाने प्रसिद्ध व पवित्र क्षेत्र म्हणून प्रसिद्ध व्हावा. विष्णूने त्याची प्रार्थना मान्य केली तेव्हापासून या क्षेत्राला तंजपूर (संस्कृत शब्दाचे रुपांतर होऊन) 'तंजाऊर' हे तमिळ नाव प्राप्त झाले; अशी पौराणिक आख्यायिका आहे. इ.स. च्या ९ व्या शतकात विजयालय चोळ याने मुत्तरैयर वंशाच्या राजाकडून तंजावर राज्य जिंकून घेतले. चोळ घराण्याने इथे सुमारे चारशे वर्षे राज्य केले. चोळ राजे सांस्कृतिक वातावरण जोपासणारे होते. या राजवटीत संस्कृत व तामिळभाषांतून उत्तम वाङ्मयनिर्मिती झाली. कालांतराने चोळांचे राज्य विजयनगरच्या राज्यात समाविष्ट झाले. अच्युतराय या विजयनगरच्या राजाने चेवाप्पा नाईक या आपल्या साडूस तंजावरचे राज्य दिले, तेव्हापासून तंजावरला नाईक घराण्याचे राज्य सुरू झाले. नाईक राजवटीतही सांस्कृतिक वातावरण जपले गेले. या नायक घराण्यात रघुनाथनायक हा विद्वान, रसिक, साहित्याला प्रोत्साहन देणारा, स्वतःही संस्कृत, तेलगु भाषेत ग्रंथरचना करणारा राजा होऊन गेला. रघुनाथनायकानंतर प्रथम त्याचा मुलगा अच्युतनायक, नंतर दुसरा मुलगा विजयराघव हे राज्यावर बसले. विजयराघवनेही स्वतः ग्रंथरचना केली व ग्रंथनिर्मितीला उत्तेजनही दिले. 'साहित्याचार्य' या पदवीने हा विभूषित झाला होता. रघुनाथनायक आणि विजयराघवनायक यांची कारकीर्द अनुक्रमे संस्कृत आणि तेलुगु भाषेत वाङ्मय निर्मितीच्यादृष्टीने भाग्यशाली ठरली.

इ.स. १६७३ मध्ये चोक्यनायक याच्याशी झालेल्या लढाईत विजयराघवचा पराभव झाला. तंजावर राज्याची व्यवस्था पाहण्यास मदुरेच्या चोक्य नायकाने अलगिरी या व्यक्तीची नेमणूक केली. त्याने आपल्या स्वतंत्र राज्याची घोषणा केली. याचवेळी विजयराघवचा मुलगा चेंगमलदास याला तंजावरच्या गादीवर बसविण्यासाठी रायसम वेंकन्ना या तेलंगी ब्राह्मणाने प्रयत्न सुरू केले. त्यासाठी त्याने आदिलशहाची मदत मागितली. यावेळी शहाजी भोसले यांचा मुलगा म्हणजेच शिवाजीचा सावत्र भाऊ व्यंकोजी हा बंगळूरच्या जहागिरीवर होता. आदिलशहाने व्यंकोजीस तंजावरकडे बंदोबस्तासाठी पाठविले. व्यंकोजींने अलगिरीस पदच्युत केले; आणि तंजावरचे राज्य मराठ्यांचे राज्य झाले.

तंजावरचे भोसले राजे - वाङ्मयीन कर्तृत्व

व्यंकोटीने तंजावरचे राज्य मिळविले आणि आदिलशहाने त्याला तंजावरची जहागिरी वंशपरंपरेने दिल्याची सनद पाठविली. व्यंकोजीला शहाजी, सरफोजी व तुकोजी असे तीन पुत्र झाले. व्यंकोजीनंतर या तिघांनी तंजावर प्रांतावर एकामागून एक असे राज्य केले.

व्यंकोजीनंतर प्रथम राज्यावर आला ते शहाजी उर्फ शाहराज. शाहराज हे अत्यंत कर्तबगार, वाङ्मयाची जाण असणारे रसिक आणि विद्वान होते. त्यांना संस्कृत, कानडी. तेलुगी, तामिळ इत्यादी भाषा चांगल्या अवगत होत्या. या शाहराजांनी अनेक संस्कृत काव्ये लिहिली असली, तरी त्यांचा ओढा मराठी नाटकांकडेच अधिक होता. त्यांच्या नावावर हरिहरविलास, पंचभाषाविवास, सुभद्रा परिणय, लक्ष्मीनारायण कल्याण, गोवर्धनोद्धारण, लक्ष्मीभूदेवीसंवाद, गंगा कावेरी संवाद, मृत्युंजय चिरंजीव इत्यादी उपलब्ध नाटके आहेत. याखेरीज गणेश जयंती, सरस्वती, पार्वती, सीता कल्याण, पट्टाभिषेक, शचि पुरंदर.

वल्लीकल्याण, कृष्णलीला, जलक्रीडा, सतीपतिकल्याण, शांताकल्याण, शंकरनारायण, सर्वांग सुंदरी, रतिकल्याण, चंद्रशेखरविलास ही नाटके त्यांच्या नावावर दिसतात. इतिहासाचार्य राजवाडे यांनी वरील नाटकांपैकी 'श्री लक्ष्मीनारायण कल्याण' या नाटकाचा शोध प्रथम लावला. त्यानी या लेखनाचा उल्लेख 'नाटकाची पोथी' असा केला आहे. ''ह्या नाटकास नाटक ही संज्ञा द्यावी किंवा नाही, असा संशय उत्पन्न होण्यासारखा आहे. परंतु ज्या अर्थी दोन पात्रांची संभाषणे, गद्य व पद्य, नाटकाच्या घटकावयांपैकी आहे- त्या अर्थी नाटक ही संज्ञा ह्या वस्तूस देणे जरूर आहे...'' असा अभिप्राय त्यांनी आपल्या टिपणात दिला आहे. याशिवाय या नाटकातील सूत्रधाराचे वैशिष्ट्यही त्यांनी सांगितले आहे. ते म्हणतात, ''ह्यात इतर पात्रांपेक्षा सूत्रधाराचे काम फार आहे. स्थलोस्थली संविधान जुळविण्याकरिता सूत्रधार कथाभाग सांगत आहे. हे काम युरोपिअन नाटकांत कंसात सूचनारूपाने गद्यांत लिहून भागवितात. युरोपिअन नाटकांतील ही सूचना नाटकाचा कर्ताच करीत असतो. येथे सूत्रधार करीत आहे. कारण युरोपिअन नाटकात सूत्रधार नसतो.'' एकंदरीत इतिहासाचार्यानी 'लक्ष्मीनारायणकल्याण'ला नाटक म्हणून मान्यता दिलेली आहे.

शहाजी उर्फ शाहराजनची जी नाटके लिहिली, त्यातून त्यांनी नाट्यकाव्य साकारले आहे. या नाट्यकाव्यातूनच कथेचा विकास घडवून प्रेक्षकांच्यासमोर कथा सादर केली जाई. या कथेतून स्वभावचित्रण, रसनिर्मिती, अलंकार इत्यादींचे दर्शन घडते. शहाजींचा कल्पनाविलासही आपल्याला आनंद देतो. या नाटकांना विनोदाचेही वावडे नाही.

शाहराजनंतर त्याचा धाकटा भाऊ शरफोजी गादीवर आला. शरफोजीचा मुख्यमंत्री म्हणून काम पाहणाऱ्या आनंदरायाने 'विद्यापरिणय' हे मराठी नाटक लिहिले. शरफोजीच्या त्याचा धाकटा भाऊ तुकोजी उर्फ तुळजाराजा हा राज्यावर आला. इ.स. १७३६ साली तुकोजी मृत्यु पावला. त्यावेळी राज्याची सूत्रे त्याच्या मुलाकडे म्हणजे एकोजी (दुसरा) उर्फ व्यंकोजीकडे आली. या एकोजीराजांनु 'कमलाम्बात्यागेश परिणय' व 'शाकुंतल' या मराठी नाटकांची रचना केली. एकोजी (दुसरा) च्या मृत्युनंतर राज्यात थोडीशी धामधूम झाली. इ.स. १७३७ ते इ.स. १७३९ हा धामधुमीचा काळ होता. या धामधुमीतून तुकोजीच्या उभा नावाच्या राणीचा पुत्र राजा प्रतापसिंह हा राजा झाला. याच राजाच्या राजवटीत मराठी भाषेला वाङ्मयीन प्रतिष्ठा लाभली. यांच्या राजवटीत काव्य, धर्मशास्त्र, संगीत, नृत्य, नाट्य, चरित्रे आख्याने अशा स्वरूपाचे विपुल मराठी ग्रंथ निर्माण झाले. स्वतः राजा प्रताप यांनी 'प्रबोध चंद्रोदय' या संस्कृत नाटकाचे रुपांतर मराठीत केले. याशिवाय राजा प्रतापसिंहानी मराठीत सतरा नाटके लिहिली. त्यापैकी आज बारा नाटके उपलब्ध आहेत. राजा प्रतापसिंहांनी लिहिलेली सतरा नाटके पुढीलप्रमाणे होत. १) पार्वती कल्याण २) प्रभावती परिणय, ३) मित्रविंदा परिणम, ४) सीतास्वयंवर, ५) पारिजातापहरण, ६) ध्रुवाख्यान, ७) अनसूया उपाख्यान, ८) स्यमंतकोपाख्यान, ९) रुक्मानंद नाटक, १०) श्रीकोरवंझी, ११) लक्ष्मणापरिणय, १२) श्रीकोरवंझी, १३) ययातिचरित्र, १४) उषाकल्याण, १५) रुक्मिणी परिणय, १६) मायावती परिणय, १७) कृष्णजनन.

राजा प्रतापसिंहांची नाटके यक्षगानात्मक आहेत. यक्षगान नाटके ही प्रामुख्याने पौराणिक विषयावर असतात. अशा नाटकात नृत्य महत्त्वाचे असते. हे नृत्य करताना अभिनयही महत्त्वाचा असतो. ही नाटके भरताच्या नाट्यशास्त्राशी सुसंगती साधणारी आहेत. अर्थातच राजा प्रतापसिंहांच्या नाटकावर भरताच्या नाट्यशास्त्राचा प्रभाव दिसून येतो. आपल्या नाटकांतून त्यांनी अद्वैत तत्त्वज्ञान भक्तिरसातून मांडले आहे. तत्त्वज्ञान मांडल्यामुळे नाटकांचे स्वरुप गंभीर बनले आहे. राजा प्रतापसिंहाच्या काळापर्यंत मराठी नाट्य कलेला तेलुगु, हिंदी, कानडी, संस्कृत इत्यादी भाषांचे साहाय्य होते. राजा प्रतापसिंहाच्या काळात तिचे वेगळेपण व सौंदर्य स्पष्ट होऊ लागले. तंजावरी मराठी नाटक संस्कृत नाटकासारखे दर्जेदार होऊ लागले.

राजा प्रताप हे इ.स. १७६३ मध्ये दिवंगत झाले. त्यानंतर त्याचा मुलगा राजा तुळजा (दुसरा) हा गादीवर आला. त्याने तेलुगु व मराठी नाटकांना प्रोत्साहन दिले. परंतु हा निपुत्रिक होता. राजा तुळजा (दुसरा) यांनी भोसले कुळातील विठोजीच्या वंशातील अल्पवयीन मुलगा शरफराज याला दत्तक घेतले. इ.स. १७९६ मध्ये शरफराज राज्यावर आला. शरफराजनी तंजावरचे

सांस्कृतिक वातावरण जपले. त्यांनी स्वतः नाटके लिहिली व इतरांनाही नाटके लिहिण्यास प्रोत्साहित केले. राजा शरफोजीनी लिहिलेली नाटके पुढीलप्रमाणे होत. १) शिवरात्री उपाख्यान, २) मीनाक्षी परिणय, ३) गणेश विजय, ४) राधाकृष्ण विलास, ५) मोहिनी महेश परिणय, ६) सुभद्रा परिणय, ७) गंगा विश्वेश्वर परिणय, ८) देवेंद्र कोरवंझी, ९) गणेशलीला वर्णन. यापैकी 'सुभद्रापरिणय' हे तेलुगी भाषेतील नाटक आहे, तर 'गणेश विजय' हे नाटक रंगनाथ नावाच्या कवीने लिहून राजाला अर्पण केले आहे, हे लक्षांत घेता शरफराजांच्या नावावर सात नाटकांचे कर्तृत्व दिसते.

शरफोर्जीच्या नाटकांचा विशेष म्हणजे ही नाटके एक किंवा त्याहून अधिक अंकांची आहेत. मराठी रंगभूमीचे बदलते स्वरूप दाखविणारी लक्षणे या नाटकांतून दिसतात. रंगमंचावर नटीचा प्रवेश, गद्यावर पद्यापेक्षा अधिक भर, निसर्गवर्णन, उच्च दर्जाचा विनोद, कल्पनारम्यता इत्यादी वैशिष्ट्ये या नाटकांतून प्रत्ययास येतात. त्यामुळे नाटकाच्या आधुनिक, प्रगत रुपाकडे चाललेली वाटचाल, असे शरफोर्जीच्या नाटकांबद्दल म्हणता येईल. शरफोर्जीचे एक अविस्मरणीय कर्तृत्व म्हणजे त्यांनी केलेली 'सरस्वतीमहाल'ची योजना होय. या महालात त्यांनी दुर्मिळ ग्रंथरचना एकत्रित केली. सांस्कृतिक परंपरेचा वारसा अभिवृद्ध करून त्याचे जतनही त्यांनी केले. परंतु दुर्दैवाची गोष्ट म्हणजे सरस्वतीच्या या पूजकाला राजकीय कटकट मात्र मानवली नाही. इंग्रजांचे डावपेच आणि राज्यातील तंटेबखेडे यांना कंटाळून इ.स. १७९८ मध्ये या राजाने राज्यत्याग केला आणि तंजावरच्या मराठी राज्याचा अस्त झाला. राज्य त्यागानंतरही आयुष्याच्या अखेरपर्यंत तंजावरच्या सांस्कृतिक वातावरणाच्या प्रगतीसाठी आपला देह आणि बुद्धी चंदनाप्रमाणे झिजवली.

तंजावरच्या भोसले राजांच्या वाङ्मयीन सेवेबद्दल बोलावयाचे झाले, तर डॉ. संजीवनी देशमुख आणि प्रा. माया सरदेसाई यांचे म्हणणे पूर्णसत्य आहे. त्या म्हणतात, ''तंजावरच्या भोसले राजांच्या कारकीर्दीत राजा प्रतापसिंहाची कारकीर्द सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखी आहे. विशेषतः नाट्यशारदेचे मयूर सिंहासन मराठी रंगभूमीवर सुप्रतिष्ठित करण्याचा मान राजा प्रतापालाच दिला पाहिजे. हे मयूर सिंहासन शाहराजांनी स्थापन केले. पण कलेच्या क्षेत्रात त्याला सुप्रतिष्ठा प्राप्त करून दिली राजा प्रतापाने ! पुढे राजा शरफोर्जीनी मराठी रंगभूमीचे कलाक्षेत्र विशाल केले आणि तिचा मनोरम विलास दाखवला.''

तंजावरी नाटकांची आणि साहित्याची ही (अलिबाबाची) गुहा दाखवून इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी तिचे दार (तिळातिळासारखे कष्ट करून) आपल्याला उघडून दिले. तथापि प्रा. माया सरदेसाई आणि डॉ. सौ. संजीवनी देशमुख यांच्यासारखे सन्माननीय अपवाद वगळता या नाटकांचे आणि वाङ्मयाचा अभ्यास आणि संशोधन फारसे झालेले दिसत नाही. मराठी नाट्यवाङ्मयाचे हे वाङ्मयधन अत्यंत मोलाचे असल्याने त्याचा अधिक अभ्यास आणि संशोधन होणे गरजेचे आहे.

एकंदरीत इ.स. १६८४ ते १८५५ हा तंजावरी नाटकांचा कालखंड म्हणता येईल. तंजावर व तंजावरच्या आसपास असलेल्या तेलुगु, तामिळ आणि कानडी भाषांचा परिणाम या नाटकांच्यावर झालेला दिसून येतो. विशेषतः तेलुगु यक्षगान नाटकांनी तंजावरी भोसलेंच्या मराठी नाटकावर प्रभाव टाकलेला दिसतो. तेलुगु यक्षगान नाटके हीच तंजावरी मराठी नाटकांची गंगोत्री म्हणण्यास हरकत नाही. म्हणून तंजावरी मराठी नाटकांचा अभ्यास करताना या परिसरातील सांस्कृतिक मूल्यांचा, विशेषतः नाट्य, संगीत आणि नृत्य यांचा विचार करणे महत्त्वाचे आणि अगत्याचे वाटते.

संदर्भग्रंथ :

१) तंजावरच्या भोसले राजांची नाटके - लेखिका - डॉ. संजीवनी देशमुख - प्रा. माया सरदेसाई.

२) भारतीय संस्कृतिकोश : संपादक - पं. महादेवशास्त्री जोशी

३) मराठी साहित्यदर्शन (१५) - वि. का. राजवाडे.

❖❖❖

प्रा. (डॉ.) मुकुंद कृष्ण पुजारी
सावरकर कॉलनी, रोड नं. १,
विश्रामबाग, सांगली.

श्रीसमर्थ रामदासांचा 'आत्माराम'

डॉ. मधुसूदन बोपर्डीकर

[अद्वैत वेदान्ताच्या भरभक्कम पायावर उभा असलेला श्रीसमर्थ रामदासांचा 'आत्माराम' आणि श्रीज्ञानदेवांचा 'अनुभवामृत' मायावादाकडे सकारात्मक दृष्टीने पाहतात. समुद्र आणि तरंगाप्रमाणे आत्मा आणि माया एकच आहेत. – संपादक]

श्रीसमर्थ रामदासस्वामींचा 'आत्माराम' हा ग्रंथराज त्यांच्या अन्य ग्रंथांपेक्षा वैशिष्ट्यपूर्ण आणि त्यांच्या एकूण ग्रंथसंपदेमध्ये मुकुटमणी शोभावा असा आहे. दासबोध, मनाचे श्लोक, करुणाष्टके व अन्य स्फुट रचना महाराष्ट्रात लोकप्रिय असून त्यांचे पठण-वाचन-पारायण सर्वत्र निष्ठेने व भक्तिभावाने केले जाते. त्यामानाने आत्माराम ग्रंथ खूपच उपेक्षित राहिला आहे. श्री ज्ञानदेवांच्या अनुभवामृताची स्थिती यापेक्षा निराळी नाही. मराठी संतवाङ्मयामध्ये तत्त्वज्ञानाचे हे ग्रंथ शिराधार्थ आहेत. परंतु भारतीय तत्त्वज्ञानाला मौलिक योगदान करणारे हे ग्रंथ फक्त अभ्यासकांपर्यंतच पोहोचले आहेत. स्व. के. वि. बेलसरे यांच्यासह अनेक तपस्वी अभ्यासकांनी-संशोधकांनी या ग्रंथाचा सखोल व सर्वांगीण अभ्यास केला असून, त्यामुळेच आत्मारामाचे मोठेपण आपणापर्यंत पोहोचले आहे. आत्माराम व अनुभवामृत हे ग्रंथ काहीसे क्लिष्ट व गूढ आहेत, सामान्यांना ते वाचण्याचा अधिकार नाही; अशा गैरसमजामुळे या ग्रंथातील विचारधन अंधारात राहिले असे वाटते. परंतु श्रीसमर्थांच्या सर्व विचारसरणीला भक्कम आध्यात्मिक अधिष्ठान देणारा हा ग्रंथ सर्वदूर पोहोचला पाहिजे; असाच प्रयत्न श्रीसमर्थ-साहित्य अभ्यासकांनी करायला हवा. याच हेतूने हा लेखप्रपंच !

ग्रंथ-परिचय

'आत्माराम' ग्रंथात १८३ ओव्या असून त्याचे ५ समास आहे. दासबोधाची ओव्या-संख्या ७५१ आहे. तत्त्वज्ञान हाच मुख्य विषय असलेल्या ग्रंथात अद्वैत-विचार, ब्रह्म, माया इ. विषय सविस्तर आले आहेत. दासबोधातही अखेरच्या भागात ब्रह्म, माया या तत्त्वांचे विवेचन आले आहे. श्रीसमर्थांच्या अन्य ग्रंथांमध्ये आचारधर्मावर जास्त भर आहे. परंतु या आचारधर्माची आध्यात्मिक पार्श्वभूमी किंवा अधिष्ठान सांगणारा हा ग्रंथराज आहे. श्रीज्ञानदेवांच्या अनुभवामृतातील चिद्विलास व आत्मवस्तूशी या ग्रंथाचे विलक्षण साम्य आहे. 'माया' तत्त्वाबद्दलचे श्रीसमर्थांचे विचार अभिनव आणि चिंतनीय आहेत. एके ठिकाणी समर्थ म्हणतात-

आत्माराम· दासबोध
माझे स्वरूप स्वतः सिद्ध ।

थोडक्यात समर्थांची 'वाङ्मयी मूर्ती' असेच या ग्रंथाचे वर्णन करता येईल. ग्रंथातील सर्व विवेचन सडेतोड, रोखठोक व प्रासादिक आहे; कारण ते 'स्वानुभूती'वर आधारलेले आहे. म्हणूनच त्याचा निर्देश 'मराठीतील उपनिषद' असे करणे योग्य होईल. या संदर्भात प. पू. ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज म्हणतात-

'आपल्या सर्व वाङ्मयामध्ये समर्थांनी अंतःकरण ओतले, पण आत्मारामामध्ये त्यांचे हृदय सापडते. बद्धानेच नव्हे तर सिद्धानेसुद्धा आत्मारामापासून परमार्थ शिकावा.' प. पू. के. बेलसरेही सांगतात-

'आत्माराम ही ब्रह्मज्ञानी पुरुषाची अपौरुषेय वाणी आहे. ग्रंथाचे केवळ वाचन, पारायण नव्हे; तर शुद्ध आत्मजिज्ञासेने सूक्ष्म अध्ययनही करायला हवे.'

अशा या नित्यपठनीय ग्रंथातील विषय समासानुसार साररूपाने इथे देत आहे.

त्याग-निरूपण

पहिल्या ४ ओव्या परमात्म्याचे वर्णन करतात.

जयास लटका आळ आला ।
जो माया गौरी पासूनी जाहला ।
जालाच नाही तया अरूपाला । रूप कैसे ॥१.१॥

या नमनाच्या श्लोकात, परमात्म्याचा नावाने उल्लेख नाही, जयास, जो, तया असा निर्देश मात्र आहे. त्या अरूपाला रूप कैसे ? असे विचारून निर्गुण, निराकार, शब्दातीत परमात्म्याला या ओवीत नमस्कारही केलेला नाही. तो केवळ असतो, (Being) त्याला उपाधि नसतात, रुपगुणहीन, सर्वातीत परमात्म्याला नमस्कार

तरी कसा करायचा ? भक्त आणि देव यात भेद असतोच कुठे ? याप्रकारे पहिल्या नमनाच्या ओवीत समर्थांनी आत्मारामाचे अतूट एकत्व मोठ्या कौशल्याने चित्रित केले आहे. त्याला शब्दातून नव्हे तर ''भाववळे'' नमस्कार करायचा असे ते पुढे म्हणतात. कारण ते 'शब्दी निःशब्द', 'जे शब्दास आकळेना' असे वर्णनातीत आहे.

पुढे ५ ते ६ ओव्यांमध्ये मायेचे, वाग्देवी, शारदा, सरस्वती, विश्वशक्ती, उमा, महामाया, महालक्ष्मी, महाकाली या स्वरूपात वर्णन आले असून आत्मवस्तू व माया एकरूप असल्याचे ते सांगतात. इथे श्रीज्ञानेश्वरांच्या देवो-देवी, प्रियू-प्राणेश्वरी, शंभू-शांभवी, भूतेश-भवानी, आणि अर्धनारीनटेश्वराची आठवण येते.

ओवी ७-१० मध्ये गुरूस्तवन केले असून इथे गुरू म्हणून रामाचा उल्लेख नाही. ओवी ११-१५ मध्ये रामाचा उल्लेख 'ऐसा सर्वात्मा श्रीराम' असा उल्लेख समर्थ रामदास करतात व त्याचे वर्णन योगियांचे निजधाम, मायेहून निराळा, 'जेथे भांबावला तर्क, पांगुळला विवेक, जयालागी योगी उदास (विरक्त) असे करतात. ओवी १६-१७ मध्ये संत सज्जनांचे वर्णन, 'ते स्लरूपाचेनि बाप । परमात्म्याहून थोर ।' असे आले आहे.

पुढील ओव्यामध्ये गुरू-शिष्य संवाद आहे. शिष्याने शंका न विचारताही समर्थ त्याला उपदेश करतात.

'दासबोधीये समासी । निर्मूळ केले मीपणासी ।...

पालट दिसेना । म्हणोनि न पुसता सांगणे ॥१.२०.

शिष्याने किती एकाग्र असले पाहिजे हे सांगताना- 'चातकपक्षी वरीचा वरी । चंचू पसरून थेंबुला धरी । १.२२ त्याप्रमाणे 'शब्दाआतील गर्भाचा । सांटावा घ्यावा ॥१.२४ असे समर्थ सांगतात.

अखेरच्या भागात तत्त्वज्ञानाचे मूलभूत प्रश्न आले आहेत- 'अरे, तू कोण ? कोणाचा ? कोठोनि आलासि कैसा ?' त्यांचा निर्देश समर्थ करतात. 'किं कारणं ? ब्रह्म? कुतः स्म जाताः ? जीवाम क्रेन क्वच संप्रतिष्ठा' या 'श्वेताश्वतरोपनिषदातील' प्रश्नमाला सहजच आठवते. समासाच्या अखेरीस शिष्याला त्याग करावयास श्रीसमर्थ सांगतात. त्याग कशाचा तर जे जे नाशवंत, अशाश्वत तितुकेच मज द्यावे असे त्यांचे म्हणणे आहे. दैनंदिन व्यवहारात काही हवे असेल तर काही तरी द्यावेच लागते. स्वस्वरूपाचे ज्ञान हवे तर अशाश्वत, भौतिक, नाशवंत ते तू मला (सद्गुरूला) दे. हे सद्गुरूला स्वतःला हवे असे नाही तर शिष्याने लौकिक गोष्टींचा त्याग करावा. म्हणजे गुरूचे बोट धरून ईश्वरापर्यंत जाता येते. इथेच 'त्याग' नावाचा समास समाप्त होतो. लोखंडाचा गंज तापवून काढता येतो; त्याप्रमाणे म्हणून तू अहंकाररुपी नाशिवंत मन त्यागावास (२.९)

माया निरूपण (२रा समास)

मूळात मायेचे स्वरूप गूढ आहे. परंतु या तत्त्वाकडे श्रीसमर्थ सकारात्मक व नकारात्मक दृष्टींनी पहातात. समुद्र व तरंगाप्रमाणे आत्मा व माया एकच आहेत. खरे तर माया हा एक चमत्कार आहे. ती जीवाला नाशवंत गोष्टीत गुंतवते, त्याला अहंकारी करते. उलट तीच माया अनासक्त, निरंहकारी जीवाला स्वस्वरूपाप्रत नेते. आत्मतत्त्व Being 'आहे' या स्वरूपाचे आहे तर माया Becoming 'होणे' (परिवर्तित) या प्रकारची आहे. माया आहे व नाही (रज्जू आहे, सर्प नाही) अशी दुहेरी आहे. टीकाकारांच्या मते माया, भवसिंधूचे तारू, प्राण्यांची उद्धारक आहे. ती योगियांची माऊली आहे. अहंकार जागृत करणारी माया मारक तर ईश्वरदर्शनासाठी मदत करणारी म्हणून तारक, धरली तर चालते, सोडली तर पळते; अशी चमत्कारिक आहे. तीच विश्वरचना करते- अनंत ब्रह्मांडाऐसी ढिसाळे । मायेने रचिली विशाळे ॥२.२) पण शरीर हे धर्मसाधनेसाठी उपयुक्त तशी माया, ब्रह्माप्रत नेण्यास साहाय्यक ठरते. श्रीशंकराचार्य (मायानिर्मित) जगन्मिथ्या मानतात तर ज्ञानेश्वरांना माया; अविद्या मान्यच नाही. टाकाऊ तून टिकाऊ असा समर्थांचा दृष्टिकोण दिसतो.

ब्रह्मनिरूपण-समास ३

समास ३ मधील ब्रह्माचे वर्णन उपनिषद व वेदान्ताप्रमाणेच निर्मळ, निघोट (घनदाट), सेवटचा सेवट (ओ. ७), जे चळे न ढळे । अग्निमध्ये न जळे । उदकी न बुडेना । (नैनं दहति पावक, नचैनं क्लेदयन्ति आपः ।...) असेच आहे. मायाचि गोवि, आणि बंधन । तोडी तेही माया । (ओ. २१), मायेनेच वारिली । पाहिजे माय ॥ काट्याने काटा काढा... (ओ. २९), असे मायेचेही वर्णन श्रीसमर्थ करतात.

साधन-निरूपण समास ४

स्वरूपप्राप्तीसाठी श्रवण, मनन, संवाद, परमार्थ ग्रंथसार इ. मार्ग या समासात श्रीसमर्थ सांगतात. गुरू-शिष्य यांच्यामधील एक गंमतीशीर संवाद या समासात (ओवी ८-१४) आला आहे.

शिष्य - सर्व काही (नाशिवंत) दिले.

गुरू - देणाऱ्याचे काय ? तोही नाशवंत !

शिष्य - देणाराही दिला. आता काहीही उरले नाही.

गुरू - 'उरले नाही' हे म्हणणेही नाशवंतच !

सारांश - सर्वस्व, स्वतःसह दिले तरी 'दिल्याचा उल्लेख' सुद्धा अहंकार निर्माण करणारा असल्याने, देऊनही न दिल्यासारखेच होते. 'अहं ब्रह्मासि । सर्व खल्विदं ब्रह्म । हे ध्यानात घेतले तर देणारा-घेणारा असा भेद उरत नाही.

शिवाय, 'मी तुझा आहे, तू माझा आहेस'

हे खरे नसून मी तूच आहेस-या प्रकारची अद्वयभक्ती, ज्ञानोत्तर भक्ति समर्थ सांगतात

प्राप्त झाले अद्वैतज्ञान
अभिन्नपणे जे विज्ञान ।
तेचि जाण आत्मनिवेदन (आत्मनि वेदन)
जेथ मी-तू-पण नाही ॥३२॥

स्वानुभव-निरूपण समास ५

याप्रकारे साधना केल्यानंतर साधकाला अद्वैताचा कसा अनुभव येतो, हे सांगणाऱ्या पुढील ओव्या आहेत-

जो मी मानवी किंकर ।
येकायेकी झालो विश्वंभर ।
संदेह तुटला थोर । यातायातीचा ॥ ओ. ३
मी करूनी अकर्ता ।
मी परेहून पर्ता ।
मजमध्ये वार्ता ।
मीपणाची नाही ॥५॥

या प्रकारे जीवाची उन्नत अवस्था म्हणजे गीतेतील आदर्श पुरुष स्थितप्रज्ञ, ज्ञानी, योगी, गुणातीत किंवा भक्त होय. श्रीज्ञानेश्वर (ज्ञानेश्वरी १८-११९३ ते १२०० ओव्या) मध्ये याच पद्धतीचे जीवन्मुक्ताचे वर्णन ५१ विशेषणांनी करतात- जसे : अज मी अजर । अक्षय मी अक्षर । अपूर्व मी अपार । आनंद मी ॥ वगैरे याप्रकारे अद्वैत वेदान्ताच्या भरभक्कम पायावर आत्मा म्हणजे राम असे रोखठोकपणे सांगणारे समर्थ 'नेटका प्रपंच हाच परमार्थ' याच शब्दात आपला व्यावहारिक परमार्थ सुस्पष्ट करतात हेच श्रीसमर्थ दर्शनाचे थोर वैशिष्ट्य आहे.

❖❖❖

डॉ. मधुसूदन बोपर्डीकर
'स्वरानंद', प्राध्यापक वसाहत, चैतन्यनगर,
अहमदनगर - ४१४००३.

अनुक्रमणिका

'कॉन्टिनेन्टल' अनिरुद्ध !

अनिल किणीकर

[मराठी भाषेच्या ग्रंथनिर्मिती क्षेत्रातील 'कॉन्टिनेन्टल' हे नाव आणि त्याची प्रतिष्ठा जिवापाड जपणारे अनिरुद्ध कुलकर्णी यांच्या कार्यनिष्ठेचा परिचय हीच त्यांना श्रद्धांजली ! – संपादक]

''तुम्ही रांगेत आहात.कृपया वाट पहा अथवा...'' टेलिफोन ऑपरेटरचे हे शब्द ऐकून मी वाट पाहतोय. काही क्षणानंतर मी हळूहळू अस्वस्थ होऊ लागलो. नकळत माझे मित्र मला आठवू लागले... राज्यशास्त्राचा प्राध्यापक राजेंद्र वोरा, इंग्लिशचे प्राध्यापक अजित सोमण आणि अरुण बेलसरे; जर्मनचा प्राध्यापक विद्यासागर महाजन आणि आता कॉन्टिनेन्टल प्रकाशनाचा अनिरूद्ध कुलकर्णी-एक मित्र, एक विचारवंत, एक प्रकाशक, एक लेखक.



हे सर्वजण गेले !

त्यांच्या निधनाचं दुःख मला झालंच, पण राजेन्द्र वोरा आणि अनिरूद्ध कुलकर्णी यांच्या निधनामुळे जबरदस्त धक्काही बसला. दोघेही हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने गेले. जायच्या अगोदर ४-५ दिवस, दोघांशीही दीड-दोन तास माझ्या गप्पा झाल्या होत्या, चर्चा झाल्या होत्या, स्वतंत्रपणे आम्ही चर्चा केलेल्या विषयाच्या संदर्भात पुन्हा पुढच्या आठवड्यात भेटायचे 'आम्ही ठरविले होते. पण पुढच्या आठवड्याच्या आतच ते गेले. नेहमीप्रमाणे 'आपण भेटू या'.असे सहज बोलून जातो तसे ते दोघे 'सहज' निघून गेले. 'एकटे' होऊन गेले. झोपेतच गेले. वेगवेगळ्या वेळी, दिवशी ते गेले, अशी बातमी फोनवरून काढली तेव्हा विश्वास बसला नाही. ऐकून आवाक् झालो. भेट राह्यली. आठवणीत राह्यल्या त्या वेळोवेळी झालेल्या भेटी, चर्चा, त्यांचे चेहरे, त्यांच्या सहवासाची ४०-४५ वर्षे.

अनिरुद्धच्या कॉन्टिनेन्टल प्रकाशनचे टिळक रोडवरील जुने दुकान ते विजयनगरमधील नवीन आलिशान ऑफिसपर्यंत चालत गेलो तर मोजून ५ ते ७ मिनिटे लागतात, पण मैत्रीची वाटचाल मात्र तितक्याच सहजपणे ४०-४५ वर्षे झाली.

अनिरुद्ध जाण्याअगोदर नेहमीप्रमाणे त्याचा मला फोन आला : ''संध्याकाळी जरा जास्त वेळ काढून ये. एका प्रकल्पाविषयी बोलायचे आहे.''

अनिरुद्ध म्हणजे उत्साहाचा झरा. सतत नवीन कल्पना त्याच्या डोक्यात यायच्या, त्याविषयी चर्चा व्हायच्या; आणि अंमल बजावणीचे वेळापत्रक ठरायचे. त्यातल्या मोजक्या कल्पना प्रत्यक्षात यायच्या. पण बऱ्याच कल्पना तशाच राहिल्या. त्यानिमित्ताने अनेक विषयांवर वेगवेगळ्या दृष्टिकोनातून बोलणे व्हायचे.

अनिरुद्ध जायच्या आधी ४-५ दिवस, मी भेटलो; तेव्हा त्याने मला आणखी एक कल्पना, एक नवा विषय सांगितला. तो म्हणाला, ''अनिल, आत्ता आनंद यादवांच्या 'संतसूर्य तुकाराम' या कादंबरीवर बराच वाद झाला, गदारोळ झाला. आत्तापर्यंत मराठी साहित्यात बऱ्याच पुस्तकांवर वाद झाले. त्यात अश्लीलता, वैयक्तिक हेवे-दावे, आत्मचरित्रे आणि त्यातील खरे-खोटेपणा वगैरे बरीच कारणे होती. तर तू अशा गाजलेल्या, खळबळजनक पुस्तकांवर एक 'पुस्तक' लिही. स्वातंत्र्यानंतरच्या काळातील अशी पुस्तके घेऊ यात.''

तर मी म्हणालो, ''विषय वेगळा आणि चांगला आहे. तू अशी वादग्रस्त पुस्तकं मला मिळवून दे. तू प्रकाशक असल्यामुळे तुला मिळू शकतील. आपण काम करूयात.''

आणि नंतर दीड-दोन तास बोलणे झाल्यावर परत निघालो, पुढच्या आठवड्यात परत भेटण्याचे ठरवून.

आता ही कल्पना, कल्पनाच राहिली. कोणालाच कल्पना नसताना (आणि खुद्द त्यालाही) !

अनुक्रमणिका

असाच एक प्रकल्प १९६६-६७ च्या सुमाराचा. नेहमीप्रमाणे ठरवून आम्ही भेटलो. तो म्हणाला, ''मराठीत सोशल सायन्सेस आणि ह्यूमॅनिटीजवर त्रैमासिक नाही. आपण ते सुरू करू. त्याचे नाव 'आनंदवन' असेल. तू त्याचा कार्यकारी संपादक आहेस. तर आपण कामाला सुरुवात करूयात.''

मला समाधान वाटले. एक तर त्याने माझ्यावर दाखवलेला विश्वास आणि दुसरे म्हणजे त्यानिमित्ताने माझे विविध विषयांवर होणारे सखोल वाचन. मी त्याला म्हणालो, ''उद्यापासूनच सुरू करू. मी आता दररोज येत जाईन. एकूण अंकाची रुपरेषा आपण ठरवूयात. विषय-लेखक नक्की करूया. अशा त्रैमासिकामुळे मराठीचे भाषा म्हणून एक वेगळे सामर्थ्य लक्षात येईल, शिवाय थोडी का होईना, मराठी समृद्ध होईल.''

तीनेक महिन्यांच्या सर्वांगीण तयारी नंतर 'आनंदवन' त्रैमासिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला. अंकाचे चांगले, मनापासून स्वागत झाले. लेखक, अभ्यासक, प्राध्यापक, विचारवंत आणि जिज्ञासू वाचक, सर्वांनी भरभरून प्रतिसाद दिला. वर्गणीदार झाले. विषय सुचवले. लेखन दिले. काहींनी लिहिण्याची इच्छा व्यक्त केली. 'आनंदवन'च्या प्रतिसादाने आमचा उत्साह वाढला. 'आनंदवन' त्रैमासिकाचे नियमितपणे आम्ही ४ वर्षात १६ अंक यशस्वीपणे प्रसिद्ध केले. त्या अंकांत अनेक नामवंत आणि नवीन लेखकांनी मनापासून, कसदार लेखन केले.

'आनंदवन'च्या निमित्ताने माझ्या वाचनाच्या कक्षा वाढल्या, अगदी तरुणवयात. हा फार मोठा-मोठा लाभ मला झाला. मी 'श्रीमंत' झालो. अनिरुद्धचा व्यासंग, प्रचंड वाचन, चौफेर लेखन याचा मला अनुभव आला. वेगवेगळ्या विषयांवरची असंख्य इंग्लिश-मराठी पुस्तके; संदर्भ ग्रंथ, कोपवाङ्मय, पिटीऑडिकल्स यांचे समृद्ध ग्रंथालय प्रकाशन ऑफिसमध्येच होते. विषयाच्या अनुषंगाने तो मला अनेक पुस्तके सांगायचा, त्याची वैशिष्ठ्ये सांगायचा; आणि मनमोकळेपणाने 'उदार हाताने' ते पुस्तक वाचायला द्यायचा, लिहायला प्रेरणा द्यायचा. त्याची एकूण दृष्टी आणि एकंदर हात नेहमी 'उदार' असायचा.

रामदास, मर्ढेकर, श्री. ना. पेंडसे, शेक्सपिअर, वर्डसवर्थ, इब्सेन, हेगेल कान्ट-हायडेवर्ग, दोस्तोवस्की, टॉलस्टॉय असे काही त्याचे आवडीचे लेखक आणि अभ्यासाचे विषय. (रामदासांच्या प्रभावानेच त्याने त्रैमासिकाचे नाव 'आनंदवन' असे ठेवले होते.) या लेखकांवर त्याने पुस्तके लिहून घेतली. हब्सेन-दस्तयेवस्की यांवर स्वतः अभ्यासपूर्ण पुस्तके लिहिली. वर्डसवर्थच्या पुस्तकाचा कच्चा आराखडा झाला होता. 'डिसेंबर आणि कविता' हा काव्यसंग्रहही प्रकाशित झाला होता.

एखाद्या लेखकामुळे अनिरुद्ध खूप भारावून जायचा. वेळोवेळी त्या लेखकावर बोलताना तो अगदी मोहरून जायचा. त्या लेखकाचे जगणे, त्याची प्रकरणे, त्याचे लेखन यावर तो अत्यंत भरभरून बोलायचा; त्या लेखकाने तो प्रभावित व्हायचा. आणि मग काही बाबतीत तो त्यांचे अनुकरणही करायचा, रोमॅन्टिक व्हायचा !

काही काळ तो शेक्सपिअरमय झाला होता, इतका की जुन्या ब्रिटिशकालीन पद्धतीने तो राहू लागला. शर्टाची बटणे मानेपर्यंत लावणे, डोक्यावर केसांचा मधोमध भाग पाडणे (काही स्त्रियांप्रमाणे !) कानापर्यंद कल्ले वाढवणे, सेंट वगैरे लावून नीट-नेटके राहणे इ. शेक्सपिअरच्या नाटकांची वैशिष्ट्ये सविस्तर सांगायचा.

काही काळ तो वर्डस्-वर्थमय झाला होता. त्या काळात तो फिकट हिरव्या रंगाच्या शर्ट घालायचा, त्यावर रंगी-बेरंगी फूल-पान एम्ब्रॉयडरी केलेले किंवा पेंट केलेले असायचे. कारण वर्डस्वर्थ निसर्गप्रेमी होता, निसर्गमय होता. हिरवा रंग हा राना-वनातील पानांचा. हिरवा रंग तर वेगवेगळे रंग म्हणजे फुलं-फळं. असे 'सिम्बॉलिक' कपडे घालून वर्डस्वर्थच्या कविता अचूक सांगून त्यावर मनोसोक्त बोलायचा.

माझ्यासारखा 'बापडा' ते सर्व भक्तिभावाने ऐकायचा. त्यातून प्रतिभावंताचे जगणे माझ्या लक्षात यायचे, काही दिवस त्यामुळे भारावून जायचे. यामुळे अनिरुद्धबद्दलचा माझा आदर वाढतच गेला.

एकदा तो असाच रामदासमय झाला होता. (म्हणूनच त्रैमासिकाचे नाव 'आनंदवन'.) दासबोधावर तो उत्तम 'प्रवचन' द्यायचा ! तो म्हणायचा, ''रामदास म्हणजे फ्रॉईड, ॲरिस्टॉटल-प्लेटो यांचा 'बाप' होता. रामदासांनी जी सायकॉलॉजी-फिलॉसॉफी, सोशेलॉजी-

पॅलिटिक्स सांगितले, त्यापेक्षा कितीतरी सोप्या मराठी भाषेत ते मांडले होते. तेच पाश्चात्यांनी इंग्लिश भाषेत सांगितले होते. थोड्या क्लिष्टपणे. रामदास म्हणजे मोठा द्रष्टा, काळापुढचा बापमाणूस. आपल्याकडे अशा प्रतिभावान व्यक्ती उपेक्षित राहतात. आपणच कमी पडतो... वगैरे.''

त्याचे बोलणे झाल्यावर मी त्याला शांतपणे म्हणालो, ''आता तू रामदासांसारखं राहणार की काय ? अंगावर फक्त लंगोटी, पायात खडावा, हातात कमंडलू-छाटी, दाढी वाढवलेली इत्यादि, इत्यादि;'' आणि मी त्याच्याकडे पहात मिशीत मिश्किल हसलो. तर तो म्हणाला, ''विचार करायला हरकत नाही. निदान रात्री घरी तरी !''

ऐहिक आणि बौद्धिक समृद्धी ही त्याच्या व्यक्तिमत्त्वाची दोन प्रमुख वैशिष्ट्ये होती. अनिरुद्धचे एकूण जगणेच समृद्ध होते. ऐहिक श्रीमंतीचा उपयोग त्याने बौद्धिक श्रीमंती वाढविण्यासाठी केला. म्हणूनच त्याच्या संग्रहात विविध विषयांवरची हजारो पुस्तके होती, संदर्भग्रंथ होते, कोश होते. मुख्य म्हणजे आपल्या व्यासंगाचा उपयोग तो पुस्तके लिहवून घेताना करायचा, समोरच्या लेखकाला त्या त्या विषयाचा आवाका सांगायचा, त्याच्या लेखनाला 'खोली' द्यायचा, पुस्तक परिपूर्ण करण्यासाठी अतोनात बौद्धिक कष्ट घ्यायचा. कंटाळा न करता, अगदी अथकपणे आणि उत्साहाने. त्याच्याकडे असलेली बौद्धिक ऊर्जा : ही स्तिमित करणारी होती.

अनंतराव कुलकर्णी यांनी सुरू केलेल्या कॉन्टिनेन्टल प्रकाशनचे आता वय होते ७० आणि त्यांच्या पुस्तकांची संख्या होती सुमारे १३५० इतकी. अनिरुद्धनेही गेली ४० वर्षे काम करून स्वतःचा असा ठसा उमटवला होता. प्रकाशकांच्या सुसंस्कृत, समृद्ध, सजग-चिकित्सिक अशा परंपरेतील अनिरुद्ध हा एक प्रमुख प्रकाशक होता. बौद्धिक व्यासंग हे त्या एकूण परंपरेचे वैशिष्ट्य होते. उदार वृत्ती, विषयाची जाण, निर्मितीतील बौद्धिक आनंद घेणारा; आणि वाचन-संस्कृती समृद्ध करणारा अनिरुद्ध आता नाही.

शेवटच्या काही वर्षांत अनिरुद्धने कुराणाचा अभ्यास सुरू केला होता. त्याचा हिंदू, ख्रिश्चॅनिटी या विचारसरणींचाही अभ्यास होता. शंकराचार्य, गीता, बायबल यासारख्या विषयांचा अभ्यास करून त्याची स्वतःची अशी मते होती. कुराणाच्या अभ्यासातील त्याने उर्दू शिकून घेतली होती, अरेबिकचा परिचय करून घेतला होता. उर्दू लिहिण्या-वाचण्याचा तो सराव करीत होता. उर्दू दैनिकाचे वाचन तो करायचा. माझ्या शेवटच्या भेटीत त्याने मला उर्दू दैनिकाचे (बहुधा 'इन्किलाब') काही अंकही दाखवले होते. ''इस्लाम हा एक जागतिक धर्म आहे. आपण प्रत्येक भारतीयाने तो समजावून घेतला पाहिजे. सर्वाधिक मुसलमान भारतात आहेत. इतर कोणत्याही इस्लामिक कंट्रीपेक्षा.'' तो म्हणाला.

मी त्यावर म्हणालो, ''२१व्या शतकातील जगाला दोन प्रमुख घटनांनी धक्के दिले आहेत, विचार करायला लावले आहे, आणि हे दोन्ही धक्के वसाहतवादाची दोन नवीन रुपे आहेत. एक धक्का म्हणजे 'ग्लोबलायजेशन' आणि दुसरा इस्लामी दहशतवाद. मुख्य म्हणजे हे दोन्ही विषय तरुण पिढीच्या अभ्यासाचे आहेत. तुझ्या-माझ्या पिढीने आता ६५व्या वर्षी विचार करण्याचे काय प्रयोजन? तरुण पिढीला तर या वास्तवातच रहायचे आहे. आधीच आपण सर्वार्थाने एकटे पडत चाललो आहोत, कुराणातील एकेश्वरवादामुळे तू आणखी-आणखी एकटा-एकटा होत जाशील ! शिवाय आता 'एकटेपणा' सहन करण्याची ताकदही कमी होत जातीय. वय वाढते तसे आपण पसारा वाढवत जातो, पण वय वाढायला लागल्यावर जगणे कमी होऊ लागते, एकटेपणाकडे वाटचाल चालू होते.

''एकटेपणा एक वेगळा पण जीवघेणा अनुभव आहे. तो अनुभव म्हणजे अरुण्यरुदन आहे...''

''पण अनिल, मला 'एकटेपणाची' ताकद वाढवायची आहे. म्हणून तर गेली काही वर्षं मी प्रकाशनाच्या ऑफिसमध्ये एकटाच राहतो आहे...'' असे म्हणून अनिरुद्ध गप्प झाला. मी उठलो.

आणि असा 'एकटा' राहणारा अनिरुद्ध ऑफिसवर 'एकटा' गेला. रात्री ८च्या सुमारास जेवणाचा डबा घेऊन ऑफिसवर 'एकटा' आला... एकटा-एकटा... एकाकी... सकाळचे साडे नऊ-दहा वाजले. सकाळी ऑफिसचे दार उघडले नाही; म्हणून युक्तीने दार उघडून आत गेल्यावर वरच्या मजल्यावर अनिरुद्ध झोपलेला

दिसला. चिरविश्रांती घेत असलेला ! नेहमीप्रमाणे रात्री तो एकटा जेवला नाही. जेवणाचा डबा तसाच बंद होता. जेवणही न करता तो एकटाच गेला.

माणसांवर आणि पुस्तकांवर मनापासून नितांत प्रेम करणारा. आजूबाजूच्या माणसांच्या आणि पुस्तकांच्या गर्दीतून अनिरुद्ध 'एकटा' गेला.

माणूस एकटा येतो, एकटा जातो, हे सत्य आहेच. तर एकटेपणापासूनचा एकटेपणापर्यंतचा आनंददायक वेदनामय प्रवास निरर्थकच म्हणायचा का ? या 'एकटेपणाचे' उत्तर न देता जणू तो म्हणत होता :

एकटा परंतु गर्दीतील मी एक,
गर्दीत चिरडले गेले माझे दुःख ।
एकटा आज मी निर्जन एकांतात
द्या परत मला हो, हवे मला ते दुःख ॥
विसरावे ऐसे जवळ असावे काही,
मुक्त हस्त द्यावे असे असावे काही ।
गाळावे अश्रू दुःख असावे खोल,
कुणी देईल का मज त्या दुःखाची भूल ॥
हे असेच लिहिणे असेच असते जगणे,
जरि नसले अश्रू असेच आहे रडणे ।
का असे तसे का नका विचारु आता
तो निघून गेला उत्तर देता देता ॥

तो एक अनिरुद्ध
२६ जुलै २००९ रोजी रात्री
एकटाच गेला...

❖❖❖

अनिल किणीकर
२, शरयू-पारिजात, वृंदावन सोसायटी,
सहकार नगर (पर्वती), पुणे ४११ ००९.
फोन : २४२३०३५७

अनुक्रमणिका

संत रोहिदास – जीवन आणि कार्य

सोनवणे मनोरमा शिवाजी

[भारतीय संतमालेतील संत रोहिदासाच्या जीवन आणि कार्याचे मौलिक विवेचन करणारा हा शोधनिबंध अभ्यासकांना आवाहन करणारा आहे. त्यांच्या गाथांच्या अभ्यासाकडे आकृष्ट करणारा आहे. त्यावर सविस्तर विवेचन अपेक्षित आहे.

–संपादक]

तत्कालीन परिस्थिती :

भारताच्या दृष्टीने चौदावे व पंधरावे शतक हे परिवर्तन व सांस्कृतिक क्रांतीच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरले आहे. सातव्या-आठव्या शतकानंतर संपूर्ण भारत देश छोट्या छोट्या संस्थानांनी व्यापला होता. ही छोटी-छोटी राज्ये दुराभिमानाने व खोट्या पराक्रमाच्या प्रदर्शनाने आपापसात संघर्ष करीत. कोणताही राजा जनहिताकडे लक्ष देत नव्हता.

अशा परिस्थितीत परकियांची आक्रमणे भारतावर येऊ लागली. ह्या आक्रमणास प्रतिबंध करण्याचे सामर्थ्य कोणत्याही राजामध्ये नव्हते. भारतीय समाज पारंपारिक सामाजिक अन्याय व आपसातील मतभेद यामुळे मेटाकुटीस आला होता. भारतभूमीवर मोगल आक्रमणे सातव्या-आठव्या शतकात सुरू झाली. दहाव्या शतकापासून ही आक्रमणे जोरात होऊ लागली. सन १२०६ ते १२३६ पर्यंत गुलाम, खिलजी, तुघलक, सय्यद तसेच लोदी वंशाने उत्तरभारत काबीज केला.

सिकंदर लोदीने मंदिरे तोडली. मंदिरातील मूर्ती समुद्रात फेकल्या. एवढेच नव्हे तर भारतीय रहिवाशांना गंगा व यमुना नदीत स्नान करण्यासही मनाई केली होती. तैमूरलंगाने सन १३७८ मध्ये भारतावर आंक्रमण करून भारतीय रहिवाशांना जबरदस्त जुलूम केला आणि दिल्लीच्या आसपास हजारो भारतीयांना ठार केले. याशिवाय भारतातून परत जातेवेळी तैमूरच्या प्रत्येक शिपायाने शंभर शंभर बायका, पुरुष व मुलांना गुलाम बनवून आपल्याबरोबर नेले. शूद्र किंवा अस्पृश्य यांची परिस्थिती तर फारच कठीण झाली होती. परकियांच्या आक्रमणाबरोबरही स्वकीयांच्या जुलुमाशी सामना करावा लागत असे. अशाप्रकारे अस्पृश्यांना दुहेरी यातना सहन कराव्या लागत होत्या.

पुनर्व्यवस्थापनेची आवश्यकता :

भारतीय हिंदू जनतेची परिस्थिती निराशाजनक व चिंताजनक होती. तेव्हा विचारवंत सुव्यवस्थित परिवर्तनाचा मार्ग शोधण्यात पुढाकार घेऊ लागला. अशावेळी भारतात अनेक संत महाराजांनी जन्म घेऊन भक्तिरसगंगा सुरू केली आणि संतप्त हिंदू समाजाच्या दुःख संतापास शांत केले. अशावेळी प्रभावशाली समाजसुधारक व रोहिदासांचे गुरू स्वामी रामानंद यांचा जन्म प्रयागमध्ये गौड ब्राह्मण परिवारात संवत १३५६ (सन १२९९) मध्ये माघ कृष्ण सप्तमीस झाला. स्वामी राघवानंद हे रामानंदांचे दीक्षा गुरू होते. राघवानंद रामानुज परंपरेतील चौथे आचार्य होते. रामानंदास रामानुज परंपरेतील पाचवे गुरू समजले जाते. रामानंद स्वभावाने सौम्य, दयासागर, योगी, विद्वान आणि परोपकारी साधू होते. उत्तर भारतात रामानंदाने आध्यात्म रामायणास आपल्या संप्रदायाचा ग्रंथ मानून रामभक्तीचा प्रसार केला. ह्या रामभक्तीमुळेच रामानंदांनी समाजाच्या सगळ्या जाती आपल्याशा केल्या. रामानंद त्यावेळी एक मोठे क्रांतिकारक, समाजसुधारक, मार्गदर्शक, आध्यात्मिक नेते होते. त्यांनी युग परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी भारतभरचे विस्तृत भ्रमण केले होते.

असे सांगितले जाते की, रामानंद संबंध भारतवर्षाची यात्रा करून आपल्या मठामध्ये परत आले, तेव्हा त्यांच्या मठवासी शिष्यांनी आपल्याबरोबर पंक्तीमध्ये बसावयास नाराजी व्यक्त केली होती की, रामानंदाने भारत भ्रमणामध्ये खाण्यापिण्याच्या नियमांचे पालन केले नसावे. त्यांचे गुरू राघवानंदानासुद्धा ही शंका साधार असावी असे वाटले होते. हा अपमान सहन करू न शकल्यामुळे रामानंदांनी एका स्वतंत्र संप्रदायाची स्थापना केली.

''जाति पाँति पूछे नहि कोई,
हरि को भजै सो हरि का होईल ।''

उत्तर भारतात सर्व प्रथम रामानंद यांनी जातिबंधने ढिली केली आणि सर्व जातीतील पुरुषांना एवढेच नव्हे

तर स्त्रियांनाही शिष्यत्व दिले. स्वामी रामानंदांनी जातिबंधने शिथिल केल्यामुळे हीन जातीतील व्यक्तींनी यांच्या भक्तीसंप्रदायाची दीक्षा घेतली. त्यांच्यापैकी काही शिष्य-संत कबीर कोष्टी होते. रविदास उर्फ रोहिदास हे चांभार जातीचे होते. संत सेना न्हावी जातीचे होते. धन्ना जाट होते. पीपा क्षत्रिय राजपूत होते. ह्या दृष्टिकोनाने प्रेरित होऊन संत कबीरांनी म्हटले आहे की,

''जाति न पूछो संत की, बुझि लेवु तुम ज्ञान ।
मोल करो तलवार का, पडी रहन दो म्यान ।''

स्वामी रामानंदांचा भक्तिविषयक दृष्टिकोन एवढा व्यापक होता की, त्यांच्यामुळे निर्गुण आणि सगुण या दोन्ही पंथांचे संमेलन होऊ शकत होते. ह्यामुळेच त्यांच्या निर्गुण परंपरेत कबीर आणि सगुण परंपरेत तुळशीदासासारखे महान कवी आणि संतांचा अंतर्भाव झाला. संत रोहिदास मध्यम मार्गाचे अनुसरण करणारे होते. स्वामी रामानंदांनी 'भारत दिग्विजय'मध्ये लिहिले आहे की, आपला मृत्यू जवळ आल्याचे लक्षात घेऊन धन्ना, कबीर, रोहिदास आणि सेना यांनी काशीत राहून, सुरसूरानंदाने पंजाब, भवानंदाने दक्षिणेत, नरहर्यानंदाने उत्कलमध्ये, गालवानंदने काश्मिरात, पीपा आणि योगनंदाने गुर्जर (गुजरात) देशात राहून समाजसेवा करण्याचा, धर्म आणि निर्गुण भक्तीचा प्रभाव करण्याचा, आदेश दिला होता. रामानंदाचे हातून गतकाळातील जुनाट धर्मकल्पना नाहीशा करण्याच्या दृष्टीने विशेष कार्य झाले नाही. परंतु त्यांचे शिष्य संत रोहिदास यांनी याबाबतीत अलौकिक कार्य केले.

संत रोहिदासांचा वंश :

संत रोहिदासांचा जन्म 'रविदास दर्शन'[१], 'संत गुरू-रविदास'[२] व 'श्री संत रोहिदास'[३] मध्ये चंद्रवंशी (चैवर) चांभार जातीत झाल्याचा उल्लेख आहे. तर 'रविदास (रैदास) रामायण'[४] मध्ये संत रोहिदासांचा जन्म 'यादव' वंशात झाल्याचा उल्लेख आहे. परंतु संत रोहिदासांचा जन्म सूर्यवंशाच्या द्विज कुळात झाल्याची कथा 'श्री चैवर पुराण तथा भक्त चेता'[५] मध्ये आहे. या महावंशाला लोक 'चांभार' नावाने ओळखतात. वास्तविक चांभार हा सूर्यकुळाचा चँवर अर्थात चर्मवंशच आहे. त्याचे वर्णन महाभारत अनुशासन पर्वात खालीलप्रमाणे आहे-

''मेकला द्राविडा लाटा, पौंड्राः कोनव शिरास्तस्था ।
सौंडिका दरदा दर्वा चँवरा शर्वर बर्बराः ॥
किराताय वनस्वैव नाश्ताः क्षत्रिय जायतः ।
व्रषलत्व मनु प्राप्तं ब्रह्मणाम दर्शनात ।''

भावार्थ - मेकल, द्रविड, लाट, पौंड्रक, कोनव, शिर, दर्व, चँवर, शर्वर, बर्र, किरात आणि यवन ह्या सर्व क्षत्रिय जाती ब्राह्मणास विसरल्यामुळे पतित झाल्या आहेत.

उत्तरप्रदेश राज्यातील काशी (वाराणशी) जवळ मंडूर अथवा मांडूर नावाचे गाव आहे. ते मुगलसराय पासून दीड-दोन मैल अंतरावर ग्रँड ट्रक रोडवर आहे. त्याला ''मंडु आडिह' म्हणतात. ह्या गावाजवळच ''लहरतारा'' नावाचा तलाव आहे. ह्या तलावाच्या आसपास आजसुद्धा चर्मकार समाजाची मोठी वस्ती आहे. येथे राऊ उर्फ रघु अथवा रघुराम नावाचा एक प्रतिष्ठित चांभार राहात होता. रघुचची आर्थिक परिस्थिती चांगली असल्यामुळे समाजात व सगेसोयऱ्यात त्याला चांगला मान असे. रघुरामच्या पत्नीचे नाव कर्मादेवी होते. ती पतिव्रता व साध्वी स्त्री होती. आर्थिक परिस्थिती चांगली. प्रतिष्ठा मोठी असूनही पोटी मूलबाळ नसल्यामुळे दोघे पती-पत्नी दुःखी होते.

साधूचा राऊ-कर्मास आशीर्वाद :

एके दिवशी रघुरामाला काही कामानिमित्त दूर गावी जावे लागले. परत येताना त्यास मृगबन ऋषिपतनहून यावे लागले. हे मृगवन प्राचीन तपोभूमी आहे. तेथे बुद्धविहाराची खिंडारे होती. मनुष्यवस्ती नव्हती. तरी त्या वनात रघुरामाला एक ध्यानयोगी महात्मा दिसला. रघुरामने त्या साधूचे दर्शन घेतले. तेव्हा साधूने खीर भोजनाची इच्छा व्यक्त केली. तेव्हा रघुरामाने उद्याच खिरीचे भोजन आणून देण्याचे साधूस आश्वासन दिले.

रघुराम घरी आला व पत्नीस सर्व हकिकत सांगितली. ती ऐकून रघुराणीस खूप आनंद झाला. दुसऱ्या दिवशी रघुराणीने पहाटे उठून मोठ्या प्रेमाने खीर बनवली आणि ताटात वाढून ती पतीबरोबर तपोवनात गेली. मोठ्या श्रद्धेने महात्म्यास नमस्कार करून खिरीचे ताट त्यांच्यासमोर ठेवले. खिरीचे भोजन केल्यावर महात्मा फार प्रसन्न झाले. त्यांचा निरोप घेताना रघु व रघुराणीने दीनवाणा चेहरा करून प्रार्थना केली की, ''महाराज, आम्हांस मूल बाळ नाही.'' तेव्हा त्या महात्मा साधूने हात वर करून आशीर्वाद दिला की, ''तुमच्या घरी असा

पुत्र जन्म घेईल की, त्याच्यामुळे तुमचे नाव अमर होईल."

रोहिदासांचा जन्म :

साधूचा आशीर्वाद मिळताच रघु-रघुराणी मोठ्या आनंदाने घरी आले. त्याच रात्री रघुराणीस गर्भ राहिला. दहा महिने होताच रघुराणी संवत १४३३ माघ पौर्णिमेस रविवारी सकाळी बनारस काशीजवळ मांडूर येथे प्रसूत झाली. असे रोहिदास रामायणात लिहिले आहे. सूर्याप्रमाणे तेजस्वी बालक झाले म्हणून बालकाचे नाव 'रविदास' ठेवले. त्या रविदासाला महाराष्ट्र 'रोहिदास' म्हणून ओळखतो. ही बातमी बनारस मांडूरमध्ये आसपास कळताच सर्वांना आनंद झाला. अनेकजण आनंदाने थाळ्या, ढोल वाजवू लागले. सर्वजण घरी येऊन मुलाला पाहून शुभेच्छा देऊ लागले. साधुंना बोलावून रघुरामने त्यांची सेवा, पूजा केली. त्यांना व भिक्षूंना दानधर्म देऊन त्यांना प्रसन्न केले. सुहासिनी गीत गाऊ लागल्या. अशाप्रकारे सर्व वातावरण आनंदाने भारले गेले होते.

स्वामी रामानंदांचा शुभाशीर्वाद :

मुलाची आई रघुराणी उर्फ कर्मादेवी धार्मिक आणि रामभक्त होती. ती नेहमी गंगा स्नान करून देवपूजा करीत असे. पंचगंगा घाटावरील स्वामी रामानंदांच्या सत्संगमध्येही जात होती. स्वामीजींच्या कृपेमुळे आपणांस पुत्रप्राप्ती झाल्याचे ती समजत होती. परंतु पुत्रजन्माच्या आनंदामध्ये एक विघ्न आले. बाळ जन्मल्यापासून आईचे स्तनपान करीनासे झाले. त्यामुळे कुटुंबातील सर्वजण चिंताग्रस्त झाले. पुष्कळ उपचार करूनही उपयोग झाला नाही. तसेच संत महात्म्यांच्या मठावर जाऊन नवजात बालकाला आशीर्वाद मागण्यासाठी पुष्कळ धावपळ केली. शेवटी रघु पंचगंगा घाटावरील स्वामी रामानंदांच्या गुंफेवर पोहोचला. व्याकुळ झालेल्या रघुस पाहून स्वामी विचार करू लागले. त्यांना अंतर्ज्ञान झाले की, रघुच्या घरी बालकाचा जन्म चर्मकार समाजाच्या उद्धारासाठी झाला आहे. तेव्हा त्याचे प्राण वाचवणे आवश्यक आहे म्हणून स्वामीजी त्वरित रघुच्या घरी पोहोचले. त्यांनी बाळाच्या डोक्यावर हात ठेवला आणि भगवान रामाचे चरणामृत गुटीत मिसळून प्यायला दिले. ताबडतोब बालकाच्या चेहऱ्यावर फरक जाणवला. तो हसू लागला. त्याने आईचे स्तनपान करण्यास सुरूवात गेली. सर्व परिवारात स्वामी रामानंदांचा जयजयकार झाला. पूर्व जन्मात रोहिदास ब्राह्मण होते परंतु मांस खात होते. ह्या अपराधामुळे त्यांचा चर्मकार कुळात जन्म झाला व पूर्वजन्माच्या स्मृतीमुळे बाल रोहिदास स्तनपान करीत नव्हता, असे भक्त रत्नावलीमध्ये लिहिले आहे.

बालपण :

रोहिदासाचे आईवडील तसेच परिवारातील अन्य लोकसुद्धा सात्त्विक वृत्तीचे तसेच भागवतपरायण होते. अशा परिवारात तसेच वातावरणात पालनपोषण होण्यामुळे बालक रोहिदासाचे मन भगवतभक्तीकडे झुकणे स्वाभाविक होते. तसेच रोहिदासास पूर्व जन्माच्या पुण्याईमुळे प्रभूभक्ती जन्मतः प्राप्त होती. रोहिदासाने आपल्या वाणीमध्ये अनेकवेळा भक्तीला 'पुण्य कर्मांचे फळ' म्हटले आहे. अशाप्रकारे बाल रोहिदासाला जन्माबरोबर प्रभूभक्तीची प्रेरणा मिळाली होती.

स्वामी रामानंदाचा उपदेश :

"जो मानव (स्त्री-पुरुष) रामास शरण जात असे, तो दयाळू राम भक्ताचे कुळ, वंश, गरीब-श्रीमंत यांचा विचार न करता त्यांना आपलासा करतो. रामभक्तीमुळे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, चांडाळ तसेच पशू-पक्षी इत्यादी रामरूप होऊन पवित्र तीर्थांनासुद्धा पवित्र करणारे बनत. भक्ती करणे हा कुण्या एका जातीचा मक्ता नाही. भक्ती करण्याचा सर्व प्राणीमात्रांना अधिकार आहे." अशा प्रकारच्या स्वामीजींच्या प्रवचनाचा, पंचगंगा घाटावर बसलेले असंख्य स्त्री-पुरुष लाभ घेत, व आत्मसंतुष्ट होऊन जात. भक्तांच्या गर्दीत बसलेल्या रोहिदासांच्या डोळ्यांतून अश्रूधारा वाहात. रोहिदास 'रामादास' बनला. दहा बारा वर्षांचे वय असताना रोहिदास बहुश्रुत विद्वान बनला. रोहिदास विशेषतः साधुसंतांच्या संगतीमध्ये रहात. कुठेही कीर्तनाचा आवाज ऐकू आला की, ते तिथे जाऊन कीर्तन ऐकत बसत.

रामभक्त रोहिदास :

ज्या मानवाने 'राजा-राम'ची सेवा केली नाही, त्याचा मनुष्यजन्म व्यर्थ आहे. अशाप्रकारे काशीनगरीत होणाऱ्या कथा कीर्तनात भाग घेऊन रोहिदास उशीरा घरी पोहचत. तेव्हा त्यांना ऐकून घ्यावे लागत असे. परंतु वडिलांच्या ह्या रागवण्याचा बालक रोहिदासावर काही

परिणाम होत नसे. फक्त त्याच्या मनात एक गोष्ट खटकत असे की, हिंदू समाजात एवढी जातपात आणि अस्पृश्यता कशी आहे? ईश्वर एक आहे. राम, रहिम, अल्ला, ईश्वर इत्यादी त्या परमेश्वराची नावे आहेत. कोणी ब्राह्मण नाही, ना शूद्र, ना हिंदू, ना मुसलमान. ह्या सगळ्या स्वार्थी माणसांच्या कल्पना आहेत. जो हरिभक्त आहे तोच खरा मानव. स्वामी रामानंदासारखा खरा गुरू मिळाल्यामुळे संत रोहिदासांना आनंद झाला. चर्मकार जातीत जन्म घेतल्यामुळे रोहिदासाच्या मनात निर्माण झालेली सामाजिक घृणा; तसेच हीन भावना पेटलेल्या कापराप्रमाणे उडून गेली. नाहीशी झाली. चित्तामध्ये स्थिरता आली आणि ते पक्के रामभक्त बनले.

भक्तीवेडा रोहिदास :

मुलाचे भक्तीचे वेड वाढत चाललेले पाहून रघूने रोहिदासास वडिलोपार्जित धंद्यात घातले. रोहिदासही दुकानावर बसू लागले. काही दिवसातच रोहिदास चर्मोद्योग शिकले. चामड्यापासून सर्व वस्तू बनविणारे एक चांगले कारागीर बनले. रोहिदास मजबूत व सुंदर जोडे बनवू लागले. कधी कोणा साधुस अनवाणी चालताना पाहिले की, रोहिदास दुकानातील जोडा त्यांच्या पायात फुकट घालीत. रोहिदास रात्रंदिवस भजन, पूजन तसेच साधुसंतांची सेवा करण्यात घालवू लागले. तेव्हा रघूला आपल्या मुलाची अशी उदार प्रवृत्ती व भक्तीवेडा स्वभाव पाहून त्यांचे लग्न करणेच योग्य असे वाटू लागले.

रोहिदासांचा विवाह :

रोहिदासांच्या वडिलांनी त्यांचा विवाह बारा तेराव्या वर्षी लावून दिला. परंतु विवाहबंधनाचा रोहिदासांवर काहीच परिणाम झाला नाही. रोहिदासांच्या पत्नीचे नाव लोना होते. वैवाहिक बंधनात राहूनही रोहिदासांची प्रवृत्ती भक्तीकडे उत्तरोत्तर वाढतच होती.

वेगळा संसार :

रोहिदासांच्या भक्तीवेडामुळे धंदा व संसाराचे नुकसान होऊ लागले. रघूने वडिलोपार्जित संपत्तीचा योग्य हिस्सा दिल्याशिवाय रोहिदासास वेगळे काढले. घराच्या पाठीमागील मोकळ्या जागेत रोहिदास झोपडी बांधून आपल्या पत्नीबरोबर राहू लागला. गुरू रामानंदाच्या संपर्कामुळे, दररोज त्यांच्या सत्संगामध्ये सामील होण्यामुळे, रोहिदासांचे ज्ञान भांडार एवढे वाढले की, ते प्रत्येक विषयावर प्रवचन देऊ लागले. रोहिदास आपल्या प्रवचनात वेद, उपनिषदे आणि दर्शनशास्त्रांच्या व्याख्या सांगू लागले.

गुरू स्वामी रामानंद :

रोहिदासाचे शास्त्रार्थावरील प्रभुत्व पाहून शंकराचार्यांना आश्चर्य वाटू लागले. केवळ श्रवणाने एवढे प्रचंड ज्ञान मिळवले त्याबद्दल त्यांची प्रशंसा केली. 'काशीमहात्म्य' नावाच्या ग्रंथात उल्लेख केला आहे की, शंकराचार्यांनी 'एका शूद्राशी शास्त्रार्थ केला.' परंतु भविष्यपुराणाच्या चौथ्या खंडात एक प्रसंग आहे. ''सूर्याचा द्वितीय पुत्र पिंगलापतीने मानदास चांभाराच्या घरी जन्म घेतला. त्याचे नाव रैदास ठेविले. रैदासाने काशीत कबीराबरोबर वादविवाद केला. त्यांचा पराभव केल्यावर ते शंकराचार्यांजवळ आले. दोघात एक दिवस एक रात्र शास्त्रार्थ झाला. शेवटी त्यामध्ये रैदासाचा पराभव झाल्यावर त्यांनी शंकराचार्यांना प्रणाम केला.'' शंकराचार्यांकडून हार खावी लागल्याची खंत रोहिदासांच्या मनात लागून राहिली. त्यांनी कबीराची भेट घेतली व सारी हकिकत सांगितली. त्यानंतर रोहिदासांनी स्वामी रामानंदाची भेट घेण्याचे ठरविले. गुरूची भेट व कृपा झाल्यामुळे रोहिदासांना अत्यानंद झाला. गुरूकडून रोहिदासांना रामनामरूपी अमृतरसाची प्राप्ती झाली.

''राजा पीपाने स्वामी रामानंदास सर्व शिष्यांसह गांगरोनला येण्याचे निमंत्रण दिले होते. म्हणून स्वामी रामानंद दिग्विजय यात्रेच्या वेळी आपल्या कबीर, रोहिदास इत्यादी शिष्यांसह गंगारोनगढास गेले.''[६] पीपाने स्वामीजींच्या नेतृत्वाखाली सर्व संत स्नेहींचे अपूर्व स्वागत केले.

''संत रोहिदासांनी आपल्या आयुष्यात तीर्थाटन व भक्तांच्या निमंत्रणावरून अनेक यात्रा केल्या होत्या. कुंभमेळ्यावर प्रयागची तसेच मथुरा, वृंदावनाच्या यात्रा अनेक प्रसंगी केल्या आहेत. ते दक्षिण भारतामध्ये तिरूपती तसेच उत्तर भारतात मुलतानपर्यंत गेले आहेत.''[७] ''संत रोहिदासांच्या रचनेत निरनिराळ्या भाषेतील शब्द मिळतात. तसेच उत्तरप्रदेश, पंजाब, राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र इत्यादी भारताच्या अनेक प्रांतांत संत रोहिदासांचे अनुयायी मिळतात. यावरून संत

रोहिदासांनी दूरदूरच्या यात्रा केल्या होत्या.''[८] गुरू रोहिदासांनी १५१ वर्षांच्या वयापर्यंत उत्तरप्रदेश, बिहार, राजस्थान, पंजाब, हरियाणा, दिल्ली, मध्यप्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरात इत्यादी प्रांतात फिरून आपल्या कल्याणमयी सरस वाणीच्या अमृतसरिता वाहत ठेवल्या होत्या.

संत रोहिदासांचे निर्वाण :

रैदास रामायणाचे लेखक म्हणतात की, 'संत रोहिदास हे काशीत गंगाकिनारी तपस्या करताना जीवनमुक्त झाले किंवा सदेह गुप्त झाले.' संत रोहिदासांचे मृत्युस्थान चितोडगड व काशी असे दोन्ही विचारधारावाले रोहिदास सदेह गुप्त झाल्याचे मानतात.

संत रोहिदासांचे मृत्युस्थळ चितोडगडच असावे कारण त्यांच्या सुप्रसिद्ध शिष्या महाराणी 'झाली' व मीराबाई या दोघींच्या आग्रहावरून संत रोहिदासांनी आपल्या आयुष्याची संध्याकाळ पत्नी लोनासह चितोडगडावरच घालविली. कुंभश्याम मंदिरात स्वरचित आरती म्हणून मंदिराबाहेर पडताच संतप्त पुरोहितांनी त्यांच्यावर घातक प्रहार केले व त्यांचे प्रेत गंभीरी नदीत फेकून दिले असावे. परंतु त्यांची पादत्राणे जेथे मिळाली, त्याच ठिकाणी त्यांची समाधी व छत्री बांधलेली आहे.

संत रोहिदासांचा जन्म माघ पौर्णिमा सन १३७६ (संवत १४३३) तर त्यांचे निर्वाण सन १५२७ (संवत १५८४) मध्ये झाल्याचे म्हटले जाते. संत रोहिदासांचे आयुष्य १५१ वर्षांचे होते. एवढे आयुष्य सर्वसाधारण मनुष्यास मिळत नसते. परंतु संत रोहिदासांसारख्या परमयोगी, सात्त्विकवृत्ती, इंद्रियनिग्रही सद्गृहस्थाने एवढे आयुष्य भोगणे असंभव किंवा आश्चर्यकारक वाटत नाही. संत रोहिदासांनी चर्मकार जातीत जन्म घेऊन आणि पुरातन संस्कृतीच्या खऱ्या स्वरुपावर प्रकाश टाकून तसेच युग युगांतरापर्यंत ते जिवंत ठेवण्याचे महान कार्य केले.

रोहिदासांची काव्यसंपदा :

संत शिरोमणी महात्मा रोहिदासांच्या अमृतवाणीचा बहुतेक करून प्रत्येक धर्म जिज्ञासू थोडा फार परिचित आहे. परंतु दुर्भाग्याने त्यांची वाणी फारच थोडी उपलब्ध झाली आहे. त्यांची वाणी दोहे आणि पदे यांच्या रूपात पाहावयास मिळते. प्रसिद्ध समाजसेवक आचार्य पृथ्वीसिंह आजाद यांनी मोठ्या परिश्रमाने अनेक दुर्लभ प्रतींमधून पाठसंग्रह करून 'रविदास दर्शन' नावाचा ग्रंथ प्रकाशित केला. ''संत रोहिदासांचे सारे गुणविशेष त्यांच्या काव्यात दिसून येतात. नामदेवांचा शुद्ध भक्तीभाव त्यांना हवासा वाटला आहे. संतसंस्कृतीच्या सर्वसमावेशक उदारतेला साजेशी त्यांची विचारसरणी आहे. साधेपणा आणि सुबोधता असल्याने त्यांची वाणी जनसामान्यास जवळची वाटते.''[९] धर्मादास हे संत रोहिदासांचे पणतू होते. त्यांची समकालीन संत करमदास यांनी धर्मदासाकडून संत रोहिदासांच्या साक्या (दोहे) लिहून घेतल्या होत्या.

संत रोहिदास निराभिमानी युगपुरुष होते. त्यांचे ग्रंथ चितोडगढमध्ये नष्ट केले कारण चितोडगढच्या राजवंशात त्याचा प्रभाव वाढला होता. संत रोहिदास हे किती वर्ष जगले यापेक्षा ते आपले दीर्घ आयुष्य कशाप्रकारे जगले हे अधिक महत्त्वाचे आहे. उत्तर भारताप्रमाणे महाराष्ट्रातही संत संप्रदायामध्ये त्यांचे नाव गौरवाने घेतले जाते. त्यांचे काव्य सर्व समाजाला प्रेरणादायी व मार्गदर्शक आहे.

संदर्भ सूची

१) डॉ. बी. पी. शर्मा, रविदास दर्शन, प्र. सं., सन १९७२, पृ. ६४.
२) डॉ. बी.पी. शर्मा, संत गुरू रविदास, प्र. सं. सन १९७२, पृ. ८.
३) सत्यदेव शिंदे, श्री संत रोहिदास, प्र. आ. सन १९७२, पृ. २.
४) पं. गिरीजाशंकर मिश्र, रविदास रामायण, प्र. सं. सन १९८१, पृ. १८.
५) माखनदास मु. खुडहुरिया, चँवर पुराण तथा भक्त चेता, पंचमवार, पृ. १.
६) डॉ. बी. पी. शर्मा, संत गुरू रविदास, प्र. आ. सन १९७२, पृ. २०.
७) डॉ. योगेंद्रसिंह, संत रैदास, प्र. आ. सन १९७२. पृ. २७.
८) काशिनाथ उपाध्याय, गुरू रविदास, प्र. आ. सन १९८३, पृ. १२.
९) प्रा. अशोक कामत व एकनाथ कदम, श्री. संत रोहिदास, प्र. आ. १९६७, पृ. ८७.

❖❖❖

सोनवणे मनोरमा शिवाजी
डी-१५, सुंदरनगर, मु.पो. लोणंद,
ता. खंडाळा, जि. सातारा.

अनुक्रमणिका

दलित कवितेतील 'आई'

प्रा. डॉ. के. जी. सोनकांबळे

[ठिगळांचे वस्त्र लेऊन जरत्कारू देहाने, मुलाच्या भरणपोषणासाठी, जीवनभर कष्ट उपसत देहाने संपणारी 'माय' आपल्या अपत्याला सर्व दृष्टीने श्रीमंत करते. अशी आई सामर्थ्यवानच! – संपादक]

एक इस्त्राईली म्हण आहे, 'ईश्वराला सर्व ठिकाणी राहता येणे शक्य नाही म्हणून त्याने 'आई' निर्माण केली.' आजपर्यंतच्या मराठी साहित्यामध्ये 'आई' विषयीच्या विविध भावभावनांचे चित्रण अनेक कवींनी केलेले आहे. आईविषयीचा कृतार्थभाव, आईच्या उदात्ततेची थोरवी, आईचे महात्म्य कवी यशवंतापासून ते ज्याला आपण प्रेमपंढरीचे वारकरी म्हणून संबोधतो ते माधव जुलियनपर्यंतच्या काव्यात 'आई' विषयीचे भाव व्यक्त झालेले आहेत.

१९६० नंतरच्या काळात शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार झाला. शिक्षण समाजातल्या तळागाळापर्यंत पोहोचले. शिक्षणामुळे समाजातल्या विविध स्तरांतून जागे झालेले मन स्वतःविषयी व 'आई'विषयी आपापल्या भावना व्यक्त करू लागले. मराठी साहित्यात 'आई'विषयक विविध आयाम प्रकट होऊ लागले. साठोत्तरी काळात कवी सुरेंद्र नाईक त्यांच्या 'गाणे निळ्या सूर्याचे' काव्यसंग्रहात 'आई' विषयीचा भाव मांडताना लिहितात.

''जात्यामध्ये नाही दाने
तरीही माय दळायची
डोळ्यामध्ये नाही पाणी
तरीही माय रडायची''[१]

आईच्या सोशिकतेचे, दारिद्र्याचे व तिच्या कष्टप्रद जीवनाचे चित्र नाईकांच्या काव्यपंक्तितून जसे प्रत्ययास येते, तसेच कवी वामन निंबाळकरांच्या 'गावकुसाबाहेरील कविता' या काव्यसंग्रहातल्या 'माय' नावाच्या कवितेतूनही येते.

''आंधाराला चिरत तेव्हा एक सावली जड येई
डोयी तिच्या भारा असे चालताना तोल जाई
काळी, काळी कृश देह ती असे माझी माय
वणवण सकाळपासून मोळीसाठी रानात जाय.''[२]

निंबाळकरांच्या कवितेतील आईविषयीची भावना मन व्याकूळ व सुन्न करणारी आहे. यात आईविषयीच्या उदात्ततेचे गोडवे नाहीत. आईच्या दारिद्र्याची जीवघेणी रुपे आणि वाचकांचे मन विदीर्ण करणारी जाणीव निंबाळकरांच्या कवितेत प्रकर्षाने होते. दारिद्र्याने होरपळणाऱ्या आणि दारिद्र्यातच करुण अंत होणाऱ्या मायीचे चित्र साकार करते.

''माय पडली धरणीवर गंडे झाले, मंत्र झाले वैद्य आला
दिवस निघता निघता तिच्या देहातून प्राण गेला.''[३]

कवी भगवान सवाई यांनी 'जेतवन'मधील 'मायी'विषयी वेगळा भाव मांडला. कवी नोकरीनिमित्त शहरात आला. सोबत मूळ ग्रामीण जीवन व संस्कृतीचे संस्कार घेऊन आला. बालवयात झालेले संस्कार शहरी संस्कृतीत आल्यावरही विसरत नाहीत. शहराच्या भंडक स्वरुपाच्या जीवनापेक्षा कवीला ग्रामीण जीवन व ग्रामीण जीवनातील माणसे चांगली व महत्त्वाची वाटतात. म्हणूनच त्यांना ग्रामीण जीवन जगणारी, जुन्या परंपरेतील माय महत्त्वाची वाटते. शहरातली 'मम्मी' बघितल्यावर कवीला आपल्या मायीची आठवण येते. माय अगदी कुडकुडीत, कष्ट उपसून हाडे शिल्लक राहिलेली, कपड्यात देह गुंडाळल्यासारखी असावी; अगदी तशी ! कपाळावर भले मोठे कुंकू. कष्टप्रद जीवन जगणारी, अंगावरील चोळी सुद्धा फाटलेली. पण तिला आपल्या बाळाबद्दल वात्सल्य आहे. त्याविषयी सवाई लिहितात-

''माय कुळकुळीत : हडकुळी
चिंधीत देह गुंडाळलेली : माय
धडुत्यात स्वप्न बांधलेली : माय
कपाळावर पुनवेचा चंद्रासार्ख कुंकू कोरलेली
अन् लिबलिबीत पान्ह्याचे झरे,
माय : माझ्यासाठी सांभाळणारी फाटक्या चोळीत''[४]

स्वतःच्या संस्कृतीचा वारसा जपणारी माय, तिला स्वतःच्या कपाळावर मोठे कुंकू लावणे महत्त्वाचे

वाटते. तिच्या सौभाग्याचे लेणे तिला जगण्यासाठी प्रेरणा देते. अशी ही माय खडीसेंटरवर काम करण्यासाठी जाते. त्यातून तिला दाम मिळतो. त्या दामावर भूक भागवून ती आपल्या मुलाच्या दुधाची सोय करते. भेगाळलेले पाय उन्हातान्हात घेऊन ती फिरते. त्यामुळे पायातून रक्त निघते. अशा वेळी कवीला प्रश्न पडतो-

''हे आये, माझे माय,
मी तुला मम्मी केव्हा म्हणू ?
आता मायमम्मी पार वाळून गेलीय
बाभळीच्या शेंगासार्खी
माय माझी...''[५]

भगवान सवाइ यांना ट्युबलाईटच्या माळा घालून मिरविणाऱ्या शहराच्या चौकात लिपस्टिक लावलेली भित्तिपत्रकावर दिसावी, तशी एक मम्मी दिसते. दगडी गर्दीत-निर्जीव, निस्तेज गर्दीच्या कोंडाळ्यात उभी असलेली मम्मी बघितल्यावर स्वतःच्या आईची आठवण येते. शहरातील मम्मीपेक्षा स्वतःची माय वेगळी वाटू लागते.

''रंगीन-मम्मी : मम्मी
काजळ कोरल्या रेषेतली पर्समय मम्मी
मम्मी पोटऱ्यांचे डोंगर वाहून नेणारी''[६]

स्लिवलेस वस्त्र परिधान केलेली, चेहऱ्यावर अत्याधुनिक रंगरंगोटी केलेली, पर्समध्ये हरवलेली मम्मी कवीला भरचौकात दिसते आणि त्यांना त्यांच्या मायीची आठवण येते. दगडी चौकातली मम्मी आणि खडीसेंटरवरची माय याची तफावत एका प्रसंगाने उभे करून आपल्या मायीला शहरातले झगमगाटी जीवन माहीत नसले; तरी तिला दारिद्र्याशी संघर्ष करीत जीवन जगणे महत्त्वाचे वाटते. अशा आईला कधी सुखाचे दिवस येतील या विषयीचा भाव मांडताना सवाई लिहितात-

''आये, हे माझे माय,
तुला किती दिवस मी खडीसेंटरवर पाहू
तुला मी मम्मी म्हणायचा दिवस येणारच कधी
सिनेमातल्या त्या पर्सवाल्या लठ्ठ थुलथुलीत बाईच्या पोटऱ्या
तुला येतीलच का नाही''[७]

आईची कष्टप्रद अवस्था संपावी, तिला सुखाचे दिवस यावेत, तिचा वाळून गेलेला देह आरोग्यदायी व्हावा; असे कवीला वाटते.

अशोककुमार दवणे यांनी 'शृंखला' काव्यसंग्रहात बालपणी वाट्याला आलेल्या आईविषयीच्या कडवट अनुभवांच्या व्यथा-वेदनांचे प्रकटन केले. बालपणीच वडिलांचे छत्र नाहीसे झाल्यावर त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. अशा स्थितीत त्यांच्या आईने रात्रंदिवस कष्ट उपसून कुटुंबाचे पोषण केले. या कालावधीत त्यांच्या आईला अनेक यातनांना तोंड द्यावे लागले.

''धनलोभी गावराक्षसा
वैधव्यात भाजलेल्या माझ्या मायला
पैशाची आशा दाखवून
पंधरा वर्षांपूर्वी कोऱ्या कागदावर
घेतलेस ठसे अंगठ्याचे
चपलीनं पाठ फोडलीस मायची जनावराप्रमाणे'

एका दलित विधवा स्त्रीवर झालेल्या अत्याचाराचे चित्र मनाला चीड, संताप आणणारे असून आता दलित स्त्रीवर नव्हे तर एकूण कुठल्याही शोषित गरीब स्त्रीवर अन्याय सहन केला जाणार नाही; असा निर्धार व्यक्त करताना अशोककुमार दवणे लिहितात-

''यापुढं माझ्याच काय पण चुकुनही
कुणाच्या आय-बहिणीच्या आड आलास तर
खांब कलता होईल
आभाळ खाली येईल
आणि फुटतील वाटा चौफेर
भूगर्भाती लाव्हाला''[९]

अशोककुमार दवणे आपल्या आईवर झालेल्या अन्यायामुळे संतप्त झाले असले; तरी त्यांची संयमी स्वभाववृत्तीही पाहावयास मिळते. जीवनातील व्यथा-वेदना सहन करून कवीच्या आईने कवी दवणे यांना वाढविले. त्याविषयीचा कृतार्थभाव 'शृंखला' काव्यसंग्रहाच्या अर्पण पत्रिकेत व्यक्त केला. जवळच्या स्वार्थी नातेवाईकांनी केलेला आईचा छळ कवी विसरत नाही.

कों. जो. नरवाडे यांच्या 'माय' नावाच्या काव्यसंग्रहात 'माय' नावाच्या कवितेत आईविषयी

अनुक्रमणिका

भाव मांडताना लिहिले-

''मायी माझी माऊली
वाढविले तिने मला
रजाचा गज केला
पहिले वंदन तिजला''[१०]

आपल्या जन्मदात्रीच्या अपार कष्टाची, हालअपेष्टांची नरवाडे इथे नोंद घेतात, तिला पहिला मानाचा मुजरा करतात.

दु. मो. लोणे त्यांच्या 'घुगऱ्या' काव्यसंग्रहात आईविषयीचा भाव प्रकट करताना लिहितात-

''आता येईलच आपली माय
नसल इकला गवताचा भारा
कशी येईल मग ती लवकर घरा''[११]

इथे कवी वामन निबांळकरांच्या मोळी विकणाऱ्या आईची आठवण होते. गवताचा भारा विकून पोटच्या चिल्यापिल्यांना जगवणारी, त्यांच्यासाठी वाट्टेल ते कष्ट उपसणारी आई दिसते.

वामनराव जगताप यांच्या 'रांगडी माय माझी' या कवितेत जीवनाचं आगाध तत्त्वज्ञान सांगणारी, दारिद्र्यात संसार करणारी, रोजच्या भाकरीचं, जीवनाचं तत्त्वज्ञान सांगणारी आई जगातंल्या हजार विचारवंतापेक्षा श्रेष्ठ असल्याचा भाव व्यक्त करताना-

''हजार विचारवंतापेक्षा
कईक पटीनं
श्रेष्ट आहे
जेष्ठ आहे
वरिष्ठ आहे''[१२]

आई महान आहे, महात्मा आहे, सत्य आहे, नित्य आहे. ती साक्रेटिस आहे, लिंकन आहे, मार्क्स आहे, प्रेमचंद आहे. आईची थोरवी रेखाटताना आईचे दुसरे रूपही वामनराव जगताप त्यांच्या 'अग्निदिव्य' या कवितेत आपल्या मुलाच्या भवितव्याची चिंता वाहत वाहत संपून जाणारी आईही चित्रित केली आहे. आपले काहीही होवो, पण आपल्या मुलाचा 'साहेबा'चा अभ्यास बुडू नये म्हणून ती सतर्क आहे. आपल्या मौतीला आणि तेरव्याला सुद्धा आपल्या मुलाला सांगू नये. तिच्या भविष्यातल्या 'सायबा'ची परीक्षा जवळ येऊन ठेपली असे तिला वाटते. अशा मायीला 'अवार्ड' दिला पाहिजे; आणि सम्राज्ञीपदीही ! एवढे देऊनही मायीचं पारडं जडच भरेल; असे कवी वामनराव जगताप यांना वाटते.

राम दोतोंडे यांनी 'गल्ली बदललेला मोर्चा' या काव्यसंग्रहातल्या 'सांगू नको ग माय' नावाच्या कवितेतून शिक्षण घेऊन परिवर्तन झालेल्या परिस्थितीचे चित्र साकार केले. कवी शहरात नोकरीच्या निमित्ताने स्थिर झाल्यावरही आपल्या गावाला आणि गावकडच्या आठवणींना मात्र विसरत नाही. कवीची आई शहरात आपल्या मुलाला भेटायला येते. गावकडच्या बऱ्या-वाईट गोष्टी निघतात. कधी दुष्काळाच्या पावसापाण्याच्या, दारिद्र्याच्या कथा आई सांगते. आई व मुलाच्या संवादातून जमीनदारांच्या व्यथा, मोलमजुरी करणाऱ्यांच्या व्यथा, भीक मागणाऱ्यांच्या व्यथा, ह्या सर्व गाथा एकूणच भयावह परिस्थितीचे, रया गेलेल्या गावाच्या आठवणी ऐकून मन विदीर्ण होते. गावानं आम्हाला वेशीबाहेर ठेवले तरी शेवटी तो गाव माझा आहे, असे कवीला वाटते.

रविचंद्र हडसनकर यांनी 'ठिणगी' काव्यसंग्रहात आईच्या दारिद्र्याचे वर्णन करताना लिहिले-

''त्यात ठिगळी लुगडे आणि
चोळीही ठिगळा ठिगळांची
माय माझी हुबेहूब मूर्ती
दारिद्र्यमय त्या अवकळांची''[१३]

आई दारिद्र्यात असली तरी तिच्यात दारिद्र्याशी सामर्थ्ये सामावलेली आहेत; असे कवीला वाटते.

शरणकुमार लिंबाळे यांनी त्यांच्या 'उत्पात' नावाच्या काव्यसंग्रहात आईच्या अश्रूंचे वेगवेगळे संदर्भ देऊन आईच्या अश्रूत उद्याचा सूर्य उगवण्याचा आशावाद व्यक्त केला आहे. 'आई' या नामोच्चारातच इतकी जादू भरलेली आहे की; युद्धामध्ये योद्धे लढत असताना कुणी तरी मोठ्याने 'आई' अशी हाक मारली. त्या हाकेच्या आवाजाने युद्धभूमीवरील सर्व शस्त्रे शरण आली, नतमस्तक झाली आणि एकमेकांच्या जिवावर उठलेले सैनिक युद्ध न करता एकत्र आली. कारण त्या सर्वांची 'आई' ही एकच असते.

''आईऽऽ
म्हणून मी हाक मारतो

तेव्हा तमाम युद्धभूमी
शस्त्रे खाली ठेवून माझ्याकडे येतात
त्यांची आई, माझी आई
एकच असते''[१४]

'आई' शब्दांच्या सामर्थ्याचे वर्णन याहून वेगळे कसे सांगता येईल ?

कवयित्री कमल कदम 'जाब' काव्यसंग्रहात आईच्या उपकाराविषयीचा भाव मांडून त्या उपकाराची परतफेड कशी होऊ शकेल' आई कशी होऊ मी उतराई' कवितेत असा प्रश्न उपस्थित करून आईने माझ्या हातात खराट्याऐवजी लेखणी दिली. त्या लेखणीला आंबेडकरी विचारांची धार आली. ही लेखणीची धार स्त्रीजातीवरील अन्याय अत्याचाराच्या निर्मूलनासाठी आहे; असे कवयित्रीला वाटते.

संदर्भग्रंथ :

१. सुरेंद्र नाईक : गाणे निळ्या मूर्यांचे, युगंधर प्रकाशन, औरंगाबाद. प्र. आ. १९८५, पृष्ठ ९.
२. वामन निंबाळकर : गावकुसावाहेरील कविता - आस्वाद आणि समीक्षा, सुगावा प्रकाशन, पुणे. तृ. आ. १९९०, पृष्ठ ११३.
३. कित्ता : पृष्ठ ११३.
४. भगवान सवाई : जेतवन, शैली प्रकाशन, सेलू प्र. आ. १९८२, पृष्ठ ११.
५. कित्ता : पृष्ठ १२.
६. कित्ता : पृष्ठ ११.
७. कित्ता : पृष्ठ ६२.
८. अशोककुमार दवणे : शुंकला, निर्मल प्रकाशन, नांदेड प्र. आ. १९८८, पृष्ठ ३३.
९. कित्ता : पृष्ठ २३.
१०. कों. जो. नरवडे : माय, निर्मल प्रकाशन, नांदेड प्र. आ. १९९६, पृष्ठ १५.
११. दु. मो. लोणे : घुगऱ्या, ग. ना. अंबेकर प्रकाशन, नांदेड प्र. आ. १९७८, पृष्ठ १७.
१२. वामनराव जगताप : प्रतिबिंब, अनुदीप प्रकाशन, औरंगाबाद.
१३. रविचंद्र हडसनकर : ठिणगी, निर्मल प्रकाशन, नांदेड प्र. आ. १९७७, पृष्ठ ३९.
१४. शरणकुमार लिंबाळे : श्वेतपत्रिका, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर प्र. आ. १९८९, पृष्ठ ६२.

❖❖❖

प्रा. डॉ. के. जी. सोनकांवळे
मराठी विभाग प्रमुख,
जे.ई.एस. कॉलेज, जालना.
मो. : ९४२३७३१३५६

मानव्याची द्वाही देणारी 'निर्भंगावली'

प्राचार्य डॉ. भगवान ठाकूर

[शतकोटी अभंगाचे सामर्थ्य घेऊन संतांनी, आध्यात्मिक भक्तीचळवळीने समानतेचे स्वप्न साकारले. त्याच अभंगाला 'निर्भंग' (?) म्हणून, शेतकऱ्यांच्या दुःखमुक्तीसाठी, साडेतेराशेच्या अधिक अभंगरचनेतून तुकाराम-रामदासांच्या वाटेवरुन जाणाऱ्या 'निर्भंगावलीचा' हा एक आस्वादक परिचय. –संपादक]

अभंग आणि ओवी हे प्राचीन आणि तरीही नित्यनूतन काव्यछंद आहेत. तुकोबारायांपासून समस्त संतमंडळींनी हे छंद समर्थपणे वापरलेत. अर्वाचीन काळातही अभंग हा छंद जोतिबा, भालेकरांपासून, मर्ढेकर, करंदीकर, मधुकर केचे, पाडगावकरांपासून तर नव्या पिढीतील ग्रामीण, दलित कवींनीही वापरला आहे. कालपरत्वे अभंगातील आशय मात्र बदलत गेला.

कवी शिवाजीराव पाटील यांनी अभंगालाच 'निर्भंग' हे नाव देऊन लक्षणीय, ठसठशीत आणि सशक्त रचना 'निर्भंगावली' या शीर्षकाने केली आहे. शिवाजीराव पाटील, गांधलीकर (अमळनेर) हे पुरोगामी संतपरंपरेचे पाईक आहेत. प्रागतिक महामानवांचे प्रांजळ पूजक आहेत. म्हणूनच हा कवी माणसांचं गाणं गातो. जे अंधारात आहेत त्यांच्या हाती उजेडाची फुलं देतो. इहवादी, विज्ञाननिष्ठ, विवेकशील, मानवकल्याणाचे पसायदान मागतो.

सुरेश भटांनी जसा गझल हा काव्यप्रकार प्रदीर्घकाळ इमानदारीने हाताळला तसेच शिवाजीराव पाटील सातत्याने अभंग ह्याच रचनाबंधात लिहीत आहेत. आतापर्यंत त्यांचे ११ निर्भंगावलीचे काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. १३६७ अभंग रचलेत, १६ काव्यसंग्रहांचा संकल्प किमान आहे. त्यातील 'निर्भंगावली-शेतकऱ्यांच्या मुक्तीची' याच काव्यसंग्रहातील अभंगांचा विचार केला; तरी त्यांचा मनःपिंड, वैचारिक जडणघडण, तात्त्विक बैठक, परिवर्तनशील दृष्टी आणि रचनाबंध म्हणून अभंग या छंदावर असलेलं त्यांचे प्रभुत्व स्पष्ट होतं.

कबीराचे दोहे, तुकोबाचे अभंग, तुकडोजीची ग्रामगीता, गाडगेबाबांची वाणी, वामनदादा कर्डकांची गाणी, फुल्यांचे अखंड, भालेकरांचे श्रीखंड याच कुळातील ही निर्भंगावली आहे.

एकूण ११० पृष्ठांच्या या काव्यसंग्रहात २६४ अभंग आहेत. हा कवी म्हणजे मानवताधर्माची द्वाही, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाची ग्वाही देणारा, बहुजनांचा निर्भंगावलीकार आहे. सहजता, स्वाभाविकता, उत्स्फूर्तता, प्रांजळपणा आणि प्रसंगी परखडपणा या अभंगांचा गुण आहे. मुळात अभंग हा काव्यछंदच आत्मशोधक, आत्मसंवादक, उद्‌बोधक, संस्कारक्षमता असलेला आणि अल्पाक्षर परि बहुअर्थप्रसव आहे. चांगल्या अभंगास सुभाषित, सुवचनाचे मोल प्राप्त होते. उदा. निर्भंगावलीतील हे अभंग-

जगवा माणूस । जगेल तो धर्म ।
वाढवू सत्कर्म । माणसा रे ॥ (पृ. २५)
सोडा जातभेद । देवधर्मपंथ ।
आचरावे संत । कल्याणाचे ॥ (पृ. २५)
सत्य आचरण । सत्यव्यवहार ।
धर्माचे माहेर । सत्य एक ॥ (पृ. २८)

कर्जापायी शेतकरी जो जगाचा अन्नदाता मानला जातो. त्याची दुरावस्था शब्दांकित करताना कवी म्हणतो-

पिकले विकले । नाही रे गणती ।
विझते पणती । कर्जापायी ॥ (पृ. २९)
शिवा म्हणे कोण । तारी कुणब्याला ।
शोषक तो झाला । मालामाल ॥ (पृ. २३)

अनेक पक्षांची सरकारं आलीत, गेलीत. 'जयजवान, जय किसान' चा त्यांना विसर पडला. वरवरची मलमपट्टी निरूपयोगी ठरली. म्हणून कवी म्हणतो

बहु आले गेले । सत्ताभोगी झाले
फाशी अडकले । शेतकरी ॥ (पृ. ३१)
आशा एक आता । असो बळीसत्ता ।
तरीच सुबत्ता । सकळासी ॥ (पृ. ३१)

संपूर्ण निर्भंगावली शेतकरी, शेतमजूर, अज्ञ-अडाणी कुणवी समस्त बहुजन वर्गालाच कवी 'जागल्या' होऊन जागे करीत आहे. शेतकऱ्याच्या जीवनाशी निगडीत सर्व प्रश्न, शेती, कर्ज, देश, देवधर्म विश्लेषित करीत आहे. बळीराजाच्या राज्याचे आदर्श मानचित्रच कवी रेखाटतो. कर्ज, व्यसनधीनता, अंधश्रद्धा, अविद्या, विज्ञान, संस्कृती, शासननीती, व्यापारी कावा, भांडवलदारांचं गारूड या सर्वांवर कवी सूक्ष्म 'क्ष' किरण टाकतो; आणि तेही साध्या, सुलभ, सुबोध, प्रासादिक भाषेत. ही भाषा देशीय संतकुळातील आहे. 'अंतरीचे धावे । स्वभावे बाहेरी' अशी ही भाषा आहे. कारण ती ओठापासून नाही, काळजाच्या देठापासून आली आहे. निर्भंगावलीत शब्दसौंदर्य तर आहेच पण त्याहून अधिक अर्थसौंदर्य, आशयाची सुंदरता आहे. कवीचं समाजभान परिपक्व आहे. मानवी वर्तनप्रणालीची अचूक जाण आहे. शब्दाची लय, ताल, नादाची उत्तम समज आहे. समर्पक उपमा, यथार्थ दृष्टान्त हे वैशिष्ट्य आहे. शब्दकळा अर्थवाही आहे. उदा. ऐक्यग्राम, गरिबीची उन्हे, पैजाराचे धनी, बळी महिमान, मृत्यूचा दातार, आतुडेना, चाहुली, मस्तकीला, स्फुंद, झडी, भाववळे, नभाग्री, ठगाठगी, मायबंधु इ.

जीवनाचा स्वानुभाव अर्करुपात कवीने या निर्भंगावलीरुपी कुपीत अत्तरासारखा भरला आहे.

'जे जे आपणाशी ठावे ।
ते ते सर्वांस सांगावे ।
शहाणे करूनि सोडावे । सकलजन ॥'

हाच समर्थ रामदासांचा ध्यास कवीला आहे. शेतकऱ्याचं जगणं, भोगणं, भोग आणि अवघे भोगवटे या निर्भंगावलीत शब्दांकित केले आहेत. शेतकरी का कर्जातच जन्मतो आणि कर्जातच मरतो ? या प्रश्नाचाच सातबारा निर्भंगावलीत आहे. या निर्भंगावलीची थोडक्यात व्याख्या करायची तर एका संवेदनशील माणसानं सामान्य माणसांच्या भल्यासाठी लिहिलेली, माणूस हाच केंद्रस्थानी असलेली म्हणूनचं कधीही भंग न पावणारी अशी अभंगावली म्हणजे 'निर्भंगावली' शेतकऱ्याच्या दुःख मुक्तीची नली गाथाच हा कवी रचतो आहे.

''मैंने मौसमसे जादा
हुकुमतके मारको सहा है ।
किसान कर्ज की बाढमें कम
आँसूओमें जादा बहा है ।
मैं उगाता हू कपास तो
सारी दुनिया कपडे पहनती है ।
फिर मेरीही लाश
एक कफनके लिए क्यों तरसती है ?''

या निर्भंगावलीत सहाचरणी अभंग आहेत. सहा ओळींचं एक युग्म आहे. रचना ओघवती व चित्रमयी शैलीत आहे. उदा.

महामानवांनी । आणिला प्रकाश ।
वाचा दुःखास । फोडिली हो ॥
विचारांचे दिवे । पेटविले खरे ।
पाडीलेत चरे । पाषाणाला ॥ (पृ. ३२)

अशी कित्येक उदाहरणे सांगता येतील. जटील, व्यामिश्र, क्लिष्ट, दुर्बोध, अनाकलनीय कविता हीच श्रेष्ठ कविता असे काही रूपवादी, कलावादी, संरचनावादी काव्यकोविद मानतात. या हृदयीचे त्या हृदयी सहज हृदयसंवाद साधणारी साधी-सोपी-सुबोध रचना कविता नसते काय ? माणूस हाच साहित्याच्या केंद्रस्थानी आहे.

''शिवा म्हणे मेंदू । नको गुलामीचा।
गेला सलामीचा । काळ आता ॥''

निर्भंगावलीच्या पानापानावर कबीर-तुकोबा-शाहू-आंबेडकर-तुकडोजी-गाडगेबाबांच्या वैचारिक वैभवाच्या पाऊलखुणा दिसतात. रामदासांचे मनाचे श्लोक, बहिणाबाईंच्या गाण्यांची आठवण होते. ''भुकेतून क्रांती । सुखे प्रसवली । सत्ता गाजवली । जगावरी ॥'' ''सोडू नको न्याय । नीतीला आचरी । तरीच संसारी । सुख खरे ॥'' अशी ही कविता जीवनसन्मुख आहे.

निर्भंगावली - शेतकऱ्यांच्या मुक्तीची (काव्यसंग्रह) कस्तुरी प्रकाशन, अमळनेर, पृ. ११०, मूल्य - १०० रु.

❖❖❖


प्राचार्य डॉ. भगवान ठाकूर
नौरोसजी वाडिया महाविद्यालय.
पुणे १.

पुस्तक परिचय

ललितरम्य शैलीतले लेखन

नंदा सुर्वे

ललितलेखनातल्या अनेक अंगभूत गुणांपैकी 'सहजता' हा प्रधान गुण म्हणायला हवा. आणि जवळपास अशाच शीर्षकाचा एक ललितलेख संग्रह आलाय तो डॉ. वृषाली किन्हाळकर यांचा. संग्रहाचे शीर्षक आहे- 'सहजरंग' डॉ. वृषाली किन्हाळकर ह्या कवयित्री म्हणून प्रसिद्ध आहेत. त्या स्त्रीरोगतज्ज्ञही आहेत हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातले दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य. आता ह्या पुस्तकाच्या निमित्ताने ललितलेखक म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला लाभलेला नवा पैलू. असं तिरंगी व्यक्तिमत्त्व असलेल्या डॉ. वृषाली किन्हाळकर आपल्या मनोगतात म्हणतात, ''या लेखनाद्वारे जगण्यातल्या काही रंगांना सहजपणे स्पर्श करता आला म्हणून हे 'सहजरंग'.



ह्या संग्रहातल्या काही लेखांचे विषय त्यांना त्यांच्या वैद्यकीय व्यवसायानं दिलेले आहेत. काही विषय त्यांच्यातल्या संवेदनशील, तरल कवयित्रीनं कधी रसिकतेनं तर कधी भावगंभीरतेनं टिपलेले आहेत. जीवनसरणीवरच्या विविध रंगांना, विविध गंधांना शब्दरूप देण्यासाठी लागणारी प्रत्ययकारी दृष्टी लेखिकेजवळ भरभरून आहे. बहुश्रुतता, बहुवाचकत्व हे लेखिकेचे स्थायीगुण आहेत याचा प्रत्यय अनेक घटना-प्रसंगांमधून येतोच शिवाय अनेकदा येणाऱ्या अवतरणांमधून त्यांचा स्मरणगुण, त्यातला नेमकेपणा लक्षात येतो.

डॉ. वृषाली किन्हाळकरांसारख्या अनुभवसंपन्न लेखिकेजवळ संवेदनशील मन आहे, शैलीदार हात आहे आणि तजेलदारपणाची ऊर्जा आहे, म्हणून यातले लेख औत्सुक्यपूर्ण झालेले आहेत. 'पहाटफूल' या आरंभलेखात लेखिका एका पुष्पवाटिकेत बसून विविध गंधी, विविध रंगी, विविध रूपी फुलांचा आस्वाद घेत आहे. प्रत्येक फुलाच्या जातकुळीवर, त्या फुलाच्या रुपबंधावर ती फार सुंदर भाष्य करते आहे. 'पिवळा एकेरी जास्वंद किती दिमाखात डोलतो, बसक्या छोट्या झाडावरून ! पाकळ्यांची रचना अशी की जुना ग्रामोफोनच आठवावा... आणि खूप वेळ टक लावून पाहिलं तर गाण्याचे सूरच ऐकू येतील असं वाटावं.' अशी आत्मधुंद अवस्था एखाद्या कवीमनाचीच असू शकते.

पूर्वी 'साडीची घडी मोडणे' ही आनंदाची बाब असे. दुसऱ्याला घडी मोडायला देणं हा सन्मानाचा, प्रेमाचा भाग समजला जात असे. आताच्या काळात ही 'घडी मोडणं' जणू लोक विसरलेत. हे सारं सांगताना लेखिका मार्मिक शेरेबाजी करत म्हणते, 'घडी' 'दुर्मिळ झालीय की विस्कटत चाललीय ?' (लेख- 'अप्रूप : घडी मोडण्याचे')

'अक्षर असावे' या लेखात अक्षरावर वेगवेगळ्या संदर्भात लेखिकेनं जाणिवेच्या वेगवेगळ्या पातळ्यांवरून भाष्य केलं आहे. लेखिकेचं अक्षरावर, शब्दावर मनःपूर्वक प्रेम आहे. त्या म्हणतात, ''कोरे शुभ्र कागद मला खुणावतात. पेन साद घालायला लागतं. नव्याने शाळेत जाणाऱ्या मुलाला अक्षरे शिकवायला मला मनापासून आवडतं.'' अक्षरांवर, लेखनशुद्धीवर त्यांचं इतकं प्रेम की, 'लेखनातल्या चुका पाहून बासमती तांदळाच्या सुरेख भातात खडा लागावा' तसं त्यांना दुःख होतं. सुरेख, स्पष्ट हस्ताक्षरातलं लेखन पाहून त्यांना

अनुक्रमणिका

प्रसन्नता लाभते. तरीही नव्या संगणकयुगाला सामोरं जाताना आपण सारे अक्षरविन्मुख होत जाणार या विचारानं लेखिकेचं मन खंतावतं आहे.

'ऱ्हस्व दृष्टिदोष' या लेखात त्यांच्या सजगतेनं पहाण्याच्या दृष्टिकोनाचं प्रत्यंतर येतं. सुरूवातीलाच एका गोष्टीची त्या कबुली देऊन टाकतात की; चाळिशी उलटल्यावर स्पष्ट दिसणं कमी झालं, चष्मा लावून वाचायला प्रारंभ झाला तेव्हा उमगलं की मागची चाळीस वर्षं ज्या दोन डोळ्यांनी निकोप दृष्टीचं दान आपल्याला दिलं; त्या परमेश्वराचे आभार मानावेत असं भान आपल्याला कधीच आलं नाही. पुढे जाऊन या ऱ्हस्वतेला वेगवेगळे मापदंड लावताना त्यांना जाणवलेल्या एका समर्पक उदाहरणाचा त्या आढावा घेतात. त्यांच्या मते परदेशी लेखकांचा नेहमी जागतिक पातळीवर उदो-उदो होत असतो; आणि तेवढ्याच तोलामोलाचे, तेवढेच प्रतिभासंपन्न लेखक या मातीत घडतात. त्यांना आपण किती उंचीवर नेतो? हा आपल्यातला 'ऱ्हस्व' दृष्टिदोष दाखवण्याचा त्या तळमळीनं प्रयत्न करतात.

आशावादी, सकारात्मक दृष्टी देणारे पंख त्यांना मिळतात; हा लेखही अंतर्मुख करणारा आहे. जगण्यातले कणभरापासून मणभरापर्यंतचे आनंद देण्याची; आणि घेण्याची समर्थ दृष्टी असणं किती महत्त्वाचं आहे हा बोध या लेखातून होतो. या संदर्भातला एक दाखला फार चांगला दिला आहे. लेखिकेच्या हॉस्पिटलमध्ये एक मूकबधिर महिला बाळंतपणासाठी आली होती. तिचं 'सिझेरीयन' करावं लागलं. अशक्त असलेल्या छोट्या बाळाला अतिदक्षता विभागात ठेवण्यात आलं होतं. त्या मुलीला हलता येत नव्हतं. बाळ बघण्याची तर उत्सुकता लागलेली. मग तिनं आपल्या नवऱ्याला बाळाचा फोटो काढून आणायला सांगितलं. संध्याकाळी या डॉक्टर लेखिकेला तिनं तो अत्यानंदानं दाखवला. लेखिकेला सुखद नवल वाटलं. आजवर असं कुणाला सुचलं नव्हतं. 'सुखाचा शोध असा घ्यायचा असतो. हे त्या मूकबधिर मुलीनं मला शिकवलं' असं लेखिका प्रांजळपणे लिहून जाते. अशा काही उदाहरणांनंतर लेखिकेनं फार सुजाण संदेश दिला आहे. तो असा- 'पंखांचा शोध घेत बसू नका. उडण्याची दुर्दम्य इच्छा ठेवली तर पंख मिळतातच आपसूक !'

'मदर्स डेच्या निमित्ताने' या लेखात लेखिकेनं मातृत्वाच्या गाभ्याचा वेगवेगळ्या कोनातून आढावा घेतलाय. तसंच 'ओसरत चाललेलं ऐश्वर्य' मध्ये 'नात्याची नवी नवी कोवळीक, हिरवाई वहरते. हळूहळू नाती घट्ट होत जातात. पुढे ती सैलावत जातात. नंतर कधी ती विरतही जातात.' ही निरीक्षणे मांडत मांडत लेखिका एका बदलत्या सत्यापाशी येताना फार भावूक होऊन म्हणते, 'सगळ्या नात्याचं आणि एकूण जगण्याचंच ऐश्वर्य ओसरत चाललं आहे का ?', 'सुखाचं दार' 'वर्तुळ', 'उतराई', 'अनाम नाते', 'पहाटफूल' 'स्वागत', 'एक साळुंकी' असे कितीतरी लेख मनाच्या गाभ्यात उतरतात. त्यांना बाहेर जायला ना खिडकी असते ना दरवाजा. तिथेच ते रूतून बसतात. रूजून जातात.

एकंदरीने पद्य आणि गद्य लेखनावर यशस्वीपणे स्वार होणारी ही लेखिका.

(पुस्तक : 'सहजरंग', ले. डॉ. वृषाली किन्हाळकर)

नंदा सुर्वे

निवडक नवे...


परिषदेकडे आलेल्या ग्रंथांपैकी
विशेष उल्लेखनीय ग्रंथांचा
परिचय करून देणारे सदर




अंतरीचे धावे :

चाकोरीबाहेरचे विषय निवडून लेखन करणारे अभ्यासू लेखक म्हणून 'अंतर्नाद' मासिकाचे संपादक भानू काळे सर्वांना ज्ञात आहेत. त्यांचा 'अंतरीचे धावे' हा मौज प्रकाशनाने प्रकाशित केलेला लेखसंग्रह वाचकांना श्रीमंत करणारा आहे. महात्मादेखील माणूस असतो, जे.आर.डी. टाटा, बाजारू संस्कृतीच्या विळख्यात, सलाम इंडिया टुडे, ब्रायटनची छत्री, असेन मी नसेन मी..., एक छोटुकले मोठे मासिक, एक संध्याकाळ वेस्ट सेलरच्या सहवासात, ज्यांची बाग फुलून आली, प्रत्यक्षाहुनि प्रतिमा अद्भुत असे किती तरी सुंदर लेख या पुस्तकात आहेत. ('अंतरीचे धावे...' लेखक भानू काळे, मौज प्रकाश, पृष्ठे- २३३, किंमत २०० रु.)

कोसळेपर्यंत :




प्रसिद्ध कवी प्रा. राजेंद्र दास यांचा 'कोसळेपर्यंत' हा कवितासंग्रह सोलापूरच्या सुविधा प्रकाशनाने प्रकाशित केला आहे. कोणताही अभिनिवेश न आणता प्रांजळपणे आणि परखडपणे जीवनानुभव मांडणारी कविता प्रा. राजेंद्र दास यांच्या यापूर्वीच्याही कवितासंग्रहातून आली आहे. 'कोसळेपर्यंत' या कवितासंग्रहातील कविता अस्तित्वाची शोधयात्रा करणारी आहे. जोतिबा, मृत्युपत्र, कोसळेपर्यंत, पाखरांचे थवे अन् झाडे, बापूजी : एक संदर्भ. पुस्तके, दंगल आणि शहर, अजून पाऊस आलाच नाही, गुरूजी यासारख्या कविता नवे भान देणाऱ्या आहेत. अंधाराच्या पारंब्यातूनही प्रकाशाचे कवडसे शोधता येतील; असा आत्मविश्वास देणारी ही प्रगल्भ कविता आहे. (कोसळेपर्यंत - राजेंद्र दास - सुविधा प्रकाशन, पृष्ठे - ८७, मूल्य - ७० रुपये.)



चैतन्ययात्री :


उस्मानाबाद जिल्ह्यातील प्रसिद्ध लेखक श. मा. पाटील यांनी त्यांचे गुरू वायुपुत्र जगदाळे आणि त्यांच्या सुविद्य पत्नी कुंताताई जगदाळे यांच्या वाट्याला आलेल्या वेगळ्या सहजीवनाविषयी 'चैतन्ययात्री' या पुस्तकात लिहिले आहे. कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांच्या विचारांनी भारावलेले हे दांपत्य शहरातील नोकरी सोडून खेड्यातल्या शिक्षणसंस्थेत रमले. वायुपुत्र जगदाळेंना आतला घंटानाद ऐकायला येत होता. अंतर्मुख होण्यासाठी त्यांनी आजन्म मौनव्रत स्वीकारले. न बोलणारा पती आणि बोलण्याची विलक्षण आवड असणारी पत्नी यांचा सर्जनाचा संसार कसा फुलत गेला; याची ही जगावेगळी कहाणी. आशय, मांडणी, शैली अशा सर्वांगाने वेगळे असलेले पुस्तक वाचकांना वेगळे काही वाचल्याचा अनुभव देणारे आहे. (चैतन्ययात्री - ले. श. मा. पाटील, प्रणव प्रकाशन, उस्मानाबाद, पृष्ठे - १२८, मूल्य - रु. १६०)




हे शुभशकुनांचे पक्षी :

प्रसिद्ध कवी रा. ना. पवार यांचे सुपुत्र माधव पवार यांचा 'हे शुभशकुनांचे पक्षी' हा पहिला कवितासंग्रह. वडिलांचा समृद्ध वारसा सांगताना स्वतःचे वेगळेपण जपणारी ही कविता आहे. 'देह, देश आणि देव यांच्यातलं चिंब भक्तिरतीचं वाहणं एकट्या ऊर्जेला जेलणं शक्य करून दाखवणं हीच माधवला माझी मान्यता. कालचक्राचं जातं फिरत फिरत खेर जिथं जातं तिथतं मोहदेखील मौनात जातात असं सांगणारा माधव पवार हा सद्भावनेचा कवी आहे. 'हे शुभशकुनांचे पक्षी' ही अजून एक नवी, आणि नव्या नभाची पवारांची प्रगाढ ऊर्जा आहे. 'रत्नांच्या' राष्ट्रीय रागदारीची ही माधवी मोहकता आहे. थोडक्यात म्हणजे ऊर्जेचं हे उपमान आहे !'' अशा शब्दात फ. मु. शिंदे यांनी या कवितेचा गौरव केला आहे. (हे शुभशकुनांचे पक्षी - माधव पवार, सुविद्या प्रकाशन, पृष्ठे ८८, किंमत ८० रु.)

उरूस :



कर्नाटक विद्यापीठ धारवाडमधील इंग्रजीचे प्राध्यापक व नामवंत लेखक डॉ. बसवराज नायकर यांच्या गाजलेल्या 'लाईट इन् द हाऊस' या कादंबरीचा प्रसिद्ध लेखक आणि इंग्रजीचे प्राध्यापक डॉ. आनंद पाटील यांनी 'उरूस' या नावाने मराठीत अनुवाद केला आहे. 'कर्नाटकचे कबीर' म्हणून लोकप्रिय असलेल्या संत शरीफसाहेबांच्या (१८१९-१८८९) जीवनाचरित्रावर ही कादंबरी आधारित आहे. एका खेड्यातील मुसलमान मुलगा जवळच्या गावातील गोविंदभटाच्या पाठशाळेत आगळ्या ध्यासाने वेदाध्ययन करतो. त्यांचा मानसपुत्र व वारसदार बनतो. दोन्ही कुटुंबांना हिंदू-मुसलमान वाळीत टाकतात. त्यांचे छोटे चमत्कार अखेर त्यांना नमस्कार करायला लावतात. त्या प्रवासाची ही अद्भुत कहाणी. मराठीतील अनुवादाचे दालन समृद्ध करणारी ही कादंबरी आहे. (उरूस - डॉ. बसवराज नायकर, अनुवाद : आनंद पाटील, ज्ञानदत्त प्रकाशन, पुणे. पृष्ठे १६०, किंमत १६० रु.)



महाराष्ट्राची वाटचाल :

महाराष्ट्र राज्य, निर्मितीचा सुवर्ण महोत्सव, साजरा करीत आहे. डॉ. अनिल करडेकर यांनी लिहिलेल्या या पुस्तकात १ मे १९६० पूर्वीचा इतिहास व सध्याची भौगोलिक परिस्थिती यांचा थोडक्यात ऊहापोह करण्यात आला आहे. त्यानंतर घडलेल्या राजकीय घटना, मांडलेले अर्थसंकल्प, झालेल्या निवडणुका, त्यातल्या महत्त्वपूर्ण घडामोडी, या पन्नास वर्षात झालेली आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक स्थित्यंतरे यांचेही विवेचन केले आहे. राजकीय अभ्यासक, स्पर्धा परीक्षातील विद्यार्थी तसेच महाराष्ट्रातील जिज्ञासू वाचकांना 'महाराष्ट्राची वाटचाल' समजून घेण्यासाठी हे पुस्तक निश्चितच उपयोगी पडेल. (महाराष्ट्राची वाटचाल - ले. अनिल करडेकर, श्रीविद्या प्रकाशन, पृष्ठे - ५०२, किंमत - रु. ४५०)


माणसातील माणूस :

लोकमान्य टिळक, शंतनुराव किर्लोस्कर, डॉ. शांताबाई गुलाबचंद, अण्णासाहेब चिरमुले, वालचंद हिराचंद, प्रिं. ना. ग. नारळीकर, विनोबा भावे, जे. पी. नाईक अशा मान्यवरांची चरित्रे लिहिणारे लेखक म्हणून सविता भावे सर्वांना परिचित आहेत. तीसहून अधिक चरित्रांचे ते लेखक आहेत. त्यांची जडणघडण त्यांनी लिहिलेल्या 'माणसातील माणूस' या आत्मचरित्रात आहे. माणसाच्या मनाचा आणि त्यातही माणुसकीचा शोध घेणे; हीच त्यांची धडपडीमागची प्रेरणा.



जवळजवळ पंच्याहत्तर छोटेखानी प्रकरणातून सविता भावे यांनी आपल्या लेखनाचा प्रवास उलगडून दाखविला आहे. विसाव्या शतकातील मध्यमवर्गीय माणसाच्या वाटचालीची साध्या, सोप्या शब्दातली ही कथा वाचकांना प्रेरणा देणारी आहे. (माणसांतील माणूस - ले. सविता भावे, प्रकाशक अमृत महोत्सव समिती, पृष्ठे ४५८, किंमत २०० रु.)

पश्चिमेची धनदौलत :



मराठी साहित्यातील ललित-शैलीचे सिद्धहस्त लेखक कै. रवींद्र पिंगे यांनी मराठी भाषेला विपुल ग्रंथसंपदेने भूषविले. 'पश्चिमेची धनदौलत' हे त्यांचे अखेरचे पुस्तक म्हणजे पाश्चिमात्यांच्या बहुआयामी प्रतिभेचा परिचय करून देणारा अमोल ठेवा आहे. हेन्री डेव्हिड थोरो आणि त्याचे घर, शेक्सपिअरचे जन्मगाव आणि त्याचा लेखन-प्रभाव, हॉलिवुडच्या नटनट्यांवर बिनधास्त लेखन करणारी जॅकी कॉलिन्स, भारतप्रेमी पक्षीनिरीक्षक सिरिल एडवर्ड हेवेटसन, महाकवी टी. एस्. एलियट, खंदा कादंबरीकार थॉमस हार्डी, विज्ञानकथासम्राट-आयझॅक असिमॉव्ह, विनोदसम्राट - मार्क ट्वेन, स्त्रीमुक्ती प्रबोधनकार जील क्रैगी यासारख्या सत्तेचाळीस प्रतिभावंतांचा धावता परिचय करून देणारा हा ग्रंथ म्हणजे रवींद्र पिंगेंनी मराठी भाषेला वाहिलेले अखेरचे ललितरम्य ग्रंथ-पुष्प होय. समस्त पिंगे परिवाराने ही 'धनदौलत' एकत्र करून पुण्याच्या राजहंस प्रकाशनामार्फत वितरीत केली आहे. (पश्चिमेची धनदौलत - रवींद्र पिंगे, प्रकाशक - सांब प्रसाद पिंगे, वितरक - राजहंस प्रकाशन प्रा. लि.. पुणे किंमत रु. १५०/-)



महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे संतशिरोमणी तुकाराम महाराज आणि समर्थ रामदास स्वामी यांचे विशेष स्मरण :

समाजोद्धाराच्या तळमळीने भक्तिमार्गाच्या कळसस्थानी असलेले संतशिरोमणी तुकाराम महाराज यांनी वर्णाभिमानावर आणि भोंदूगिरीवर शब्दांचे प्रहार करीत, देहाभिमाच्या पलीकडले चैतन्याचे एकरुपत्व महाराष्ट्र आणि पर्यायाने भारताला शिकविले. आध्यात्मिक एकतेचा कळसाध्याय म्हणजे 'तुकोबाची गाथा' महाराष्ट्र-भाषेचा प्राणच होय. भक्तीने प्राप्त केलेले मनाचे- आध्यात्मिक सामर्थ्य, हा समर्थ रामदासांच्या लोकजागरणाचा, 'दासबोधा'चा आधार होता. पहिले ते हरिकथानिरूपण दुसरे ते- 'राजकारण' असे 'मना सज्जनाला' समजावीत भक्ती आणि शक्तीच्या एकतेचा साक्षात्कार घडविला. 'पुंडलीक वरद हरीविठ्ठल' आणि 'जय जय रघुवीर समर्थ' ह्या मार्गाने महाराष्ट्राच्या मनाचे भरण-पोषण झाले. ४०० वर्षांनंतरही ही महाराष्ट्र-संस्कृती टिकून आहे. ह्या विचारांचे विशेष स्मरण करणाऱ्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या- महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे अंक क्र. ३२४ आणि ३२५ ह्यांना एकत्र बांधून-सोलापूरच्या 'सनराईज- प्रकाशनाने 'संत तुकाराम आणि समर्थ रामदास- विशेष स्मरण' हा ग्रंथ प्रकाशित केला आहे. ह्या अंकात संपादक डॉ. सु. प्र. कुलकर्णी ह्यांच्या संपादकीयांबरोबरच श्री. रामकृष्ण गवळीराम गायकवाड, डॉ. संजय संभाजी लांडगे, डॉ. रामचंद्र देखणे, श्री. शांतीलाल भंडारी, श्री. सुनील चिंचोळकर, श्री. रवीन्द्र भट, डॉ. भास्कर गिरिधारी, श्री. मधु नेने, सौ. शीला निपुणगे आणि श्री. विवेक घळसासी यांचे विवेचक लेख आहेत. (संत तुकाराम आणि समर्थ रामदास-विशेष स्मरण. संपादन-डॉ. सु. प्र. कुलकर्णी, सनराईट प्रकाशन, लकी चौक, सोलापूर सौजन्य : महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, पृष्ठ संख्या- १०५, मूल्य रु. १३०/-)

❖❖❖

प्रा. मिलिंद जोशी आणि डॉ. सु. प्र. कुलकर्णी

कार्यवृत्त (१ सप्टेंबर २००९ ते ३० नोव्हेंबर २००९)

डॉ. माधवी वैद्य, प्रमुख कार्यवाह

७ सप्टेंबर २००९ : पु. भा. भावे स्मृतिदिन :

म.सा.प. पुणे व पु. भा. भावे स्मृतिसमिती यांच्या संयुक्त विद्यमाने भावेंचा २९वा स्मृतिदिन त्यांच्या जन्मशताब्दी वर्षात साजरा करण्यात आला. प्रास्तविक व स्वागत प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य यांनी केले. समितीचे श्रीधर वि. सहस्रबुद्धे यांनी समितीतर्फे निवेदन व प्रमुख वक्ते व अध्यक्ष यांचा परिचय करून दिला. त्याचप्रमाणे त्यांनी पुरस्कार विजेत्यांचा परिचय करून दिला. अध्यक्ष श्री. म. जोशी यांच्या हस्ते साहित्य समीक्षा पुरस्कार डॉ. प्रा. प्रल्हाद वडेर यांना जाहीर झाला होता. हा पुरस्कार त्यांचे चिरंजीव अजित वडेर यांनी स्वीकारला. त्याचप्रमाणे श्रीमती शकुंतला श्रीकृष्ण क्षीरसागर यांनी पु. भा. भावे- लेखक पत्नी पुरस्कार स्वीकारला व कार्यकर्ता पुरस्कार चिपळूणचे प्रकाश देशपांडे यांनी स्वीकारला. श्रीमती वसुंधरा पटवर्धन ह्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे कार्यक्रम सोहळ्यास उपस्थित राहू शकल्या नाहीत. त्यांचा साहित्यसेवा पुरस्कार समितीतर्फे त्यांच्या घरी जाऊन प्रदान करण्यात येईल. उपस्थित तीनही पुरस्कारार्थींनी आपापले मनोगत व्यक्त केले. यानंतर 'पु. भा. भावे यांना उमजलेले स्वातंत्र्यवीर सावरकर' या विषयावर धुळ्याचे श्री. प्रकाश पाठक यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षीय समारोप झाला. मधू नेने यांनी आभार प्रदर्शन केले. दीपक करंदीकर यांनी सूत्रसंचालन केले.

१२ सप्टेंबर २००९ : डॉ. गं. ना. जोगळेकर स्मृतिदिन/पुरस्कार वितरण सोहळा :

डॉ. निशिकांत मिरजकर यांना डॉ. गं. ना. जोगळेकर यांच्या नावाने दिला जाणारा द्वितीय पुरस्कार ज्येष्ठ समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांच्या हस्ते देण्यात आला. याचवेळी 'साहित्य : रंग आणि अंतरंग, या ज्येष्ठ समीक्षक व लेखक डॉ, निशिकांत मिरजकर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे यांच्या हस्ते झाले. 'संत साहित्य संशोधनातील नव्या दिशा' ह्या विषयावर डॉ. मिरजकर यांचे व्याख्यान झाले. डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. नागपूरच्या 'आकांक्षा प्रकाशनाच्या' अरुणा सबाने यांनी प्रकाशिकेचे मनोगत व्यक्त केले. जोगळेकरसरांचे चिरंजीव पराग जोगळेकर व कन्या डॉ. उज्ज्वला जोगळेकर उपस्थित होते. डॉ. वि. भा. देशपांडे यांनी प्रास्तविक केले. डॉ. माधवी वैद्य यांनी डॉ. मिरजकर यांचा परिचय करून दिला. डॉ. द. भि. कुलकर्णींचा परिचय प्रा. मिलिंद जोशी यांनी करून दिला. स्वाती महाळंक यांनी सूत्रसंचालन केले. दीपक करंदीकर यांनी आभार मानले. या कार्यक्रमास साहित्यक्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

६ ऑक्टोबर २००९ : कै. द. वा. पोतदार स्मृतिपुरस्कार वितरण समारंभ :

'हिंदू देवालयातल्या पोर्तुगीज घंटा' या पुस्तकाचे लेखक महेश तेंडुलकर यांना हा पुरस्कार इतिहासाचे अभ्यासक प्रा. राजा दीक्षित यांच्या हस्ते देण्यात आला. कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. कार्यवाह नंदा सुर्वे यांनी प्रा. दीक्षित यांचा व प्रा. मिलिंद जोशी यांनी महेश तेंडुलकर यांचा परिचय करून दिला. डॉ. देशपांडे व डॉ. वैद्य यांच्या हस्ते प्रा. दीक्षित, प्रा. प्रभुणे, प्रा. अभंग यांचा ज्ञानेश्वरीची प्रत व गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. परीक्षकांचे मनोगत प्रा. प्रभुणे व डॉ. अभंग यांनी व्यक्त केले. पुरस्कारविजेते श्री. तेंडुलकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्ष प्रा. राजा दीक्षित यांनी समारोप केला. दीपक करंदीकर यांनी आभार मानले.

२८ ऑक्टोबर २००९ :

साहित्य परिषदेच्या पहिल्या इमारतीची कोनशिला २८ ऑक्टोबर १९३५ रोजी रावबहादूर दा. ग. पाध्ये (एम.ए.जे.पी.) यांच्या हस्ते बसविण्यात आली होती. या घटनेला ७४ वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्ताने त्याच कोनशिलेला श्री. म. श्री. दीक्षित यांच्या हस्ते सायं. ५ वाजता हारफुले अर्पून श्रीफल ऊजविण्यात आले. पेढे वाटप करून या घटनेचे स्मरण करण्यात आले. श्री. अनंत जोशी, कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे, प्रमुख

कार्यवाह डॉ. सौ. माधवी वैद्य, कार्यवाह ॲड. प्रमोद आडकर व स्वाती महाळंक, डॉ. अरविंद संगमनेरकर, दीपक करंदीकर, डॉ. सतीश देसाई व कार्यालयीन व ग्रंथालयाचे कर्मचारी उपस्थित होते. श्री. म. श्री. दीक्षित यांनी यासंबंधातील जुन्या आठवणी उपस्थितांस सांगितल्या.

याच दिवशी थोर रंगकर्मी बापू ऊर्फ चित्तरंजन कोल्हटकर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यात मसाप (नाटक विभाग) तर्फे कार्याध्यक्ष व ज्येष्ठ नाट्यसमीक्षक डॉ. वि. भा. देशपांडे यांनी श्रद्धांजली वाहिली. हा कार्यक्रम टिळक स्मारक मंदिरात नाट्य परिषद, पुणे शाखेतर्फे आयोजित करण्यात आला होता.

२९ ऑक्टोबर २००९ : नवं कोरं :

या उपक्रमांतर्गत डॉ. माधवी वैद्य लिखित 'तिचं चिंतन' या पुस्तकातील काही भागांचे वाचन सादर करण्यात आले. स्वाती महाळंक यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. महेंद्र मुंजाळ यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. वि. भा. देशपांडे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन डॉ. माधवी वैद्य, सौ. वृषाली पटवर्धन, 'विपुलश्री' संपादिका सौ. माधुरी वैद्य, डॉ. कल्याणी दिवेकर यांचा सत्कार करण्यात आला. सौ. वृषाली पटवर्धन, डॉ. कल्याणी दिवेकर व स्वाती महाळंक यांनी काही भागांचे वाचन केले. सौ. माधुरी वैद्य यांनी मनोगत व्यक्त केले. यानंतर डॉ. वि. भा. देशपांडे यांनी डॉ. माधवी वैद्य यांच्याशी 'तिचं चिंतन' या त्यांच्या पुस्तकाच्या संदर्भात संवाद साधला.

३० ऑक्टोबर २००९ : श्रद्धांजली सभा :

लोकप्रिय कादंबरीकार कै. बाबा कदम यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. अध्यक्षस्थानी कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे होते. प्रा. रतनलाल सोनग्रा, प्रा. मिलिंद जोशी, डॉ. न. म. जोशी, डॉ. अश्विनी धोंगडे, राजीव बर्वे या वक्त्यांनी आपापल्या भाषणातून श्रद्धांजलीपर विचार प्रकट केले. शेवटी शोक प्रस्तावाचे वाचन डॉ. माधवी वैद्य यांनी केले.

४ नोव्हेंबर २००९ : रंगभूमीदिन :

दि. ५ नोव्हेंबर हा मराठी रंगभूमीदिन परिषदेच्या नाटक विभागातर्फे साजरा केला जातो. ज्येष्ठ रंगकर्मी व गायिका निर्मला गोगटे, मानसी खांडेकर, अतुल खांडेकर, भक्ती खांडेकर, अंबर बेहेरे यांनी मराठी संगीत नाटकांतील विविध नाट्यपदे रसिकांसमोर सादर केली. त्यांना हार्मोनियमवादक संजय गोगटे व तबला वादक विद्यानंद देशपांडे यांनी साथसंगत केली. कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे आणि प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य यांनी कार्यक्रमाचे संवादक, सूत्रसंचालक व विविध माहिती सांगणे अशी समन्वयाची कामे केली व कार्यक्रमात रंगत आणली.

१४ नोव्हेंबर २००९ : लेखिका सुनीता देशपांडे श्रद्धांजली सभा :

अध्यक्षस्थानी परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे होते. डॉ. शिरीष प्रयाग, नंदा पैठणकर यांनी श्रद्धांजलीपर भाषणे केली. डॉ. वीणा देव, डॉ. अरुणा ढेरे, डॉ. माधवी वैद्य, योगेश सोमण यांनी सुनीताबाईंच्या काही लेखांचे व त्यांना आवडणाऱ्या काही कवितांचे वाचन सादर केले. सुनीताबाईंच्या कुटुंबियांनी ह्या वाचनात विशेष सहभाग घेतला होता. शेवटी शोकप्रस्तावाचे वाचन झाले.

२१ नोव्हेंबर २००९ :

मसाप आणि त्रिदल, पुणे यांच्या संयुक्त सहकार्याने २०१० चे ८३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या कार्यालयाचे उद्घाटन मा. नामदार अजितदादा पवार यांच्या हस्ते झाले. सूत्रसंचालन सुधीर गाडगीळ यांनी केले. व्यासपीठावर प्रा. कौतुकराव ढाले पाटील, डॉ. वि. भा. देशपांडे, उल्हासदादा पवार, प्रा. द. मा. मिरासदार, महापौर राजलक्ष्मी भोसले व डॉ. सतीश देसाई उपस्थित होते. मा. ऊर्जामंत्री नामदार अजितदादा पवार यांच्या हस्ते वेबसाईटचे उद्घाटन झाले. यानिमित्ताने नामदार पवारांनी आपले मनोगत व्यक्त केले. काही दानशूर व्यक्तींनी प्रस्तावित संमेलनाला देणग्या दिल्या. डॉ. माधवी वैद्य यांनी आभार मानले. ठाले-पाटील यांनी अध्यक्षस्थानावरून आपले विचार प्रकट केले. तसेच उल्हासदादांनी वेबसाईट वरील पहिल्या पानाचे वाचन केले. महापौरांनीसुद्धा आपले विचार प्रकट केले.

२१ नोव्हेंबर २००९ : ज्येष्ठ लेखिका कै. योगिनी जोगळेकर स्मृतिदिन :

कवयित्रींचे कविसंमेलन आयोजित करण्यात आले होते. डॉ. अश्विनी घोंगडे अध्यक्षस्थानी होत्या. सुनेत्रा

ओक यांनी जोगळेकर यांच्या काही आठवणी सांगितल्या. कार्यवाह प्रा. मिलिंद जोशी यांनी डॉ. धोंगडे यांचा परिचय करून दिला. डॉ. स्नेहसुधा कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. स्वाती सामक यांनी सूत्रसंचालन केले. कवयित्री संमेलनात चंचल काळे, जयश्री कुलकर्णी, भारती पांडे, प्रभा सोनावणे, मीना सातपुते, तृप्ती अंधारे, सुनेत्रा ओक, अंजली कुलकर्णी, डॉ. माधवी वैद्य, स्वाती सामक, डॉ. स्नेहसुधा कुलकर्णी, डॉ. अश्विनी धोंगडे यांनी आपापल्या दोन काव्यरचना सादर केल्या व आपले मनोगत व्यक्त केले. दीपक करंदीकर यांनी आभार मानले.

२३ नोव्हेंबर २००९ : नवं कोरं :

ज्येष्ठ कथाकार श्री. ह. मो. मराठे यांच्या 'इतिहासातला एक अज्ञात दिवस' ह्या पुस्तकावर चर्चा आयोजित करण्यात आली होती. कोषाध्यक्ष श्री. ह. ल. निपुणगे यांनी प्रास्तविक केले. कोषाध्यक्षांच्या हस्ते मराठे, शंकर सारडा, प्रा. मिलिंद जोशी यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यानंतर प्रा. मिलिंद जोशी यांचे प्रस्तुत पुस्तकावर भाषण झाले. 'कथा कुठे भेटते ?' याविषयी श्री. ह. मो. मराठे यांनी विवेचन केले. ज्येष्ठ समीक्षक शंकर सारडा यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती महाळंक व आभार प्रदर्शन दीपक करंदीकर यांनी केले.

२५ नोव्हेंबर २००९ : नवं कोरे :

'उपक्रमार्तिगत' मी इझाडोरा' या भाषांतरीत पुस्तकावर चर्चेचा कार्यक्रम झाला. प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य यांनी प्रास्ताविक, स्वागत व सूत्रसंचालन केले. गुरू रोहिणी भाटे यांना वंदन करून कार्यक्रम सुरू झाला. डॉ. माधवी वैद्य यांनी शमा भाटे यांच्याशी रोहिणी भाटे व हे पुस्तक याविषयी संवाद साधला. तसेच निलिमा आध्ये यांनी ही मनोगत व्यक्त केले. निवेदिका गौरी लागू यांी 'मी इझाडोरा' या पुस्तकातील काही निवडक भागांचे प्रभावी वाचन केले. तसेच निलिमा आध्ये यांनी रोहिणीताईंनी लिहिलेल्या कथा व कवितांचे वाचन केले.

३० नोव्हेंबर २००९ : 'कवी माधव जूलिअन स्मृतिदिन' :

मराठी गझलेचा प्रवास' या विषयावर प्रदीप निफाडकर यांचे व्याख्यान झाले. स्वागत, प्रास्ताविक व परिचय व आभार दीपक करंदीकर यांनी मानले.

७ ऑक्टोबर २००९ : कॉफी क्लब :

प्रसिद्ध कवी रमण रणदिवे यांच्याशी गप्पांचा कार्यक्रम झाला. उपस्थित क्लबच्या सभासदांनी रणदिवे यांना त्यांच्या काव्यप्रवासाबद्दल प्रश्न विचारले. त्यांना समर्पक उत्तर देत रणदिवेंनी आपल्या काही रचना तबलापेटीच्या साथसंगतीत गाऊन सादर केल्या. प्रसिद्ध गायक संगीतकार गिरीश जोशी यांनी उत्स्फूर्तपणे रणदिवेंची गझल सादर केली. दीपक करंदीकर यांनी प्रश्न विचारीत गप्पांच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनौपचारिकपणे केले.

(शब्दांकन : **डॉ. माधवी वैद्य**
श्री. दीपक करंदीकर प्रमुख कार्यवाह

❖❖❖

इस्लामपूर शाखा

१४ जुलै २००९ : प्रा. शरद भोसले स्मृतिदिन :

विज्ञान व अध्यात्म या विषयावर डॉ. श्रीकांत सबनीस यांचे व्याख्यान झाले. प्रा. श्यामराव पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. दीपा देशपांडे यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. प्रा. शरद पाटील यांनी आभार मानले.

२२ ऑगस्ट २००९ : डॉ. शिवाजीराव घोरपडे स्मृतिदिन :

'हाडाचे विकार' या विषयावर अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. जे. जी. कुलकर्णी यांचे व्याख्यान झाले.

५ सप्टेंबर २००९ : शिक्षक दिन :

प्रा. विश्वास सायनाकर यांचे 'डॉ. राधाकृष्णन' या विषयावर व्याख्यान झाले. परिषदेच्या सर्व शिक्षक सभासदांच्या या निमित्ताने सत्कार करण्यात आला.

१८ ऑक्टोबर २००९ :

दीपावली पूर्वसंध्येनिमित्त अमोल पटवर्धन, सांगली यांच्या भक्तीगीत भावगीतांचा कार्यक्रम म.सा.प. व ज्ञानप्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने सादर झाला.

❖❖❖

श्रीरामपूर शाखा

९ नोव्हेंबर २००९ : स्व. सुनीता देशपांडे आदरांजली :

प्रा. डॉ. बाबुराव उपाध्ये, अविनाश आपटे, प्रा. टी. ई. शेळके, सौ. भाग्यश्री बडे, दिनकर पोखरकर, अशोक बनकर, नामदेव देसाई, अॅड. रावसाहेब शिंदे, यांची श्रद्धांजलीपर भाषणे झाली. प्रा. टी. ई. शेळके यांनी श्रद्धांजली ठरावाचे वाचन केले.

❖❖❖

ठाणे जिल्हा शाखा

इ.स. २००८ ते २००९ या वर्षाचा वार्षिक वृत्तांत मिळाला. त्यात वार्षिक सर्वसाधारणसभेची सूचना, वार्षिक वृत्तांत अहवाल, आजीव सभासदांची यादी, उत्पन्न खर्चपत्रक इ. चा समावेश आहे. कार्यवाह पद्माकर शिरवाडकर यांनी हा वृत्तांत सादर केला आहे.

भिवंडी शाखा

८ नोव्हेंबर २००९ :

स्तंभलेखिका व पर्यावरणवादी लेखिका शोभा सुभअदार यांचे 'नातीजपतांना' या विषयावर व्याख्यान झाले. त्यांचा परिचय निर्मला लाहोटी यांनी करून दिला. प्रज्ञा जोशी यांनी आभार मानले.

९ नोव्हेंबर २००९ :

रवींद्र गोडबोले यांचे 'इतिहास आणि आठवणी' या विषयावर व्याख्यान झाले. वक्त्यांचा परिचय कार्यवाह सुधीर धनवटकर यांनी करून दिला. प्रज्ञा जोशींनी आभार मानले. विशेष : भिवंडी शाखेने त्यांचे ३१-३-२००९ पर्यंतचे हिशेब पत्रक पाठविले.

कार्यवृत्त नोंद :
दीपक करंदीकर
स्वीकृत सदस्य, मसाप, पुणे

❖❖❖

देणगीदार – १ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २००९

क्र.	दिनांक	नाव	रक्कम	
१)	१४-९-२००९	डॉ. सु. प्र. कुलकर्णी, अहमदनगर	२३४/-	योगक्षेमार्थ देणगी
२)	७-१०-२००९	श्री. ए. आर. राजेंद्र, पुणे	१,००१/-	ग्रंथालयाच्या पारितोषिकासाठी देणगी
३)	७-१०-२००९	सौ. आळा उमराणी, पुणे	१,०००/-	ग्रंथालयाच्या पारितोषिकासाठी देणगी
४)	४-११-२००९	सौ. निर्मला गोगटे, पुणे	१०,०००/-	नाटक विभागासाठी देणगी
५)	२१-११-२००९	ज्ञानसागर प्राथमिक शाळा, औरंगाबाद	५००/-	योगिनी जोगळेकर यांच्या फोटोसाठी देणगी
६)	२३-११-२००९	डॉ. शंकर सारडा, पुणे	५००/-	योगक्षेमार्थ देणगी
७)	४-१२-२००९	श्री. श्याम भुर्के, पुणे	१,००१/-	ग्रंथालयासाठी देणगी

टीप : दि महाराष्ट्र एक्झिक्युटर अँड ट्रस्टीज कंपनी प्रा. लि. याला जोडून सरदार महादेव बळवंत नातू प्रतिष्ठान, पुणे (दि. १-७-२००९ ग्रंथालयासाठी देणगी रु. १०,०००/-) यांच्या वतीने असे वाचावे.

❖❖❖

श्रद्धांजली !

सुप्रसिद्ध साहित्यिक, कादंबरीकार बाबा कदम, समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांच्या सुविद्य पत्नी व कवयित्री प्रा. सौ. शिवरंजनी कुलकर्णी आणि प्रसिद्ध लेखिका सुनीताबाई पु. देशपांडे यांच्या निधनाने मराठी साहित्य विश्वाला शोक झाला.

महाराष्ट्र साहित्य परिषद यात सहभागी असून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वहात आहे.

(महाराष्ट्र साहित्य परिषदेची कार्यकारिणी)

अनुक्रमणिका

मसाप : पिंपरी चिंचवड शाखा आयोजित विभागीय साहित्य संमेलन २००९

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पिंपरी-चिंचवड शाखेच्या वतीने विभागीय साहित्य संमेलन २००९ शनिवार दि. २८ व रविवार दि. २९ नोव्हेंबर २००९ असे दोन दिवस आयोजित करण्यात आले. ग्रंथ दिंडी, पुस्तक प्रदर्शन, उद्घाटन सोहळा, एकपात्री कार्यक्रम, कथाकथन, परिसंवाद, कवीसंमेलन, गुणगौरव सोहळा, प्रकट मुलाखत व समारोप समारंभ-दोन दिवस असे भरगच्च कार्यक्रम झाले. म. सा. परिषदेच्या केंद्रीय संमेलन समितीचे निमंत्रक राजन मुठाणे, कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य व कोषाध्यक्ष ह. ल. निपुणगे तसेच पिंपरी-चिंचवड शाखेचे अध्यक्ष संजय खानोलकर कार्याध्यक्ष गुलाब बिरदवडे मुख्य कार्यवाह राजेंद्र कोरे आणि सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते या सर्वांच्या परिश्रमातून पिंपरी-चिंचवड परिसरातील साहित्यप्रेमी रसिकांचा उदंड प्रतिसाद लाभला.

शनिवार, दि. २८ नोव्हेंबर रोजी सकाळी ७.३० वा. चिंचवड येथील इतिहासप्रसिद्ध मोरया गोसावी मंदिरापासून संमेलनस्थळ-रामकृष्ण मोरे नाट्यगृहापर्यंत शालेय विद्यार्थी-विद्यार्थिनींचा उत्साही सहभाग असलेली ग्रंथदिंडी दिमाखात प्रमुख रस्त्यांवून मिरवत निघाली. विघ्नहरी देव महाराज ग्रंथ दिंडीचे पूजन केले. यावेळी संमेलनाध्यक्ष गीतकार प्रवीण दवणे हे उपस्थित होते.

महाराष्ट्राचे विशेष सरकारी वकील अॅड. उज्ज्वल निकम यांनी ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन केले. संमेलनाचे उद्घाटक सभापती, विधानसभा, महाराष्ट्र राज्य नामदार दिलीप वळसे पाटील यांनी उद्घाटनपर भाषण केले. प्रारंभी बी. परेश यांनी काव्यअंश ऐकवला त्यानंतर 'ही महाराष्ट्रभूमी' ह्या शाहीर विजय जगताप, इचलकरंजी यांनी पोवाडा गायन केले. व्यासपीठावरील सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत दीपप्रज्ज्वलन झाले. कार्याध्यक्ष गुलाबराव बिरदवडे यांनी प्रास्ताविक केले. व्यासपीठावरील सर्वांचा, गुच्छ स्मृतिचिन्ह शाल देऊन, यथोचित सत्कार करण्यात आला. स्वागताध्यक्ष अॅड. विजय पाळेकर यांचे स्वागतपर भाषण झाले. त्यानंतर राजन मुठाणे, डॉ. वि. भा. देशपांडे, डॉ. रामचंद्र देखणे यांची भाषणे झाली. 'आम्ही कायद्याची भाषा बोलतो; मात्र साहित्यिक काळजाची भाषा बोलतो' प्रमुख पाहुणे या नात्याने माननीय अॅड. उज्ज्वल निकम यांनी अशा प्रेरक शब्दात भाषण केले. यावेळी व्यासपीठावर प्रसिद्ध साहित्यिक द. मा. मिरासदारा व जयंत मुळे, राहुल देसाई हे उद्योजक उपस्थित होते. संमेलनाध्यक्ष प्रवीण दवणे व प्रमुख पाहुणे अॅड. उज्ज्वल निकम यांच्या हस्ते विभागीय संमेलनाच्या निमित्ताने सौ. मंजिरी तिक्का यांनी संपादित केलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. नंतर संमेलनाध्यक्ष गीतकार प्रवीण दवणे यांचे संपादित केलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. नंतर संमेलनाध्यक्ष गीतकार प्रवीण दवणे यांचे अध्यक्षीय भाषण झाले. स्थानिक तरुण कलाकारांचे गणेशवंदना हे नृत्य सादर झाले. स्वाती महाळंक यांनी दोन अडीच तास चाललेल्या या उद्घाटन सोहळ्याचे सूत्रसंचालन केले. शाखाध्यक्ष संजय खानोलकर यांनी आभर मानले.

यानंतर 'महात्मा ज्योतिबा फुले' यांच्या जीवनावर आधारित आनंद गंगावणे यांनी एकपात्री प्रयोग सादर केला. महेश खेडकर अध्यक्ष व सतीश दिवाण सूत्रसंचालक होते.

दुपारच्या सत्रात ज्येष्ठ विनोदी लेखक प्रा. द. मा. मिरासदार यांचे कथाकथन झाले. त्यांनी 'ड्रॉईंग मास्तरचा तास' ही कथा सादर केली.

'अध्यात्म आणि साहित्य' या विषयावर डॉ. सदानंद मोरे यांचे भाषण झाले. जयवंत भूमकर अध्यक्षस्थानी होते.

दुपारी ३.४५ वाजता निमंत्रितांचे कविसंमेलन कविवर्य गीतकार जगदीश खेबुडकर यांच्या अध्यक्षतेखाली झाले. अशोक नायगावकर यांनी

सूत्रसंचालन केले. दीपक करंदीकर, बी. परेश, नूतन आपटे, नीरजा, दासू वैद्य, रमेश वैद्य, संजय खानोलकर, राजेंद्र कोरे, अशोक कोठारी, नारायण सुमंत, ज्ञानेश्वर भूमकर,बाबासाहेब धुमाळ, डॉ. स्नेहसुधा कुलकर्णी, वैशाली नायकवडे, कमलेश कुलकर्णी, लक्ष्मीकांत तांबोळी, प्रवीण दवणे व अध्यक्ष कविवर्य जगदीश खेबुडकर यांनी काव्यरचना सादर केल्या. कै. बा. सी. मर्ढेकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या दोन रचना अशोक नायगावकर यांनी उपस्थितांसमोर वाचून सादर केल्या. सायंकाळच्या सत्रात कविवर्य गीतकार जगदीश खेबुडकर यांचा गुणगौरव सोहळा ज्येष्ठ संगीतकार पंडीत हृदयनाथ मंगेशकर यांच्या हस्ते शाल, पुष्प गुच्छ, रुपये ५१,०००/- रोख व स्मृतिचिन्ह देऊन करण्यात आला. विजय शेवाळे उद्योजक अध्यक्ष होते. डॉ. सलील कुलकर्णी, आ. लक्ष्मण जगताप, डॉ. दीपक पुरोहित, सुरेश साखवळकर, महेश देशपांडे, संमेलनाध्यक्ष प्रवीण दवणे व्यासपीठावर उपस्थित होते. सूत्रसंचालन राजेंद्र पोफळे यांनी केले. आपला सर्व जीवनपट आपल्या गाजलेल्या चित्रपटगीतांचे मुखडे गावून दाखवीत जगदीश खेबुडकरांनी सत्काराला उत्तर देऊन रसिकांना मंत्रमुग्ध केले. रात्री जगदीश खेबुडकर गीतमाला सादर झाली.

रविवार दि. २९ नोव्हेंबर २००९ : सकाळी प्रसिद्ध लेखक 'पानिपतकार' विश्वास पाटील यांची प्रकट मुलाखत राजेंद्र कोरे यांनी घेतली.

'प्रसिद्धी माध्यमे आणि वाचनसंस्कृती' या विषयावर दै. सकाळचे संपादक व ज्येष्ठ पत्रकार सुरेशचंद्र पाध्ये यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद झाला. रेणू दांडेकर, स्वाती महाळंक, सुनील माळी, विनिता ऐनापुरे यांनी भाग घेतला. सुरेशचंद्र पाध्ये यांनी समारोप केला व प्रसाद नामजोशी यांनी सूत्रसंचालन केले.

दुपारी 'कामगार आणि साहित्य' या विषयावरील परिसंवादात सुभाषचंद्र जाधव, राजन लाखे, सुधीर हसबनीस, बाबा राणे, डॉ. पुरुषोत्तम काळे, सुभाष सरीन, द्वारकानाथ पवार, यांनी भाग घेतला. ज्येष्ठ नाट्यसमीक्षक डॉ. वि. भा. देशपांडे यांनी समारोप केला व सूत्रसंचालन प्रशांत पुराणिक यांनी केले.

यानंतर 'हास्यसम्राट' दीपक देशपांडे (सोलापूर) यांनी आपला 'हास्यकल्लोळ' हा विनोदी एकपात्री कार्यक्रम सादर केला. संमेलनाध्यक्ष प्रवीण दवणे यांनी त्यांच्या गुच्छ देऊन सत्कार केला. ज्ञानेश्वर भूमकर यांनी सूत्रसंचालन केले.

सायंकाळी संचालक वस्त्रोद्योग, भारत सरकार, मा. मिलिंद बोत्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत समारोप समारंभ झाला. गुलाब बिरदवडे यांनी प्रास्ताविक केले. अॅड. विजय पाळेकर, डॉ. वि. भा. देशपांडे, आमदार अण्णा बनसोडे, यांची यथोचित भाषणे झाली. निमंत्रक राजन मुठाणे यांनी पुढील २०१० सालात होणाऱ्या विभागीय साहित्य संमेलनाची सूत्रे अध्यक्ष संजय खानोलकर व कार्याध्यक्ष गुलाबराव बिरदवडे यांच्याकडून सोलापूरचे प्रतिनिधी पद्माकर कुलकर्णी यांना प्रदान केली. संमेलनाध्यक्ष प्रवीण दवणे यांनी अध्यक्षीय समारोप केला. सूत्रसंचालन राजेंद्र कोरे यांनी केले व हार्दिक भूमकर यांनी पसायदान म्हटले.

दोन दिवस चाललेल्या या म. सा. परिषद पिंपरी चिंचवड शाखेने आयोजित केलेल्या विभागीय साहित्य संमेलनाची निवास व्यवस्था, नाष्टा, चहा व भोजन व्यवस्था उत्तम होती. तसेच रविवारी सकाळी स्थानिक नवोदित कवींचे भरपूर सहभाग असलेले कविसंमेलन व्हिक्टोरिया गार्डन येथील हिरवळीवर प्रसन्न वातावरणात झाले.

❖❖❖

शब्दांकन : दीपक करंदीकर
स्वीकृत सदस्य, मसाप, पुणे

❊ नववर्ष २०१० चे स्वागत ❊


सन २००९ ह्या वर्षातील साहित्यिक– घडामोडी आणि त्यावर समीक्षा करणारे लेख दि. ३१ जानेवारी २०१० पर्यंत पाठवावेत. तसेच 'नाट्यरूप' ह्या विषयावरील लेखही अपेक्षित आहेत. संहिता आणि रंगावृत्ती, संहिता आणि संगीत, संहिता आणि संवाद, संवादातील– स्वगते, नाट्यछद्म हे आणि यासारखे नाट्यघटक केंद्रीभूत धरून त्यांचे सविस्तर विवेचक–लेख अहमदनगर येथील संपादकांच्या पत्त्यावर पाठवावेत. (शब्दमर्यादा २०००.)

अनुक्रमणिका

नवे आजीव सभासद (जुलै-नोव्हेंबर २००९)

१) दरेकर दिगंबर जगन्नाथ, खांबेवाडी
२) सोनवणे वनिता सीताराम, उल्हासनगर
३) सुलाखे रेश्मा अशोक, पुणे
४) सुलाखे रितेश अशोक, पुणे
५) जोशी सुधाकर सीताराम, सोलापूर
६) वाडकर विजय धोंडप्पा, सोलापूर
७) चिडगोपीकर अलका सर्वोत्तम, पुणे
८) लाळे प्रदिप बाळकृष्ण, पुणे
९) पांचाळ प्राजक्ता हेमंत, पुणे
१०) संगमनेरकर राधा मुकुंद, पुणे
११) हर्दवाणी लछमन परशराम, अ.नगर
१२) पारखी सुभाष गजानन, पुणे
१३) पिंगळे आदित्य उल्हास, पुणे
१४) अवधानी शिरिष नरसिंह, तळेगाव
१५) आभाळे रवीन्द्र दशरथ, तळेगाव
१६) दीक्षित सरोजिनी प्रभाकर, तळेगाव
१७) देशपांडे रवीन्द्र प्रभाकर, तळेगाव
१८) परांजपे अनंत शंकर, तळेगाव
१९) पुरंदरे श्रीकृष्ण विनायक, तळेगाव
२०) फडके अरविंद वासुदेव, तळेगाव
२१) दीक्षित श्रीधर यघुनाथ, तळेगाव
२२) पैठणकर सुधाकर लक्ष्मीकांत, तळेगाव
२३) फडके गोविंद मधुसुदन, तळेगाव
२४) मुंदर्गी ज्योती नागराज, तळेगाव
२५) सोवनी अरविंद यशवंत, तळेगाव
२६) भोपळे कल्पना सुरेश, तळेगाव
२७) दिघे सुलभा सुभाष, तळेगाव
२८) साठे श्रीनिवास शंकर, तळेगाव
२९) आठल्ये रमेश जगन्नाथ, तळेगाव
३०) पवार जयवंत शिवराम, तळेगाव
३१) संवानशिल अंबादास रामचंद्र, तळेगाव
३२) मोघे शशिकांत गजानन, तळेगाव
३३) महाजन महेश वसंतराव, तळेगाव
३४) मेढी दत्तात्रय बळवंत, तळेगाव
३५) मेढी मंगेश मधुकर, तळेगाव
३६) घारपुरे विजयालक्ष्मी गजानन, तळेगाव
३७) पवार संगिता महेंद्र, तळेगाव
३८) ओगले शशांक नारायण, तळेगाव
३९) ओगले अरुण शशांक, तळेगाव
४०) मुजुमदार सदानंद विनायक, तळेगाव
४१) पाठक कैवल्य दिलीप, तळेगाव
४२) मुंगी ज्योती प्रभाकर, तळेगाव
४३) पाटणकर श्रीराम एकनाथ, तळेगाव
४४) कुलकर्णी अरुण विनायक, तळेगाव
४५) लिमये अभय विष्णू, तळेगाव
४६) कानिटकर सुहास विष्णू, तळेगाव
४७) शुक्ल विजया दिलीप, तळेगाव
४८) दिवेकर प्रशांत बळवंत, तळेगाव
४९) साठे युदुनाथ जयराम, तळेगाव
५०) खांबेटे सुमेध सुधीर, तळेगाव
५१) मसिदास नलिनी अशोककुमार, तळेगाव
५२) करंदीकर अरविंद शंकर, तळेगाव
५३) बिचे दीपक निळकंठ, तळेगाव
५४) ताम्हाणे नयनी चंद्रशेखर, तळेगाव
५५) पंचवाघ स्वाती निशिकांत, तळेगाव
५६) भरड मिनाक्षी विठ्ठल, तळेगाव
५७) केसकर विनया शरद, तळेगाव
५८) गोखले साधना विलास, वडगाव मावळ
५९) बढे चैताली सतीश, तळेगाव
६०) धोपावकर नगेश रामकृष्ण, तळेगाव
६१) लिमये विनायक, तळेगाव
६२) आगाशे वैशाली विनायक, तळेगाव
६३) डोळस अभिषेक, तळेगाव
६४) गोडसे श्रुती सुनील, तळेगाव
६५) गोडसे सुनील विनायक, तळेगाव
६६) देशपांडे विश्वास मधुकर, तळेगाव
६७) साखळकर सुरेश कृष्णाजी, तळेगाव
६८) भरड विठ्ठल पंडीतराव, तळेगाव
६९) साठे सतीश जयराम, तळेगाव
७०) साठे यशोधर श्रीनिवास, तळेगाव
७१) पेठकर सुनील पंढरीनाथ, कार्ला
७२) पिंगळे आदित्य उल्हास, पुणे
७३) कदम सुरेश व्यंकटराव, परभणी
७४) निकम विश्वजीत सुधाकरराव, पुणे
७५) नलावडे भारती दीपक, निगडी
७६) सुखटणकर अमित विजय, प्राधिकरण
७७) मोरे केशव व्यंकटराव, वाकड
७८) पांढरे विठ्ठल दिनकर, निगडी
७९) पंडीत सुनील त्र्यंबक, चरवली
८०) माळी केशव विठ्ठल, चिखली (पुणे)
८१) निकम विश्वास बाबुराव, निगडी
८२) देशपांडे वसंत माधव, पुणे
८३) डावरे सुचित्र अजित, अहमदनगर
८४) कुलकर्णी ध्रुवराज हणमंतराव, सांगली
८५) कुसुरकर प्रविणा अरविंद, सोलापूर
८६) धेंडे श्रद्धा अजिनाथ, पुणे
८७) वाघमारे अमोल पोपट, भोसरी
८८) बनसोडे अविनाश मनोहर, सोलापूर
८९) काळे अनुराधा शारद, पुणे
९०) कर्वे माधव चिंतामण, पुणे
९१) दीक्षित माधुरी मार्तंड, पुणे
९२) जोगदंड संभाजी लि., पुणे
९३) पाटील संजय मारुती, शिराळा
९४) साळुंखे अनुजा चंद्रशेखर, इस्लामपूर
९५) बावळे राजेंद्र सावळाराम, बेलापूर
९६) भारंबे दिलीप शंकर, जळगाव
९७) महाजन प्रभावती भागवतराव, जळगाव
९८) घुले वसंत बाबुराव, जलोची
९९) राजहंस रत्नप्रभा रमेश, पुणे
१००) बढे दिपाली जवाहर, पुणे
१०१) वर्तक विनायक गणेश, पुणे
१०२) मोरे नितीन बबनराव, पुणे
१०३) पटणे राजेश, पुणे
१०४) केळकर श्यामसुंदर रामचंद्र, पुणे
१०५) केळकर शमा श्यामसुंदर, पुणे
१०६) अत्रे प्रसाद नरहर, पुणे
१०७) धनवे पाटील माधव बाळकृष्ण, चिंचवड
१०८) गावंडे प्रशांत प्रल्हाद, पुणे
१०९) गेंगजे विशाल दत्तात्रय, आंबेगाव
११०) विभुते श्रीपाद दिगंबर, फलटण
१११) इनामदार प्रकाश रामकृष्ण, फलटण
११२) देशपांडे महेंद्र शामकांत, नासिक
११३) जोशी वासंती अशोक, पुणे
११४) राहुरकर गायत्री मिलिंद, पुणे
११५) पवार गोपीनाथ महादेव, पुणे
११६) दहिवळ संतोष रघुनाथ, शहर टाकळी
११७) जाधव अजित जिजाबा, मर्ढे
११८) मोराणकर सोनाली संजय, पुणे
११९) अवचट संदीप शरदचंद्र, पुणे
१२०) कश्यप मंगेश सूर्यकांत, पुणे
१२१) पाटील पी. डी., पिंपरी
१२२) आगलावे कीर्तीराज शैलेंद्र, पुणे
१२३) गायकवाड अंजली विजर, हडपसर
१२४) पाटील मदन दत्तात्रय, पुणे
१२५) कुलकर्णी मिलिंद रमेश, पुणे

❖ ❖ ❖



Now a Home Loan
from Canara Bank
at 8% p.a.
Special Festival Bonanza till 31.12.09
Realise your dream of owning a home even faster than ever with Home Loans from Canara Bank
Applicable Rate of Interest for loans upto Rs. 30 lacs
For the 1st 12 months - 8%
For the next 48 months - 9%
Above 60 months - 10%
BPLR minus 2.50% subject to a minimum of 10%
Conditions apply
केनरा बैंक
Canara Bank
Together we can
www.canarabank.com
Toll Free No. : 1800 425 0018

प्रेषक

बुक-पोस्ट

प्रमुख कार्यवाह,
महाराष्ट्र साहित्य परिषद,
टिळक रस्ता, पुणे-४११०३०.
दूरभाष : ०२०-२४४७५९६३.

